वर्षाचा आगाऊ ६० ५ डाक हाशील ०१२
सहामाही ॥ ३ ॥ ०८
साल अखेर ॥ ७ ॥ १०८
किरकोळ अंकास ...........................०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस .........०१

Annum in advance 5 Postage 13 as
Annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy..................................4as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

Advertisements
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition per line3as

VOL XXVI AKOLA MONDAY 4 JULY 1892 NO 26
वर्ष २६ सोमवार तारीख ४ माहे जुलै सन १८९२ इ० अंक २६

## जाहिरात

———0———

अहो स्वदेश बांधवहो, परदेशी औषधी नुस्त्या रंगबाज व कमिशन जास्त पाडून कां फसतां? इकडे थोडे लक्ष द्या.

आमचे दवाखान्यांत सर्व रोगांवर औषधी विक्रीस व दरिद्री लोकांस फुकट तयार आहेत; परंतु त्यांत ज्या हटकून गुण खात्रीनें देतात त्यां पैकीं थोड्या प्रसिद्धीस देतों. त्यांतून जो दवा कोणास लागेल त्यांनीं खालीं लिहिलेले सहीचे पत्यावर पत्र पाठवावें. ह्मणजे आम्ही व्हाल्युपेबलनीं पोस्टमार्गें लवकर पाठवूं. व कोणी आजारी आमचे येथें येऊन औषध घेतील त्यांस प्रथम दुरुस्त करून ठरलेली किंमत मागाहून घेऊं.

हमेशा घेणारे ग्राहकांस कमिशन देऊं. व त्यांनीं विक्री करून दाम पाठवावें.

१ गजकर्णावर रामबाण, ६ दिवसांत गुण किंमत दर बाटलीस ०८ आणे.

२ मूळव्याध कितीही दिवसांची दुर्धर असेल त्यावर मोडावर लावण्याचे व पोटांत घेण्याचें दोन औषधी मिळून किं. १॥ रु.

३ धातुर्थिक ज्वर ह्मणजे चवथारें हिंव ताप त्याच प्रमाणें तिजारे, व दररोज येणारे कितीही दिवसांचे असो, त्याजवर मिश्रित औषध एकच बाटली पुरे. किं. १॥ रु. दुसरें औषध गोळ्या खात्रीच्या २१ गोळ्याच्या डबीस १०५ या औषधानें कडक तापही जातो.

४ परमा तिडिक व स्वप्नावस्था, व कोष्यांतील उष्णता व क्षिणता या सर्वांवर मेहूणपुडा किं. १ पुड्यास ०१४ आणे.

५ बाळंत रोग बाळाचे डबे व सटवी बाधा व प्रदर सर्व तऱ्हेचा किं. १ डबीस १॥ रु.

६ वीस प्रकारचे मेहापैकीं १६ मेहावर १४ गोळ्यास किं. २॥=

७ नारुवर ९ दिवसांत गुण. लावणें व खाणे याच्या डबीस किं. ।=

८ गुल्म पांच प्रकारचे व सर्व पोट शूळांवर व गोळ्यावर व पानथरीवर १ डबीस किं. ॥।

जुलाब उत्तम राजस तकलीफ अगदीं नसून कोठा साफ १ बाटली १० मनुष्यास पुरेल किं. १। रु.

१० मेदोरोग व भुरें व उन्माद यावर अगदीं जलद गुण १ बाटलीस किं. २ रु.

११ स्त्रियांचे रक्तस्राव व ऋतुस्नात होण्यास व गर्भधारणास बंदोन ह्यांवर हें एकच औषध फार चांगलें आहे. १ डबीस किं. १॥

१२ पित्त व मस्तकशूळ व अर्धशिशी याजवर दर डबीस किं. १०=

१३ हागवण व अतिसार १ डबीस किं. १।=

१४ वृषण एकाराल्यास व वृद्धीस १ डबीस किं. १ रु.

१५ कावरले कुत्रें व कोल्हे व तेल्या उंदीर डसल्यास १ डबीस किं. १। रु.

१६ मेहानें अगर उष्णतेनें पाय उलून रक्त जाणें व संधि दुखणें ह्यावर १ डबीस किं. १॥ रु.

१७ महामारीवर अगदी जलद गुण एक मनुष्यास १२ गोळ्या ५० गोळ्याच्या डबीस किं. १०–

१८ गर्मी उर्फ उपदंश संबंधी विकार क्षतें यांजवर १ डबीस किं. १॥ रु.

१९ फसली उर्फ मज्जागतवात व शूळ याजवर लवकर १५ मिनिटात गुण १ डबीस किं. ॥ हें १५ मनुष्यांस पुरेल.

२० कऊळ, नळगुद, पंडु, मूज व मुखरोग ६५ व सन्निपात १३ यांवर १ डबीस किं. १॥ रु. ही ३ मुलें व २ पुरुषांस पुरेल.

२१ सुवर्णमालिनीवसंत खात्रीचा १ तोळ्यास किं. ७ रु.

२२ योगराज गुगुळ १ तोळ्यास ४॥ रुपये.

२३ नामर्द ह्मणजे नपुंसक कितीही दिवसांचा असो तरी तो तीन दिवसांत दुरुस्त खात्रीनें होईल. १ बाटलीस किं. ३ रु. गुण न आल्यास पैसे परत मिळतील.

२४ डोळ्यांतील फूल वडस रातांधळें लाली खुपरी चुळ चीपडे गळती याजवर १ डबीस किं. १०६

या शिवाय जास्त माहिती मागविल्यास देऊं. व कोणी योग्य औषधें हमेशा मागवून विक्री करील त्यांनीं विक्री करून पैसे मागाहून पाठवावे.

(पता व सही) शिवचरनगीर रामगीर
वैद्य तुरणखेडकर अकोला गंगाधरचे
माडीवर चौकांत दवाखाना.
वऱ्हाड.

## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, अकोलें म्युनिसिपाल कमेटीचे हद्दींतील बारा फतराचे आंत गुरें चारण्याचे हक्काचा लिलाव सन १८९२।९३ इ० सालाबद्दल ता० ५ माहे जुलई सन १८९२ इ० रोजीं सकाळीं ७॥ वाजतां टौनहालांत केला जाणार आहे. ज्याची घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदरहू वेळीं टौनहालांत हजर व्हावें कळावें. ता० १३।६।९२

Vyankatesh R. Mudholkar.
Secretary Akola.

## पत्रव्यवहार.

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतो असें समजूं नये.

मुक्काम वाशीम ता० २६।६।९२

रा० रा० वऱ्हाडसमाचारकर्ते यांस

कृ्तानेक साष्टांग नमस्कार वि० वि० पावसाची चलबिचल दिसते तरी आतां लोकांस सध्यां महर्गतेनें फार जेरीस आणून सोडलें आहे. या दिवसांत मजूरदारांस रोजगार धंद्याची देखील मारामार पडते. त्यांचा सर्व हवाला ईश्वरावर!

अकोला इंगोली रेलवेचे काम महागाई करितां सरकारानें राखून ठेविलें आहे. तें सुरु करण्याची ही संधी आहे परंतु ही गोष्ट करण्यास जिल्ह्याधीपतींनीं वरिष्ठ सरकाराकडे काम चालविलें पाहिजे. एरव्हीं ह्या गोष्टी कशानें होणार? ही रेल्वे झाल्यापासून सरकाराला अतिशय फायदा होईल. सरकार जर करीत नसेल तर वऱ्हाड प्रांतांतील बड्या बड्या सावकारांनीं ह्या कामीं कंबर बांधावी व एक कंपनी काढून रेलवे करितां भांडवल उभारावें व अवश्य लागणारें भांडवल जमलें ह्मणजे सरकारापाशीं परवानगी मागावी. ही परवानगी सरकार देईल. कारण गेल्या सालीं अलिशान रेसिडेंट साहेब बाहादूर यांची स्वारी इंगोली मार्गानें ह्या प्रांतांत आली. त्यांचा पहिला मुक्काम येथें झाला. त्या वेळीं येथील मुनसिपालिटीनें मानपत्र दिलें त्या वेळीं रेलवेची गोष्ट निघाली होती. तेव्हां आ साहेबांनीं असें सांगितलें कीं जर नेटिव लोक ही रेलवे करतील तर परवानगी सरकार मोठ्या आनंदानें देईल–परंतु सरकार होऊन सध्यां रेलवे करीत नाहीं. ह्या प्रांतांत सुखी लोक फार आहेत. भांडवलाकरितां शेर काढून ही रक्कम उभारली तर वावगें होणार नाहीं. अकोल्या सारख्या ठिकाणीं एखादी युक्ति ह्या कामाकरितां पुढारी लोकांच्या मनांत भरणार नाहीं असें नाहीं परंतु भरऊन देणारा चतूर पुरुष कोणी पाहिजे. ह्या कामीं सधन, साहसी व व्यापारदक्ष यांणीं लक्ष पुरविलें पाहिजे ह्मणजे आकोला खामगांव उमरावती व इंगोली येथील साहुकार जमून हें काम सहज करूं शकतील. हल्लीं हिंदुस्थानांत कलकत्याकडे नेटिवांनीं एक रेलवे बांधावयाची खटपट चालविली आहे. त्या कामाकरितां शेर काढून पैसा जमा केला आहे. शेर कितीचा ह्मणालतर अवघा दहा रुपयांचा! आतां अशा हलक्या किमतीचे शेर काढून ही रेलवे होणार नाहीं हें खरें तरी सदरहु लिहिल्या ठिकाणीं धनवान सावकाराचा भरणा चांगला आहे तेव्हां एवढेंसें काम ह्याच्या कडून होणार नाहीं असें नाहीं. मागें सरकारानें ह्या रेलवेची मोजणी करून ठेविली आहे. नद्या डोंगर बहुतेक टाळले आहेत. वऱ्हाडांतील परोपकारी वर्तमानपत्रांनीं हा विषय आपल्या पत्रांतून जरूर आणावा. व सरकारास ह्या रेलवेची जरूरी दाखवावी. इकडे व्यापार फार आहे. तेव्हां नफा किती होईल ह्मणून सांगूं? हल्लीं सरकारानें खानदेशांतून सूर्ते पर्यंत नवीन रेलवेचा फांटा काढण्याची मंजुरी दिली आहे. या वरून पाहतां हिंदुस्थानभर लोह मार्ग बनवावा असा सरकारचा हेतु दिसतो. परंतु हा प्रांत पक्का सरकारचा बनला नाहीं ह्मणून कदाचित सरकार मार्गेंपुढें पहात असेल असें वाटतें. कसें हा असो, ह्या कामीं वऱ्हाडांतील लोकांनीं काळजीपूर्वक ह्या विषयांचें मनन करावें व हा रस्ता नेटिवांनीं बांधिला अशी किर्ती संपादन करून घ्यावी. वर्तमान पत्रकर्ते महाराज आपले वऱ्हाड प्रांतांत जुनें पत्र आहे. आपणास हा रेलवे रस्ता आवडत असेल तर ह्या बद्दल आपल्या सुंदर पत्रीं कांहीं विचार लोकांपुढें मांडावे. आपलें अनुकरण आपले धाकटे बंधु करतील. तूर्त ह्या बद्दल पुरें करितों.

कोर्टें सुरू झालीं. वकील लोक सुटी संपतांच कामावर रुजू झाले. दिवाणी फौजदारी काम करण्यास येथें निरनिराळे न्यायाधीश नसल्या मुळें कामाचा फार घोटाळा होऊन रयतेला व न्यायाधिशांना फार त्रास सोसावा लागतो. फौजदारी काम आलें कीं दिवाणी गुंडाळून ठेऊन फौजदारी हातीं घ्यावें लागतें व ह्या कामाचा निकाल पहिल्यानें लावण्याचा असल्या मुळें ह्या कामाकडे सर्व लक्ष जाऊन दिवाणी तसेंच राहतें. या मुळें पक्षकार लोकांना त्रास होतो तो न व्हावा या करीतां दिवाणी व फौजदारी हीं कामें करण्यास वेगळे वेगळे अधिकारी असावे असें झाल्यानें कामांत घोटाळा होणार नाहीं. दोन्ही कामें चांगलीं चालवून पक्षकार लोकांना सुख होईल.

येथील मुनसिपालिटी मोडली जाणार अशी खबर गांवभर पसरली आहे. परंतु या खबरेंत कांहीं तथ्यांश असेल असें वाटत नाहीं व सरकार असें करणार ही नाहीं. उत्पन्न कमी पण तें वाढविण्याची खटपट चालू आहे. वाढेल तेव्हां खरें. संगीत नाटकाचा दौरा होऊन ते येथें पावसाळ्या करितां आले आहेत कळावें.

आपला
"क्ष"

वऱ्हाडसमाचार

मिती आषाढ शुद्ध १० शके १८१४

## धर्मार्थ दवाखाने

सन १८९१ साल अखेर वऱ्हाड प्रांतांत

धर्मार्थ दवाखाने एकंदर त्याच्या मागील वर्षा प्रमाणें ३६ च कायम होते परंतु पुढील साली म्हणजे १८९२ चालूं वर्षांच्या मुदतींत दोन नवे दवाखाने सुरू होतील असा अंदाज आहे. बडनेऱ्या मुक्कामीं धर्मार्थ दवाखान्या प्रीत्यर्थ लागणाऱ्या इमारतीचा खर्च शेट जहानगीर हारमसजी यांनीं उदारबुद्धीनें व भूतदयेनें आपल्या अंगावर घेतला आहे आणि या सत्कृत्या बद्दल अलिशान रेसिडेंट साहेबांनीं त्यांचे आभार मानून दवाखान्याचा खर्च लोकल फंड व सरकारची ग्रांट-इन-एड यांच्या रकमेनें चालविण्या विषयीं फर्माविलें आहे. वाशिम जिल्ह्यांतील शिरपूर गांवीं नवा धर्मार्थ दवाखाना काढावा म्हणून गांवकरी व आसपासच्या लोकांनीं १४०० रुपया जवळ वर्गणीची रक्कम गोळा केली आहे आणि ते असें म्हणातात कीं तेथील धर्मशाळेचा कांहीं भाग नवीन इमारत तयार होई पर्यंत दवाखान्याकडे द्यावा परंतु त्यावर सानिटरी कमिशनरचें मत पडतें कीं धर्मशाळा उपयोगांत आणली तर नवी निराळी इमारत मिळे पर्यंत लोकांच्या भरवंशावर निमूटपणें बसावें लागेल आणि तसें करणें म्हणजे अत्यंत गैरसोयीचें, दीर्घगाईचें व परस्वाधीनतेचें काम होतें. तेव्हां इमारत अगोदर पाहिजे. डेपुटी कमिशनर म्हणतात कीं लोकांना वर्गणीच्या अधीक फंडा साठीं विशेष तसदी देतां येत नाहीं व लोक ही नाखुष आहेत. परंतु लोकल बोर्ड व जिल्हा बोर्ड यांस या संबधानें रेसिडेंट साहेबांनीं सूचविलें आहे कीं हा वादाचा प्रश्न लवकर मिटला जाऊन शिरपूरास नवा धर्मार्थ दवाखाना चालूं व्हावा. एकंदर रिपोर्टच्या वर्णांत छत्तीस दवाखान्यांतून २३८३७३ रोग्यांस औषधें देण्यांत आलीं म्हणजे ही संख्या मागील साला पेक्षां ३१९३ नें मोठी होती. जळगांव, शेगांव, मलकापूर, नेरपिंगळे, अंजनगांव, उमरखेड, खामगांव, व दारव्हा या नऊ ठिकाणीं एकंदर साठ अखेरीस ९५८१ रोगी कमी आले तरी इतर ठिकाणीं त्यांची संख्या चांगली वाढल्यामुळें एकंदर प्रांताच्या हिशोबांत वाढच दाखविण्यांत आली आहे. दिवसानुदिवस दवाखान्यांची उपयुक्तता व भरभराटी वृद्धिंगत होत आहे हें पाहून कोणास ही आनंद वाटल्या वाचून राहणार नाहीं. मुख्यत्वें करून मि. दुर्गया पिले हे शेगांवाहून आकोल्यास बदलल्या मुळें शेगांवास २११८ कमी रोगी औषधें घेण्यास गेलें असून आकोल्यास २७७४ अधीक रोगी दवाखान्यांत आले होते ही गोष्ट लक्षांत ठेवण्या सारखी आहे. आम्हास कळविण्यास आनंद वाटतो कीं सानिटरी कमिशनर साहेबांनीं मि. दुर्गया पिले यांची मोठी वाहवा करून त्यांचेंच नांव विशेषें करून वरिष्ट अधिकाऱ्यांच्या नजरे खालीं घातलें आहे. अकोल्याच्या दवाखान्यांत रोग्यांची एवढी संख्या वाढण्यास रा. रा. हरी वामन भट एल. एम आणि एस हे स्वदेशी परत गेले व एकंदरीनें सालांत रोगराई विशेष होती अशीं दोन कारणें आहेत तथापि बहुतेक श्रेय मि. दुर्गय्या पिले यांच्या बहुसाल परिश्रमाचें, कर्तबगारीचें, व लोकप्रियतेचे आहे हें आम्ही निर्णय पूर्वक कळवितों. डाक्टर रेली म्हणतात कीं लोकप्रियता संपादणें सोपें असल्या मुळें मि. दुर्गया यांच्या सभोंवतीं मित्रांचा व रोग्यांचा घोळका असतो तरी त्यांच्या डाक्टरी कामांत यश कितपत येत असेल या बद्दल मनांत संशय येतो. लोकांमध्यें चहा ज्याची होते त्याच्या अंगीं चांगले गुण वसत असतात म्हणूनच लोकांना तो फार आवडतो आणि मनुष्य यशस्वी असल्या खेरीज ही चहा फार काळ टिकत नसते. परंतु मि. दुर्गया यांची लोकप्रियता वाढत्या कलेवर आहे हें सांगितलें म्हणजे डाक्टर रेली यांच्या मनाची शहानिशा होईल असें आम्ही समजतों.

धर्मार्थ दवाखान्यांत राहून औषधें घेणारे लोक आमच्या प्रांतांत फार कमी आढळतात. भिक्षुक व भटकणारे लोक शरीरानें व्यथित झाले, पोटापाण्याची सोय नसली म्हणजे दवाखान्यांत जाऊन राहतात. अशा १४६० रोग्या पैकीं फक्त ९५च बायका होत्या. बायकांची व्यवस्था हल्लीं पेक्षां स्वतंत्र व पुरुषांच्या संपर्का पासून वेगळ्या अशा खोल्यांतून विशेष सौम्य प्रकारची व्हावयास पाहिजे परंतु तशा सोयी नाहींत व नेटिव बायकांना घरदार सोडून दवाखान्यांत राहण्याचें जन्मा पासून ऐकून ही ठाऊक नसतें तेव्हां अशा अश्रुत गोष्टी प्रत्यक्ष अनुभवाला कोठून येणार! लेडी डफरीन फंडा मार्फत बायका डाक्टरणी असून त्यांच्या व्यवस्थे खालीं स्त्रियांच्या आरोग्य संरक्षणार्थ निराळे दवाखाने निघून त्यामध्यें धर्म, जात, परस्परा मधील रोटीव्यवहार इत्यादि संबधानें निर्बंध ठेवले पाहिजेत तरच त्या पासून वऱ्हाडांतील स्त्रीजनांचा मोठा फायदा होण्याचा संभव आहे.

एकंदर १०८९४९ रोगी दवाखान्यांतून औषधें घेऊन गेले त्यांत ३७५७४ बायका व ९१८५० मुलें होतीं. शस्त्रक्रिया एकंदर ९३ रोग्यांवर करण्यांत आल्या त्या पैकीं एक पंचमांश नुसता मि. दुर्गया पिले यांचा आहे परंतु त्यांच्या सत्रा शस्त्रक्रियेंत किती रोगी बरे झाले हें कोठें लिहिलेलें नाहीं.

(पुढें चालेल.)

---

गेल्या मंगळवारीं मागें ठरल्या प्रमाणें पार्लमेंट बरखास्त झालें. महाराणी सरकारच्या कारकिर्दींतलें हें सहावें पार्लमेंट असून त्यास सन १८८६ च्या आगष्टचे पांचवे तारखेस आरंभ झाला होता. लार्ड सालिसबरी प्रभृति कान्सर व्हेटीव लोकांचें प्रधानमंडळ येणें प्रमाणें सरासरी सहा वर्षांच्या मुदतीपर्यंत सुयंत्रपणें बिनधोक चालेलें. चालूं पार्लमेंट मोडते समयीं महाराणी सरकारचें संभाषण सिंहासना वरून वाचून दाखविण्यांत आलें त्यांत असें स्पष्टपणें कळविलें होतें कीं इंडिया कौन्सिल बिल लार्ड व कामन्स या उभय सभामध्यें पसार होऊन राणी सरकारच्या मंजुरातीं साठीं दाखल करण्यांत आल्यावरून चक्रवर्तिनी व्हिक्टोरिआ यांनीं त्यास आपली पूर्ण संमति दर्शविली. या पुढें सदर्हू नवीन बिलाची कायद्या प्रमाणें आपल्या देशांत अंमलबारी सुरूं होण्यास फारसा कालावधि लागणार अशी आम्ही उमेद बाळगितों. शिरस्त्या प्रमाणें पार्लमेंटची सभा आटोपल्या नंतर निरनिराळ्या पक्षांच्या मताभिमानी व अग्रणी मुत्सद्यांनीं आपापल्या ठिकाठिकाणच्या गांवामधून आपल्या पक्षाला जय मिळावा म्हणून मोठमोठें वाग्युद्ध सुरूं केलें. मि० ग्लाडस्टन साहेबांची स्वारी मिडलोथियन मुक्कामाला चालली असता त्यांच्या सभोंवार सहस्त्रावधि लोक गोळा होऊन त्यांच्या पक्षाचें अभिनंदन करीत आहेत अशा वेळीं एका खुनशी व मत्सरी बाईनें मि. ग्लाडस्टन यांच्या डोळ्यावर एक वस्तु भिरकाऊन मारली आणि त्या अपघातामुळें तो जगप्रसिद्ध वृद्ध गृहस्थ कांहीं काळ बेजार होता तरी थोडथोडा आराम वाटूं लागला तसतसें त्यांनीं आपल्या स्वारीला पुन्हा प्रारंभ केला. डोळ्याला इजा करण्याचें कारण असें सांगतात कीं मि. ग्लाडस्टन यांनीं स्त्रीवर्गाला राजकीय हक्कांत व प्रकरणांत हात घालूं देऊं नये कारण कीं तेणेकरून नैसर्गिक स्त्रीस्वभावाच्या सौम्यतेला व सौजन्याला धक्का पोंचेल.

---

गेल्या मंगळवारा नंतर नव्या पार्लमेंटाच्या निवडानिवडीची धांवल सुरू झाली आहे ती संपून आगष्टच्या चौथ्या तारखेस महाराणी सरकारच्या कारकिर्दींतल्या सातवे पार्लमेंटाच्या बैठकीस प्रारंभ होणार आहे. लार्ड सालिसबरीच्या प्रधानकीच्या सहा वर्षां मध्यें हिंदुस्थानांत विलक्षण व अद्भुत गोष्टी घडून आल्या आहेत. हिंदुस्थानांतील राजनिष्ट व स्वामिभक्तिपरायण प्रजाजन राजकर्त्यांस जात, देश, धर्म इत्यादि भेदाभेद बगळून राज्यकारभार न्यायाच्या समदृष्टीनें व एक बंधुत्वाच्या नात्यानें चालविण्यास याचारण करीत आहेत, लोकमतास प्राबल्य चांगलें आलें असून राष्ट्रीय सभा ही खरोखर सर्व राष्ट्राची राजकीय संस्था बनली आहे आणि ती राज्यकर्त्यांस उत्तम कौन्सिलदार व प्रजेच्या तर्फे न्यायी वकील आहे असें म्हटले असतां चालेल. आतां नव्या पार्लमेंटाची निवड होऊन लिबरल पक्षाकडे प्रजानकीचीं सूत्रें सोपविलीं जातील तर आमच्या या प्रचंडशक्तिच्या व विचार संपन्न बहुमताच्या राष्ट्रीय सभेची विजयपताकी सन १८९३ ची मोहिम खात्रीनें फत्ते होईल अशी आम्हास उमेद आहे.

---

हिंदुस्थाना विषयीं ब्रिटिश पार्लमेंटास तिळप्राय काळजी नसावी आणि बजेटा सारख्या महत्वाच्या विषयाच्या वेळीं अवघे सहाजण सभासद हजर असावेत या हून लांछनास्पद कर्तव्यशून्यता व अपराधद्योतक उपेक्षा वेगळी कोणती असणार आहे? बिनसनदी युरोपियन अधिकाऱ्यांस पेनशनें सनदी अधिकाऱ्या प्रमाणें पौंडांत मिळावी म्हणजे पांच हजार रुपयांहून पेनशन अधीक मिळत नाहीं आणि तें पेनशन ही रुपयास १ शि. ९ पेन्स या भावानें दिलें जातें तें दोन शिलींगांच्या भावानें मिळावें व पेनशनास तीस वर्षांची नोकरी लागते ती मुदत कमी करावी अशा विषयीं सूचना आली होती परंतु मि. कर्झन यांनीं कळविलें कीं दोन्ही मागण्या प्रमाणें कांहीं सवलती देतां येत नाहीं कां कीं त्यां मागण्या कबूल करण्यानें बिनसनदी नेटिव अधिकारी ही तशाच तक्रारी आणतील आणि त्या कबूल केल्या तर खजिन्यावर नव्या निष्कारण खर्चाचा मोठा जबरदस्त बोजा बसेल. हा रोकडा जबाब देण्यांत मुख्य भिती काय ती नेटिव लोक आपल्या हक्काच्या समसमानते संबंधानें ओरडतील अशी दाखविण्यांत आली परंतु असा बागुलबोवा दाखऊन आमचा मान राखावयाचा व दुसरी कडून हिंदुस्थान सारख्या अब्जादि संख्येनें गणना होणाऱ्या उत्पन्ना विषयीच्या बजेटाच्या वेळीं पार्लमेंटांत सहाजणा पेक्षां अधीक जनांनीं हजर देखील राहू नये या वरून राज्यकर्त्यांचें कृत्रिम वर्तन, धनपरायणता व परदुःखशीतलता हीं स्पष्ट दिसून येतात.

---

मि. व्हीलर साहेब यांस हिंदुस्थान सरकारनें दोषमुक्त केलें आणि पेनशन देऊन त्यांस रजा दिली. फौजदारी खटल्यांत देवी प्रसादास शिक्षा ठोठावली, निकाल लिहिला नाहीं, व खुद्द साहेबा वरीलच हुकूमनामा साहेबांनीं बाजूस टाकला म्हणून कमिशन मार्फत चौकशी झाली. हायकोर्टाची पक्की खातरी झाली होती तरी निकाल लिहीलाच नाहीं हें सिद्ध नाहीं! दोषास्पद व गैरकायदा निष्काळजीपणाचा कसूर झाला तरी साहेब मिथ्या प्रतिज्ञेंत सांपडले नाहींत असें निर्णयात्मक ठरलें. मागें कुकसन व क्राफर्ड यांस पेनशनें दिलीं त्या प्रमाणें व्हीलर यांस मिळालें त्यांत हर्षशोकाचें कारण नाहीं परंतु अखेर न्यायाचा दिग्विजय झाला खरा!

---

गेल्या वर्षीं काशी येथील राममंदिराच्या प्रकरणांतील दंग्यांत मि. निकोल्स नामक न्यायाधीशांनीं अपराधी म्हणून अनेक सद्गृहस्थांस तुरुंगवासांत जबर शिक्षेवर पाठविलें. अलिकडे सदर्हू न्यायमूर्तींनीं कांहीं आरोपीस बेकायदा काळेपाण्याची व देहान्त शिक्षेची शिक्षा सांगितल्या परंतु हायकोर्टास दिसून आलें कीं निकोल्स यांचें वर्तन गैरशिस्त व खुनशी आहे. हायकोर्टानें त्यांच्या वर उत्कृष्ठ ताशेरा झाडला आहे. परंतु त्यांस त्या बद्दल योग्य प्रायश्चित मिळालें नाहीं असें आम्हांस वाटतें.

---

# The Berar Samachar

MONDAY, JULY 4
1892

We acknowledge with thanks the receipt of a copy of the annual report on Jails in Berar for 1891. The year opening with the lowest number on record i. e. 864 convicts, left a ballance of 1104 at the close of twelve months— these being 2805 admissions against 2565 dis charges during the time. Col. C. T. Lane has attempted to explain the rise in admissions as being the effects of a rise in the prices of food in the latter half of the year. It is a familiar experience that in times of scarcity and famine poor people are driven to the worst sort of resources available and crimes for bread become the great and growing evil. There is a relation of cause and effect between the rise in prices and that in the jail population all the other things being the same. But such a state of circumstances ought to obtain as would establish the invariable and unconditional existence of the two events. The Resident along with the Commissioner has objected to this explanation and has rightly shifted to the Inspector of Jails the burden of

proving that the rise in admissions followed the rise in prices in the whole province and that where there was not such a rise the rise in crime ought to be explained by the presence of other augmenting causes. It is then to be seen with great interest how Colonel Lane makes up the apparent insufficiency in his argument.

The male convicts are arranged according to their different occupations in life. Trade and Commerce send in a small number of fellows to these condemned cells while it is service and agriculture that make up the big percentage of crime statistics. We have serious doubts as to the class of convicts separated under the title of 'engaged in agriculture or with animals.' We think that every convict styles himself a peasant if he is nobody else because that is a convenient term to use. Our firm belief is that agriculture is well-paying to those who follow it and the people who pursue agriculture as life-business are generally law-abiding, innocent, and simple in their ways of life. Engagement in agriculture is a test which, if properly and strictly followed, would hold good in an insignificant number of convicts. Service of a lower kind has of course its temptations to crime and the pinch of high prices is likely to drive men in that occupation to fall a prey to them. We thoroughly agree with the Commissioner when he requires a new sort of statistics to be introduced in regard to the classification by occupations as the principle of division. He proceeds to observe that 'what might be of interest would be to show, firstly, the proportion the total males in each occupation bear to the total provincial male population and, secondly, the proportion of males in each occupation incarcerated— the fluctuations then might tell us something.'

The treatment of juvenile criminals is another salient point in the report. The Inspector of Jails advertises to the fact that children are made the worse by being sentenced to short terms of imprisonment. There was a grave difficulty when a boy of twelve years old was sentenced to one year's *simple* imprisonment. It was in the boy's power to elect to work. The Superintendent of his jail could neither train him into habits of industry nor could he spare him from the contaminating influences of a jail population Whipping is no doubt a better mode of punishment than that of a short term. Col. Lane has eloquently marshalled his arguments in advocacy of a new reformatory or segregation of the juvenile criminals to some distant reformatory available. We quote from his report the note below: 'The girl of 13 convicted of bigamy must have been brought into association during her term with female convicts of the lowest type belonging to professional thieving tribes. I have on a previous occasion stated my opinion that almost every juvenile prisoner sent to a criminal jail, where there are no special arrangements for his treatment, comes out started on the path of a criminal career.' The Resident has expressed his strong approval for the institution of a reformatory & he is awaiting a formal proposal from the Commissioner for final sanction.

---

Exactly a year before, the whole nation rejoiced at the measures which the Govt. took to promote and receive the local manufacture of iron and steel articles. The resolution of the Govt. was a surprise upon the people and it aroused loyal and grateful feelings for the novel and unusual sympathy and encouragement of the Govt. for the prosperity of a national industry. But when the jubilations were over people found that the resolution was vague, indefinite and useless if not deceptive. The main section which permits the supply of iron and steel articles to the Public Works Departments runs as follows:—

"Having regard, however, to the representations contained in the memorial read above, and with the view of encouraging local industries and the devolpment of technical education, His Excellency the Governor General in Council has now resolved to modify, as a tentative measure, the existing orders prohibiting the local purchase of manufactured articles of iron and steel made up from imported materials. In so doing the Governor General in Council desires it to be clearly understood that this relaxation of existing rules is sanctioned solely in the hope of thereby effecting economy in the public administration, both by actual saving in the cost of articles purchased locally, and by avoiding the delays that are sometimes inevitable when the articles have to be procured by indent on England. It is not intended to sanction thereby a procedure in any degree of a protective nature, and firms that may obtain orders under this Resolution must be distinctly warned that no claim for compensation of any sort will be admitted in the event of its being found necessary to discontinue the practice of inviting tenders in India."

No further commentary is needed from us to explain how the Government claimed the high honour of a patron and the good name of an excellent ruler which it did not deserve at all. The encouragement to local industry and development of technical education are no doubt good phrases and are musical to our ears. But the scope of function and the limits to the authority that are settled in the following para will point out the truth of the proverb: 'They preyed for bread but got stone instead.'

'Nothing in this Resolution is to be taken as interfering with the discretion of the Local Governments concerned in regard to the employment of the agency of the various Government workshops for purposes of manufacture, or as implying that tenders must be called for in all cases from the firms named, or as restricting the power of the officers receiving the tenders to reject any or all of them as they may think fit.'

The above quotation is an improvement in the worst direction upon the last year's resolution. The Simla Gazette of 18th June contains this improved resolution which has given besides the names of some fourteen firms and the specifications of the conditions as regards the test and manufacture that are to be exacted in the case of iron and steel work. This recent order is sure to confirm and heighten the disappointment that we felt last year.

---

## वऱ्हाड

हवामान— या आठवड्यांत दोन तीन दिवस मिळून चांगला पाऊस पडला. उकाडा फार होता व अभ्रादि लक्षणें सर्व चांगलीं आहेत त्या वरून पर्जन्यकाळ विपुल व सुखावह होईल असें दिसतें. तूर्त साडेसहा इंचावर पाऊस झाला आहे. हगवण, ताप, खोकला वगैरे आजार विशेष आढळतात.

आह्मास कळविण्यास अत्यंत दुःख वाटतें कीं अकोटचे तहशिल्दार रा. रा. कृष्णाजी महादेव यांस गेल्या बुधवारीं देवाज्ञा झाली. मरतक शुळाची विकृती यांस असे आणि तीच स्वल्प काळांत विकोपास जाऊन त्यांचा अंत झाला. राजश्री कृष्णराव यांनीं अकोटच्या तहशिलीचें काम उत्कृष्ठ प्रकारें बजावून सर्वजणांस राजीखुषी राखलें होतें. हे गृहस्थ वचनाचे धड, अंतःकरणानें दयाद्र व कर्तव्यांत महादक्ष असे असून आपल्या सुशील, आनंदी, व निर्लोभी स्वभावानें आबालवृद्धांस आवडते झाले होते. अधिकारी वर्गांतील यांच्या मरणानें एक देवमाणूस हरपला!

अकोला येथील गोरक्षणी सभेचे चिटणीस रा. रा. व्यंकटेश अंबादास हे कळवितात कीं उद्या दोन प्रहरीं तीन वाजतां येथील श्रीलक्ष्मी नारायणाचे मंदिरांत या सभेचा पहिला वार्षिक उत्साह होणार आहे तेव्हां सर्व ग्रामस्थांनीं सुसमयाला अगत्यपूर्वक येण्याचें करावें

मि. एच. गाडविन आस्टीन यांस गेल्या दिसेंबरचे ४थे तारखे पासून आफिशिएटींग डेपुटी कमिशनर वर्ग ३चे नेमल्यामुळें त्यांच्या जागेवर वर्गा वर्गांत पंडित सुरज नारायण व कुमार श्री हरबानजी यांची अनुक्रमें स्पेशल असिस्टंट व पहिले वर्ग असिस्टंट कमिशनरचे अधिकारावर बढती केली.

परंतु पंडित सुरज नारायण अजमीरास जुडिशियल असिस्टंट कमिशनर झाल्या कारणा वरून त्यांच्या बदलींत मि. सी. इ. बिडल्फ असि० कमिशनर वर्ग ३ व कान्टनमेंट माजिस्ट्रेट शिकंदराबाद यांस असिस्टंट कमिशनर वर्ग २ १७ मे पासून नेमण्यांत आलें.

अकोल्याच्या वर्षोत्सव व्याख्यानमालेस परवां सायंकाळीं दोन वर्षां नंतर पुन्हा सुरवात झाली ही आनंदाची गोष्ट होय. रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी यांनीं 'फ्रेंच लोकांचा हिंदुस्थानांत उदय व उत्कर्ष' या विषयावर संभाषण केलें. इतिहासांतली ही गोष्ट सुगम व मनोवेधक वाटली. मनुष्यस्वभावांतल्या कांहीं खाणाखुणा वक्त्यांनीं व्यक्तपणें सांगितल्या त्या त्यांनीं उपसंहारादाखल सांपतच्या राजकीय व सामाजिक वृत्तान्तास लागूं केल्या असत्या तर त्यांचें चित्र हुबेहुब मनावर उठलें असतें परंतु त्यांनीं तें लांबणीवर कां टाकलें अगर मुद्दलांत कां गाळलें हें कळत नाहीं. इतिहास वक्त्यांनीं उघड उघड करून दाखविला व श्रोत्यावर पुढील विचारांची बाजू मुद्दाम सोपविली असावी परंतु तेणें करून उतावळा श्रोतृसमाज बोधपराङ्मुख व मग्नोत्साह झाला असावा असें दिसलें.

---

नोटीस.

नोटीस बेशमी फत्तेचंद हुकूमचंद दुकान भावनगर यांशीः—

खालीं सही करणार इंद्रसिंग आईदान दुकान अकोलें यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तुमचे कडेस आमचे दुकानचे मारु संमत १९४८ श्रावण शुद्ध १ चे खातें बाकीवरून रुपये मुद्दल १३०२ घेणें आहेत त्याचा हिशेब तुह्मांस प्रथम पाठविलाच आहे. सदरील रुपया बद्दल तुम्हांस पत्रद्वारें फार वेळां मागणें केलें असतां आज पावेतों तुह्मी रु. पाठविले नाहींत. करितां ह्या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं तुह्मी ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत आमचे वरील प्रमाणें मुद्दल रु. व्याजा सुद्धां मुंबईंत श्रीराम मोता यांचे दुकानावर भरून देऊन त्यांची पावती आमचे कडेस पाठवावी असें न केल्यास तुमचेवर दिवाणी कोर्टांत दावा करून सुरू मिती पासून एक रुपया शेंकडा व्याज आणि ह्या नोटीशीच्या खर्चा सुद्धां भरून घेतलें जाईल. कळावें. तारीख ३०-६-९२इ०

( सही. )

इंद्रसिंग आईदान दुकान अकोलें दस्तूर भोमसिंग रामलाल.

---

नोटीस

पांडु वल्लद बापु तेली वाघ रहाणार परगणें सेवली तालुके जालनापूर जिल्हे औरंगाबाद यांसः—

सारजी मर्द पांडु तेली वाघ राहणार प्रगणें सिंदखेड तालुके मेहेकर जिल्हे बुलडाणें प्रांत वऱ्हाड कारणें नोटीस देण्यांत येतें कीं, तू माझा लग्नाचा नवरा असून मी तुझी लग्नाची बायको. व तुझें माझ्याशीं लग्न लागून आज १४।१५ वर्षे झालीं. मी अज्ञान असतां रीती प्रमाणें तुझे घरीं येत जात असे. पुढें मी शहाणी होऊन आज आठ नऊ वर्षे झालीं. शहाणी झाल्यावर तुझें घरीं मी दोन वर्षे राहिले होते. परंतु जग रिती प्रमाणें तूं मला वागविलें नाहीं. ह्मणजे तुझे अंगीं पुरुषत्व नाहीं. या संबंधानें माझे वतीनें सिंदखेड व शेवलीकर पंच माझे आईबापांनीं मिळवून पंचाईत करून पचांनीं तुझी परीक्षा पाहिली असतां तूं खरोखर पुरुषत्वांत नाहीं असें ठरलें. तूं पुरुषत्वांत आहे किंवा नाहीं हें पहाण्या करितां दोन वेळां कोल्हाटणी आणिल्या होत्या. त्या बद्दल व पचांनीं जो जो खर्च सांगितला तो तो माझे आईबापांनीं दिला. कोल्हाटीण आणली त्या वेळीं तूं पळून गेलास. असें झाल्यावर पचांनीं पुन्हः एकत्र होऊन तुला सांगितलें कीं, इला स्टांप कागदावर दुसरा नवरा करण्याविषयीं फारकती दे. या प्रमाणें जातीनें ठरविल्यावरून तू कागद वगैरे आणऊन तूं लिहून देण्यास ही सिद्ध झालास. परंतु तुझा भाऊ नामें लक्ष्मण वल्लद बापु तेली वाघ यानें फंद करून कागद न लिहितां तुला पळविलें व आपण ही पळून गेला. हल्लीं तुझी स्थिती पुरुषत्वांत नाहीं असें मला व पंचास पक्कें समजलें आहे. तर मी कळविते कीं, आज पर्यंत तुझी वाट मी पाहिली. कीं, तू आज बरा होशील उद्या बरा होशील ही जी आशा होती ती अगदीं नाहींशीं झाली. मी आपले आईबापांचे घरीं लोकांचें कर्ज काढून आज ७ वर्षे पर्यंत राहिले त्यास माझे आईबांपाला कर्ज झालें आहे व तेही मला अन्नवस्त्र देत नाहींत. तर तूं मला दरमहा पांच रुपये प्रमाणें ७ वर्षांचा अन्नवस्त्रांचा झालेला खर्च ४२० रु. व या नोटीशीचा खर्च आणून द्यावा. ही नोटीश पावल्या दिवसांपासून पंधरा दिवसांचे आंत जर नोटीशी प्रमाणें अमलबारी तुजकडून झाली नाहीं तर मी रीती प्रमाणें दुसरा घरठाव करीन. कळावें. ता० २८।६।९२

( सही )

सारजी मर्द पांडु तेली वाघ इच्या हातची बांगडी.

---

## वर्तमानसार

व्यापार—जर्मन बंदराशीं कलकत्याचा व्यापार झपाट्यानें वाढत आहे असें पुढील आंकडे दाखवितात. सन १८८७ व ८८ सालीं कलकत्याचा जर्मन बंदराशीं ८० १/२ लक्षांचा १८८८।८९ सालीं ११० लक्षांचा ८९–९० सालीं १९८ लक्षांचा व पुढल्या सालीं २६८ लक्षांचा आणि १८९१ व ९२ सालीं ३०४ लक्षांचा व्यापार झाला. सदर सालीं कच्चीं कातडीं ६८ लक्षांचीं आणि ३८ लक्षांचीं धान्यें जर्मनींत गेलीं असें समजतें.

कोर्टफीचे स्टांप व तिकिटें ज्यांचे नांवचीं असतील त्याणच त्याचा उपयोग करितां यावा असा विचार चालला होता. त्याचा निकाल होऊन या पुढें दुसऱ्याचें नांवचे तिकिटांचा अगर स्टांपाचा कोणी ही उपयोग करूं नये असें सरकारानें ठरविलें आहे असें कळतें.

धन्यास आपल्या चाकरास कायदेशीर रीतीनें दंड करितां येत नाहीं. त्यानें पाहिजे तर त्यास घालवून द्यावें असा ठराव बंगलोरच्या डि० जज्जानें नोकरी करितां पैसा मागण्यासाठीं केलेल्या एका फिर्यादींत केला आहे.

ईश्वरीशासन— फैजाबाद येथील एका गवळ्यानें दुधांत पाणी घालून तें विकून पंन्नास रुपये जमविले, ते धोतराच्या पदरांत बांधून त्यास गांठ दिली. मग तो नदींत स्नानास गेला. तेव्हां सगळे कपडे नदी कांठीं ठेऊन स्नान करितां तो नदींत उतरला. इकडे एक मांकड आलें आणि रुपयांची गांठोडी बांधलेलें धोतर उचलून पळालें. तें नदींत लोळणाऱ्यावर ओळंबलेल्या झाडावर गेलें आणि तेथें रुपयांची गांठ सोडून एकेक रुपया त्यानें नदींत फेंकून दिला. गवळी बिचारा चुरमुरे खात स्वस्थ बसला. "तरीण सांठवी धारोधार, खुदा नेई एकच वार" ही म्हण वरील हकीकती वरून खरी ठरते.

विलक्षण हिशेब—एका आंकडे मोड्या व हिशेबी मनुष्यानें अनेक प्रकरणांवरून असें सिद्ध केलें आहे कीं सोन्याचें नाणें २०००-००००००० वेळां व रुप्याचें नाणें ३२५-०००००० वेळां हाताळलें म्हणजे त्यावरील छाप झिजून जाऊन चलनींत तें निरुपयोगी होतें.

कार्बोलिक आसीडचा वास सर्पास फार असह्य असतो. तो क्षार घरांत किंवा खोलींत ठेविला असतां घरांत किंवा खोलींत सर्प येऊं शकत नाहीं असें शास्त्रज्ञांनीं ठरविलें आहे. शु० सू०

रशिया हिंदुस्थानांत पाय घुसविण्याच्या खटपटींत असून त्याग सावण्याचे रस्ते टेहळीत आहे. हिरात, अफगाण आणि तुर्कस्थानचे रस्ते आपला हेतू पूर्ण करण्यास सहज उपयोगी पडतील, अशाबद्दल रशियांत वाटाघाट चालली आहे. परंतु काबूल कंदाहारच्या मार्गें चाल केली असतां अपयश येण्याचा संभव कोणता त्याची तपासणी चालली आहे. एवढा भयंकर प्रसंग असतां इंग्रज त्या तोंडचा विचार स्पष्ट करीत नाहीं. त्यांचा हेतू काय असेल तो त्यांचा त्यांस ठाऊक. इतकी गोष्ट खरी आहे कीं ज्या ठिकाणीं रशियन येणार, त्याच्या बदला ते येऊ शकणार नाहींत. हें वाक्य जितके गोड लागेल, तितके दुसरे कांहीं लागणार नाहीं. या साठीं आमच्या सरकारानें त्या बाजूचे तयारीस लागावें. एकवार रशियाचें पाऊल मध्यएशियांत शिरलें म्हणजे तें निघण्यास ज्या अडचणी येतील त्या आजच्या प्रसंगीं नाहींत असें आम्ही खात्री पूर्वक सांगतों परंतु एकवार मध्य एशियाचा तव्खडक रशियाच्या हातीं लागला कीं त्यांस चहो बाजूकडील दुसरे इंग्लिशाचे वैरी हातास हात देऊन चवो का पळो करून टाकण्याचा अधिक संभव आहे. रशियाचा पाडाव करण्यास इंग्लिश सत्ता जितकी जोरकस आहे तितकी पृथ्वीवर दुसरी जोरकस वार्ता ऐकू येत नाहीं; रशियाचा दिलजान दोस्त फ्रान्सचा राजा आहे. ते जर्मनीला आपलेसें करून इंग्लिशा विरुद्ध उभे रहाण्याचें धाडस करतील हें राज्यकुशल लोकांच्या डोळ्यापुढें नाचत असेल त्यांत संशय नाहीं. तथापि एकवार रशियाची मुर्खी मध्यएशियाला चिकटली म्हणजे मग ती समूळ नाहींशी होईल ही आशा केवळ चुकीची समजली पाहिजे.

म० नि०

पारिस मध्य हल्लीं एक डूरान नांवाचा गृहस्थ आहे, तो व त्याची बायको उंदीर घुशींस शिकवून त्यांचेकडून नाना तऱ्हेचे खेळ करवितात. या गृहस्था जवळ एकंदर दोनशें तीस उंदीर शिकलेले आहेत. हा गृहस्थ ज्या ठिकाणीं रहातो, तेथें त्यांच्या खोलींत ही मंडळी खुशाल मोकळी हिंडत असतात. त्याच्या खोलींत जावें तों हे विलक्षण प्राणी मोठ्या ऐटीनें दुडुदुडु धांवत असतात.

यांस अनेक गोष्टी शिकविल्या आहेत; परंतु मुख्यतः जी गोष्ट त्यास शिकविली आहे ती, एक भली थोरली आगगाडी रुळावरून चालवावयाची. हे रुळ पुष्कळ लांब पर्यंत टाकले आहेत, व त्यावर थोडथोड्या अंतरावर दोन तीन स्टेशनें बांधलीं आहेत. या कामासाठीं आठ उंदीर तयार केलेले आहेत. खेळाची वेळ होण्या बरोबर धन्याची खूण होते; त्या सरशी हे उंदीर आपल्या ठिकाणांतून बाहेर येतात. पिंजऱ्यांतल्या पिंजऱ्यांत त्यांस पोषाक चढविला जातो. पोषाख होण्याबरोबर प्रथम, तीन उंदीर—एक गार्ड, एक इंजन चालविणारा, व एक कोळसे घालणारा असे—बाहेर पडतात. दुसऱ्या एका बाजूचें दार उघडून उतारू मंडळी येतात. एक पांढरी उंदरी, तिच्याभोंवताली लहान मोठी चार पोरें व दुसरे कित्येक उंदीर येऊन प्लाटफार्मावर गर्दी करितात. व नंतर भराभर डब्यांची दारें उघडून आंत बसतात. कोणी इथें कोणी तिथें. इतक्यांत घंटा वाजते, आणि गाडीचा शीळ होऊन गाडी सुरू होते.

हें सर्व उंदिरांस शिकविण्यास फार दिवस व सायास लागतात. या आगगाडीच्या खेळांत मांजरांचें काम काय आहे तें विसरतां कामा नये. हीं मांजरें खुणेची निशाणें दाखवितात; व योग्य वेळीं मोठ्यानें 'मिआऊ' करून सावधगिरी राखतात. अशा तऱ्हेनें एका स्टेशनावरून दुसऱ्या, तेथें कांहीं उतारू सोडून पुढल्या, अशी ती गाडी जाते. खेळ संपल्या बरोबर त्या प्राण्यांचा धनी त्यांस कांहीं तरी उत्तम पदार्थ खाण्यास देऊन खुष करतो. करम.

सावकाराच्या कर्जाकरतां एका गरीब शेतकऱ्याची जमीन लिलाव होऊं लागल्या वरून तो नाशीकचे कलेक्टर मि. विंटर यांजकडे गेला व मी पांगळा असल्यामुळें शेत विकल्यास माझीं मुलें बाळें उपाशीं मरतील असें त्यांस कळविल्यावरून मि. विंटर यांणी त्यास १०० रुपये देवून कर्जमुक्त केलें असें तेथील पत्रावरून समजतें. असले अधिकारी हल्लींच्या काळांत क्वचित सांपडावयाचे हें उघडच आहे शेतकऱ्यानें पुन्हा कर्जबाजारी न होण्याची खबरदारी घ्यावी.

निझामसरकार नवीन तऱ्हेचें नाणें पाडण्याच्या तयारींत आहे. इमारत वगैरे तयार झाली असून लवकरच नाण्याची सुरुवात होईल. हें नाणें इंग्रजी सारखेंच व्हावयाचें असून त्यांची किंमत मात्र कमी राहण्याची आहे. निझामाची योग्यता जर इंग्रजापेक्षां कमी आहे तर निझामांच्या नाण्याची योग्यता किंमत ही कमी असणें सहजीकच आहे.

हावरा येथें एक गृहस्थ दोन घोड्यांच्या गाडींत बसून चालला असतां एका झाडावरून सहा फुट लांबीचा एक मोठा साप पटकन कोचमनाच्या आंगावर पडला, त्याबरोबर तो व त्याच्या शेजारीं बसलेला त्याचा मुलगा हे दचकून घोड्यांच्या काढण्या त्याच्या हातून सुटल्या आणि ते अगदीं घाबरून गेले. इकडे घोडेही दचकून बेफाम झाले, गाडींत बसणारा मालक उडी टाकून वांचला, पण गाडी एका कोपऱ्यावर जाऊन आदळण्या बरोबर गाडी मोडली, कोचमन चेंगरून मेला, मुलगा घायाळ झाला, घोडे दुखावले व सापही त्या झपाट्यांतच मरण पावला!

ठा० अ०


## जाहिरात

सर्वत्र लोकांस खालीं सही करणार यांजकडून—- या जाहिरातीनें असें कळविलें जातें कीं, सदाशिव वल्लद नारायणजी देशमुख यांनीं सन १८८४ सालांत मजपासून एक दस्तऐवज करून घेतला तो पोकळ आहे तो दस्तऐवज कोणी खरेदी अगर गहाण वगैरे घेतल्यास त्याजबद्दल मी कोणी णचेही प्रकारचा जबाबदार नाहीं म्हणून जाहिरात लिहून दिली सही तारीख २८माहे जून सन १८९२ इ०

( सही. )

चंद्रभान सूर्यभानजी देशमुख

र० मा० तर्फे हीसपूर

दस्तूर खुद.

नोटीस

रा० रा० सदाशिव वल्लद नारायणजी देशमुख रहाणार मौजे माझोड तालुके व जिल्हे अकोलें यांसः—

खालीं सही करणार यानकडून नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, सन १८८४ सालांमध्यें तुमचा माझ्याशीं आपसांत सल्ला होऊन तुम्ही मज पासून फसमतलबीनें एक करारनामा लिहून घेतला होता. तो दस्ता ऐवज रद्द करण्या साठीं त्याच सालांत पोष्ट मार्फत नोटीस दिली होती. व हल्लीं तुम्ही तो करारनामा कोणी आप्तवर्गास व सावकार लोकांस माझें नुकसानीचे इरादानें विकण्याचे विचारांत आहा असें समजल्यावरून या नोटिशीनें कळवितों कीं, तुमचे जवळचा दस्तऐवज लोकांस फसाविण्यास व मलाही त्रास देण्यासाठीं दिल्यास कोर्ट मार्फत रीती प्रमाणें तजवीज केली जाईल. या शिवाय माझें चुलत भावास तुम्हीं आपले भावाबरोबर सामील करण्यास फितऊन माझें नुकसान काढल्यास नुकसानी बद्दल व या नोटिशीचा खर्च तुम्हा जवळून घेतला जाईल. वरील रोख्याबद्दल मी कोणचे ही प्रकारें जबाबदार नाहीं. कळावें. तारीख २८ माहे जून सन १८९२ इ०

( सही )

चंद्रभान सूर्यभानजी देशमुख रहाणार मा० तर्फे हीसपूर द० खु०

नोटीस.

नोटीस वेशमी नानाचंद रायचंद दुकान भावनगर यासीः—

खालीं सही करणार इंद्रसिंग आईदान दुकान अकोलें याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुमचे कडेस आमचे दुकानचे मारुसंमत १९४८ श्रावण शुद्ध १ चे खातें बाकीवरून रुपये मुद्दल १२७३ येणें आहेत त्याचा हिशेब तुम्हांस प्रथम पाठविलाच आहे. सदरील रुपया बद्दल तुम्हांस पत्रद्वारें फार वेळां मागणें केलें असतां आज पावेतों तुम्ही रु. पाठविले नाहींत. करितां ह्या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं तुम्ही ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत आमचे वरील प्रमाणें मुद्दल रु. व्याजा सुद्धां मुंबईत श्रीराम मेता यांचे दुकानावर भरून देऊन त्यांची पावती आमचे कडेस पाठवावी असें न केल्यास तुमचेवर दिवाणी कोर्टांत दावा करून सुरू मिती पासून एक रुपया शेंकडा व्याज आणि ह्या नोटिशीच्या खर्चा सुद्धां भरून घेतलें जाईल. कळावें. तारीख ३०-६-९२इ०

( सही. )

इंद्रसिंग आईदान दुकान अकोलें दस्तुर भोमसिंग रामलाल.

नोटीस.

नोटीस झींगरापा वा। देवापावाणी राहणार कसबे नेरपरसोपंत तालुके दारव्हा जिल्हे वणी यासी खालीं सहीकरणार इजकडून नोटीस देण्यांत येत आहे कीं.

मी तुझी लग्नाची स्त्री असल्यामुळें मजला लहानपणीं तू आपले घरीं नेलें. सुमारें नऊ ९ वर्षें झालीं. तू मजला हाकून दिलें त्या दिवसा पासून मी आपले बापाचे आसऱ्यानें राहिले आणि माझा बाप गरीब असल्या मुळे मी सावकारी पैसा काढून मी आपला निर्वाह केला आता मी वयांत आल्यावर बरेच दिवस झाले, ऋतु प्राप्त झाला परंतु तु आपले घरीं नांदविण्यास नेत नाहींस करीतां या नोटीशीनें कळविण्यांत येत आहे कीं आजपासून १५ दिवसांचे आंत मी सावकारी पैसा काढलेला सावकाराचा देऊन मजला नांदविण्यास घरीं घेऊन जावित तसें न केल्यास रिती प्रमाणें कोर्टांत दावा करीन कळावे ता. २८।६।९२ इ०

( सही )

जनी मर्द झिंगरापा वाणी ईच्या हातची बांगडी.


☞ हें पत्र अकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाचें आगाऊ रु० ५ डांक हाशील ०।१।३
सहामाही " ३ " ०।८
सालअखेर " ७ " १।०८
किरकोळ अंकास ..........................०।४

| | Rs. | | | |
|---|---|---|---|---|
| Annum in advance | 5 | Postage | 13 | as |
| Annum in arrears | 7 | ,, 1Rs. | 6 | as |
| Six monthly............ | 3 | " | 8 | as |
| Single copy.............................. | | | 4 | as |

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।१।६
दुसरे खेपेस ..........०।१

# वऱ्हाडसमाचार.

Advertisements
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition per line3as

## THE BERAR SAMACHAR

VOL XXVI AKOLA MONDAY 11 JULY 1892 NO 27

वर्ष २६ अकोला सोमवार तारीख ११ माहे जुलै सन १८९२ इ० अंक २७



## जाहिरात

—— 0 ——

अहो स्वदेश बांधवहो, परदेशी औषधी लुसत्या रंगबाज व कमिशन जास्त पाडून कां फसतां? इकडे थोडे लक्ष द्या.

आमचे दवाखान्यांत सर्व रोगांवर औषधी विक्रीस व दरिद्री लोकांस फुकट तयार आहेत; परंतु त्यांत ज्या हटकून गुण खात्रीनें देतात त्यां पैकीं थोड्या प्रसिद्धीस देतों. त्यांतून जी दवा कोणास लागेल त्यांनीं खालीं लिहिलेले सहीचे पत्यावर पत्र पाठवावें. ह्मणजे आम्ही व्ह्याल्युपेबलनीं पोस्टमार्गें लवकर पाठवूं. व कोणी आजारी आमचे येथें येऊन औषध घेतील त्यांस प्रथम दुरुस्त करून ठरलेली किंमत मागाहून घेऊं.

हमेशा घेणारे ग्राहकांस कमिशन देऊं. व त्यांनीं विक्री करून दाम पाठवावें.

१ गजकर्णावर रामबाण, ६ दिवसांत गुण किंमत दर बाटलीस ०८ आणे.

२ मूळव्याध कितीही दिवसांची दुर्धर असेल त्यावर मोडावर लावण्याचे व पोटांत घेण्याचें दोन औषधी मिळून किं. १॥ रु.

३ चातुर्थिक ज्वर ह्मणजे चवथारें हिंव ताप त्याच प्रमाणें तिजारें, व दररोज येणारे कितीही दिवसांचे असो, त्याजवर मिश्रित औषध एकच बाटली पुरे. किं. १॥ रु. दुसरें औषध गोळ्या खात्रीच्या २१ गोळ्यांच्या डबीस १०९ या औषधानें कडक तापही जातो.

४ परमा तिडिक व स्वप्नावस्था, व कोठ्यांतील उष्णता व क्षिणता या सर्वांवर मेहुणपुडा किं. १ पुड्यास ०।१४ आणे.

५ बाळंत रोग बाळाचे डबे व सटवी बाधा व प्रदर सर्व तऱ्हेचा किं. १ डबीस १॥ रु.

६ वीस प्रकारचे मेहापैकीं १६ मेहावर १४ गोळ्यास किं. २॥=

७ नारुवर २ दिवसांत गुण. लावणें व खाणे याच्या डबीस किं. ।=

८ गुल्म पांच प्रकारचे व सर्व पोट शुळांवर व गोळ्यावर व पानथरीवर १ डबीस किं. ॥।

जुलाब उत्तम राजस तकलीफ अगदीं नसून कोठा साफ १ बाटली १० मनुष्यास पुरेल किं. १। रु.

१० मेदोरोग व घुरें व उन्माद यावर अगदीं जलद गुण १ बाटलीस किं. २ रु.

११ स्त्रियांचे रक्तस्राव व ऋतुस्नात होण्यास व गर्भधारणास बंदेज ह्यांवर हें एकच औषध फार चांगलें आहे. १ डबीस किं. १॥

१२ पिनस व मस्तकशूळ व अर्धाशिशी यावर दर डबीस किं. १०=

१३ हागवण व अतिसार १ डबीस किं. १।=

१४ वृषण एकारस्यास व वृद्धीस १ डबीस किं. १ रु.

१५ कावरले कुत्रें व कोल्हे व तेल्या उंदीर डसल्यास १ डबीस किं. १। रु.

१६ मेहानें अगर उष्णतेनें पाप उलून रक्त जाणें व संधि दुखणें ह्यावर १ डबीस किं. १॥ रु.

१७ महामारीवर अगदी जलद गुण एक मनुष्यास १२ गोळ्या ६० गोळ्याच्या डबीस किं. १०—

१८ गर्मी उर्फ उपदंश संबंधी विकार क्षतें यांजवर १ डबीस किं. १॥ रु.

१९ फसली उर्फ मज्जागतवात व शूळ याजवर लवकर १५ मिनिटत गुण १ डबास किं. ॥ हें १५ मनुष्यांस पुरेल.

२० कऊळ, नळगुद, पंडु, सूज व मुखरोग ६५ व सन्निपात १३ यांवर १ डबीस किं. १॥ रु ही ३ मुलें व २ पुरुषांस पुरेल.

२१ सुवर्णमालिनीवसंत खात्रीचा १ तोळ्यास किं. ७ रु.

२२ योगराज गुगुळ १ तोळ्यास ४॥ रुपये.

२३ नामर्द ह्मणजे नपुंसक कितीही दिवसांचा असो तरी तो तीन दिवसांत दुरुस्त खात्रीनें होईल. १ बाटलीस किं. ३ रु. गुण न आल्यास पैसे परत मिळतील.

२४ डोळ्यांतील फूल वडस रातांधळे लाली खुपरी चुळ चीपडे गळती याजवर १ डबीस किं. १०६

या शिवाय जास्त माहिती मागविल्यास देऊं. व कोणी योग्य औषधें हमेश मागवून विक्री करील त्यांनीं विक्री करून पैसे मागाहून पाठवावे.

(पत्ता व सही) शिवचरनगीर रामगीर
वैद्य पुरणखेडकर अकोला गंगाधरचे
माडीवर चौकांत दवाखाना.
वऱ्हाड.


---

नोटीस

रा. रा. माधव भवानी लोहारे सोनार राहणार अकोलें यांसः—

खालीं सह्या करणार यांजकडून देण्यांत येतें कीं तुह्मी आह्मी सहोदर बंधू असोन सन १८९० इसवी साला पावेतों एकत्र राहीलों त्यापुढें तुमचे आणि आमचे न बनल्यामुळें पंचानुमतें आपल्या मध्यें स्थावर आणि जंगम जिंदगीच्या वाटण्या होऊन आपापले हिस्से कबजांत घेतलें व त्या प्रमाणें अजवर उपभोग घेणें ज्यारी आहे त्यांच वेळेस आपले दरम्यान लेखी फारखत्या होऊन त्या नोंदून घ्याव्या असेंही ठरलें होतें परंतु अजवर तसें करणें विषयीं तुम्ही धजत नाहीं दुसरें असें कीं वेगळा जाल्यावर आह्मी तुम्हांस बनसीलाल मुकुंदलाल आणि मुकुंदलाल नन्हामल या उभतांचे येथें जामीन होऊन कर्जाउ रुपये काढून दिल्हे त्याचीही आद्यापी तुह्मी फेड केली नाहीं यासाठीं कळविलें जातें कीं ही नोटीस पावल्या पासोन आठ दिवसांत फारखती लिहून व नोंदून द्यावी किंवा त्या बाबे कांहीं तकरार असल्यास ती कळऊन तिचा योग्य प्रकारें पंचांत अगर कोर्ट मार्फत निकाल करून घ्यावा आणि सावकारांचे कर्ज फेडून आह्मांस जामीनकींतून मुक्त करावें या प्रमाणें न केल्यास वाटणीचे बाबतींत तुमची काहीं तकरार नसोन तुह्मांस ती मान्य आहे. असें समजलें जाईल. व तीनशें रुपयाचा हिस्सा घरावर ज्यास्त तुम्हांकडे आमचे राहिले आहेत. कळावें तारीख ४।७।९२ इ.

सही.

१ रामचंद्र भवानी सोनार राहणार अकोलें दस्तुर खुद्द.

१ नथु भवानी सोनार राहणार अकोलें दस्तुर खुद्द.

---

## बरार रूरल लॉ.

(२५ वे अंकावरून पुढें चालूं.)

चेअरमन :—

२५ जिल्हा बोर्ड किंवा तालुक बोर्डचे प्रत्येक सभेंत बेरार रुरल बोडर्स यांतील कलम १६ यांत सांगितल्या प्रमाणें निवडलेला किंवा हुद्याच्या नात्याचा (एक्स आफिशिओ) जसें असेल तसें चेअरमन अगर व्हाईस चेअरमन अध्यक्षस्थानीं असावा. ह्यास विचार करून (डेलिबरेटिव्ह) मत देता येतें. व जेव्हां उभयपक्षीं मतें सारखीं पडतील तेव्हां त्यास निर्णयक (कास्टिंग) मत देतां येतें.

सेक्रेटरी :—

२६ प्रत्येक जिल्हा व तालुक बोर्डानें आपआपला सेक्रेटरी नेमावा. तो बोर्डचा मेंबरच असला पाहिजे अशी जरुरी नाहीं. त्याणें बोर्डचा सर्व पत्रव्यवहार चालवावा व हिशेब ठेवावे. व प्रत्येक सभेचें काम नेहमीं दाखल्या करितां ठेविलेले मिनिट [टिपण) बुकांत लिहीत जावें ह्या लेखावर चेअरमन व सेक्रेटरी याणीं सही करावी. व तो बोर्डचे प्रत्येक मेंबरास पहाण्यास मोकळीक आहे. सेक्रेटरीची नेमणूक कमिशनरचे मंजुरीनें केली पाहिजे.

सभेची नोटीस :—

२७ प्रत्येक सभेकरितां नेमलेल्या तारखेचा व त्या सभेंत साधारण परत्वें ज्या कामासंबंधीं वाद विवाद होण्याचा त्याबद्दल योग्य नोटीस सेक्रेटरी यानें जिल्हा बोर्ड व तालुक बोर्डचे मेंबरांस द्यावी.

सभेंतील कोरमः—

२८. काम करण्या करितां जिल्हा किंवा तालुक बोर्डचे एकंदर मेंबराच्या संख्ये पैकीं $\frac{1}{2}$ कोरम समजले जातील. परंतु अशा कोरमांत निवडल्या मेंबरांपैकीं एका पेक्षां कमी इसम असूं नयेत. जेथें एकंदरीचा एक चतुर्थांश पूर्ण संख्या व अंश होतो तेथें पूर्ण संख्या कोरम होते. निमेहून कमी नाहीं इतके निवडलेले मेंबर असले पाहिजेत.

चेअरमन याणी क्रमाचे कामाची व्यवस्था ठेवणें:—

२९ चेअरमन याणीं जें काम सभेपुढें आणावयाचे त्या सर्व कामांचे क्रमाची तजवीज ठेवावी. व बंदोबस्त ठेवावा.

सूचना किंवा तींत केलेली दुरुस्ती अनुमोदनानें होणें:—

३० प्रत्येक सूचना किंवा तींत केलेली दुरुस्ती योग्य प्रकारें अनुमोदीत झाल्यावर जर त्या संबंधीं मतभेद होईल तर त्याबद्दल मत घेण्या पूर्वीं ती लिहून ठेवावी.

सभेस लोकांना येण्यास प्रायः मोकळीक आहे:—

३१. जिल्हा बोर्डचे किंवा तालुक बोर्डचे सभेंत लोकांस येण्यास प्रायः मोकळीक आहे परंतु हजर असलेले मेंबरां पैकीं दोन तृतियांशानीं मान्य केलेले सूचने वरून परकी लोकांस सभेचे बाहेर जाण्यास सांगावें.

सभेस जाण्याचा हक्क असणारे आफिसरः—

३२सानिटरी कमिशनर, डायरेक्टर आफ पब्लिक इनस्ट्रक्शन, जिल्ह्याचे सिव्हिल सर्जन डिव्हिजनचे एक्झिक्युटिव इंजिनियर व जिल्ह्याचे डे० ए० इन्स्पेक्टर यांस जिल्हा बोर्डचे किंवा तालुक बोर्डचे कोणतेही सभेंत येण्याचा व त्यांस त्यांच्या खात्या संबंधाच्या कोणत्या ही गोष्टीबद्दल बोलण्याचा हक्क आहे.

विशेष सभा: ...

३३. जिल्हा बोर्ड किंवा तालुका बोर्डची प्रत्येक सभा विसर्जन होण्या पूर्वीं पढील साधारण सभेची तारीख मुकर केली जावी. परंतु चेअरमन यांनीं डे० कमिशनरचे मंजुरीनें कोणतेंही वेळीं तसें करण्यास योग्य कारण उत्पन्न झाल्यास विशेष सभा भरावी.

सभेचे प्रोसिडिंगाची नक्कल:—

३४ जिल्हा बोर्डाच्या किंवा तालुक बोर्डाच्या प्रत्येक सभेच्या प्रोसिडिंगाची नकल जिल्ह्याचे दिपुटी कमिशनर यांजकडे माहिती करितां लागलींच पाठवावी. दिपुटी कमिशनर यांनीं जिल्हा बोर्डाच्या प्रोसिडिंगाची नकल कमिशनरकडे पाठवावी आणि कमिशनर तसा हुकूम करतील तर तालुक बोर्डाच्या प्रोसिडिंगाची ही नकल पाठवावी.

कमिशनर अगर दिपुटी कमिशनरा कडून सूचना : ....

३५. एखाद्या जिल्हा बोर्ड किंवा तालुक बोर्डच्या सेक्रेटरीकडे कमिशनर किंवा दि० कमिशनर यांजकडून एखाद्या गोष्टी बद्दल लेखी सूचना आल्यास ती पुढील सभे पुढें आणली जाऊन तिजविषयीं पूर्ण विचार केला जावा. व रीती प्रमाणें ठराव लिहिला

नावा.

वऱ्हाडसमाचार

मिती आषाढ वद्य १ शके १८१४

( मागील अंकावरून पुढें चालूं )

जमाखर्चा संबंधानें पाहतां सर्व धर्मार्थ दवाखान्यांचें मिळून रुपये ८८०९६-१३ आ० ९ पै उत्पन्न असून खर्च रु० ५९,९२६-१४ आ०-५ पै झाला आहे. उत्पन्नाच्या बाबी ह्मणजे सरकार मार्फत मदत लोकलफंडा कडील रक्कम, मुनसिपल वर्गणी ठेवीवरील व्याजें, आणि लोकांच्या देणग्या अशा पांच आहेत त्यांत १०० रुपये खर्ची मागें सरकारांतून मिळणाऱ्या मदतीचें प्रमाण रु० ५७-७ आ. ११ पै पडतें. खामगांवच्या धर्मार्थ दवाखान्याला सरकारांतून कांहीं मदत लागत नाहीं. तेथील मुनसिपालिटीच सर्व खर्च भागविते. लोक दवाखान्या प्रीत्यर्थ देणग्या देत नाहींत ह्मणून मोठी ओरड केली आहे परंतु त्यांतही विशेष गोष्ट एवढीच कीं युरोपियन लोकांनीं अवघी २३रुपये वर्गणी दिली असून नेटिवांच्या वर्गण्या चार हजार रुपयावर गोळा आहेत. लोक गरीब व करांच्या बोज्या मुळें नादान असल्यानें वर्गण्या व्हाव्या तशा जमा होत नाहींत तरी सानिटरी कमिशनरनीं वर्गण्या प्रत्येक दवाखान्या मागें नियमित आंकड्या खालीं जमल्यास तो दवाखाना बंद ठेवण्यांत येईल अशी दहशत घातली परंतु तें त्यांचें ह्मणणें यथार्थ नसून वरिष्ट सरकारला पसंत पडूं नये. ऑलिशान रेसिडेंट साहेबांचा अभिप्राय पडतो कीं मुनसिपालिटी नाहीं अशा ठिकाणीं असलेल्या दवाखान्याचा खर्च जिल्हा बोर्डांनीं आपापला संभाळावा, सरकारला काय मदत करणें असेल ती मोघम एका रकमेनें करण्यांत यावी आणि बाकीचा सर्व कारभार बोर्डांनीं संभाळावा. हें सामर्थ्य बोर्डांनजवळ असावें ह्मणून देणगी देणाऱ्या लोकांची नामावळी संस्मरणीय होऊन लोकांचितनांत यावी अशी तजवीज त्या लोकांच्या उत्तेजनार्थ नव्या सरक्युलरानें करण्यांत आली आहे परंतु त्या बरोबर लोकांच्या जवळ पैसा देण्याचें साधन सरकारें शोधून काढलें नाहीं ह्मणून दिलगिरी वाटते.

कर्नल मेकंझी साहेबांनीं सिव्हिलसर्जन डाक्टर, रो, जोन्स, हेनड्रीक, व मि. दुर्गया पिले यांची मोठी प्रशंसा करून अकोल्याचे सिव्हिल सर्जन रलो यांजविषयीं लिहितात कीं, हे गृहस्थ उत्साही व सद्बुद्धीचे आहेत तरी त्यांचा स्वभाव त्यांच्या ताब्यांत नाहीं व त्यांच्या अंगीं युक्तिचातुर्य नाहीं ह्मणून चांगले उपयोगी पडतात असें विरळा घडतें! या सरटीफिकीटाहून सदहू गृहस्थांची किंमत ठरविणें आह्मी वाचकांवरच सोंपवितों.

---

आयर्लंड व हिंदुस्थान या दोन देशांची स्थिती राजकीय हक्का संबंधानें सारखी आहे किंबहुना आयरलंडा पेक्षां हिंदुस्थानची स्थिति अगदीं निकृष्टावस्थेची आहे असें ह्मटलें असतां हरकत नाहीं आयरीश लोक कसे ही असले तरी गोरे लोक आहेत व ते राज्यकर्त्यांचे बांधवगणांत मोडतात आणि हिंदुस्थानचे लोक काळे असून परधर्मी, परद्वीपस्थ, व पादाक्रांत असें आहेत तेव्हां त्या उभय देशाची राजकीय प्रकरणांत तुलना करणें फायद्याचें नाहीं तरी आमचे सरकारचे वर्तना पासून आमच्या भाग्योदयाचा काल केव्हां येईल याची अटकळ आयरलंडच्या माहितीवरून होण्या सारखी आहे. आयरलंडचा राज्यकारभार आयरलंडांत नवें पार्लमेंट स्थापून आयरिश लोकांच्या हातीं स्वतंत्रपणें द्यावा आणि त्यावरील नियंत्रणाची सत्ता ब्रिटिश पार्लमेंटाच्या हातांत ठेवावी ह्मणून कित्येक वर्षां पासून जगविख्यात वृद्ध गृहस्थ मि. ग्लाडस्टन यांचें ह्मणणें आहे. सन १८८६ मध्यें आयरलंड प्रकरणांतच ग्लाडस्टन साहेबांची प्रधानकी विलयास गेली, निरनिराळ्या छळकारक कायद्यांनीं आयरिश लोकांची प्रधान मंडळीनें हाल अपेष्टा केली, भयंकर प्रकार आयरलंडांत पार्लमेंटाच्या स्थापने प्रीत्यर्थ घडून आले आणि तोच प्रश्न सध्यां चाललेल्या निवडानिवडीच्या दंग्यांत एक प्रधान विषय आहे. आयरलंडला स्वतंत्र पार्लमेंट दिल्यानें इंग्लंडचें वर्चस्व कांडीमात्र कमी होत नसून ही इंग्लिश लोकांचा असा दुर्धर कडवेपणा, अपमतलबी अधिकारलालसा, व स्वजाती यांशीं कपटवर्तन हीं वर्षांनुवर्षें कायम आहेत ही मोठी दुःखाची गोष्ट होय. आयरलंडला पार्लमेंट न मिळाल्यानें ब्रिटिश पार्लमेंटाचा एक चतुर्थांश वेळ आयरलंडाकडे खर्च होतो, आयरलंडचे क्षुल्लक प्रश्न घोटीत बसल्यानें राष्ट्रीय प्रकरणांचा नीट विचार होत नाहीं. आणि गेल्या दहा वर्षांत पार्लमेंटाच्या रिपोर्टींचीं ९५६४५ पृष्टें भरलीं आहेत त्यांत आयरलंडा साठीं ५०६१४ पृष्टें मजकूर भरला असून ही त्या देशांत स्वस्थता व शांतता नाहीं तेव्हां यावरून सिद्ध होतें कीं आयरलंडच्या पायीं एवढें नुकसान होत असून ही इंग्लिश लोक आपला हटवाद सोडीत नाहींत. या आयरलंडच्या प्रकरणांत चालूं पार्लमेंटाच्या निवडा निवडींत किती दूही, फाटाफुटी व पक्षप्रतिपक्ष होतात हें पाहण्याकडे सर्वांची दृष्टी लागली आहे.

आयरलंडची ही स्थिती आहे तर आमच्या हिंदुस्थानची काय वाट? हिंदुस्थानच्या एका नेटिवाचा पार्लमेंटांत सभासद या नात्यानें शिरकाव नाहीं. शेट दादाभाई नवरोजी व लालमोहन घोस असे दोघे गृहस्थ पार्लमेंटांत निवडले जावें ह्मणून विलायतेस जाऊन राहिले, तिकडील लोकांपाशी या देशाच्या नांवानें रदबदली केली, आणि स्वतां सभासद होण्यापासून हिंदुस्थानचा भावी फायदा त्यांनीं दाखविला तरी देखील त्यांस यशप्राप्ति नाहीं. ही स्वल्प तजवीज सिद्धीस गेली नाहीं तेव्हां हिंदुस्थानच्या बतीनें पार्लमेंटांत सभासद धाडण्याचा अधिकार मिळण्याचा संभव कितपत आहे याची आह्मांस कल्पना ही करितां येत नाहीं. आयरलंड देशाचा विस्तार तो किती आणि हिंदुस्थानांत ह्या एखाद्या प्रांताप्रमाणें शोभणाऱ्या या देशाचा पार्लमेंटांत शिरकाव व्हावा इतकेंच नव्हे तर त्या देशाप्रीत्यर्थ पार्लमेंटाचा अमोल व बहूत वेळ खर्चला जावा व त्या बरोबर हिंदुस्थान देशाला पार्लमेंटांत ठाणें ही असूं नये ही केवढी अन्यायाची व क्षुद्र विचारांची दृष्टी आहे बरें! आयरलंडला निराळें पार्लमेंट पाहिजे तसें आह्माला राजकीय हक्क काहीं नकोत. आमच्या देशाची सर्व स्थिती साग्र समजून घेऊन नंतर आमच्या योग्य, कायदेशीर व राजनिष्ठेच्या मागण्याचा विचार करा एवढीच राष्ट्रीय सभेची विज्ञप्ती आहे तिजकडे कोणी लक्ष ही देत नाहीं. अशा दुःखद, नामर्दपणाच्या, व आंधळ्या राजनिष्ठेच्या ऋणांतून आह्मी मुक्त होऊन स्वतंत्रपणाचे राजकीय हक्क व अधिकार उपभोगूं लागण्याचा काल किती दूरवर आहे हें आर्यलंडच्या इतिहासावरून लक्षांत येईल. निराशेचे असे विचार मनांत घोळूं लागले ह्मणजे ह्यूम साहेबांच्या उद्गारांची पदोपदीं आठवण येते. हिंदुस्थानच्या प्रजेचें गाऱ्हाणें सरकार ऐकणार नाहीं तर मोठी क्रान्ती होईल असें ते ह्मणाले परंतु आह्मास आमच्या जन्माभ्यासावरून वाटतें कीं त्या प्रकारचीच अवहेलना चालूं राहिल्यास कालान्तरानें नेटिव लोक पृथ्वीच्या पाठीवर नेटिव लोक या नात्यानें अस्तित्वांत राहतील किंवा नाहीं याची आह्मास मोठी शंका आहे.

---

प्रसिद्ध पार्शी शेट दादाभाई नवरोजी हे एकटेच फिन्सबरी तर्फे पार्लमेंटाच्या निवडा निवडनिवडींत उमेदवार आहेत व बहुतअंशीं त्यांस यश येईल अशी लक्षणें दिसतात. हिंदुस्थानचे खरे हितकर्ते, व सालिसबरींचा 'काळा मनुष्य' पार्लमेंटांत सभासद निवडले गेले तर आम्हा हिंदुस्थानच्या लोकांस परमानंद वाटेल. त्यांस निवडल्यानें एक सभासद हिंदुस्थानच्या बतीनें होईल एवढेंच नाहीं तर हिंदुस्थानांतील मनुष्य ही काहीं काल विलायतेस राहिल्यानें, व नैसर्गिक गुणसामर्थ्यानें पार्लमेंटाच्या सभासदाच्या पदवीला पोंचण्यास नालायक नाहीं असें ठरणार आहे. आणि हा सुदीन आमच्या दैववशें थोडक्यांत प्राप्त होईल अशी आम्ही उमेद बाळगतों.

शेट दादाभाई नवरोजी यांस पार्लमेंटचे सभासद निवडले असल्या विषयीं आनंदाची बातमी तारेनें कळली तीं आम्हीं मोठ्या संतोषानें प्रसिद्ध करितों आणि फिन्सबरी येथील लोकांच्या या महदुपकारा बद्दल आम्हीं त्यांचे फार आभार मानतों.

---

रा. रा. औंध बिहारीलाल बी. ए. यांनीं वायव्य प्रांताच्या सरकारापाशीं डेपुटी कलेक्टरची जागा मागितली होती आणि त्या मागणीच्या अर्जाबरोबर आपली विद्वत्ता, योग्यता व कर्तृत्व या संबंधानें थोर थोर गृहस्थांचीं दाखल्याचीं पत्रेंही खात्री साठीं पाठविलीं होतीं. त्यांचा अर्ज नामंजूर करण्यास कारणें दाखविण्यांत आलीं तीं अशीं कीं त्यांनीं राष्ट्रीय सभे संबंधानें कांहीं महिने काम केलें होतें तेव्हां त्यांचे विचार वायव्य सरकारास पसंत नाहींत; शिवाय केन प्रभृति साहेबांच्या आश्रयानें हिंदुस्थानांत मद्यादि मादक पदार्थांच्या सेवनाच्या निषेधार्थ मंडळ्या स्थापल्या गेल्या त्या पैकीं मंडळींत हे मुख्य आहेत तेव्हां त्यांचे विचार सरकारच्या अपकारी खात्याच्या तत्वाला प्रतिकूळ आहेत म्हणून त्यांची योजना सरकारी अधिकारावर करितां येत नाहीं. इंग्रजी राज्यांत विचारस्वातंत्र्य नेटिवांस कितपत लाभतें याचें उत्कृष्ट उदाहरण ही वरील गोष्ट होय.

---

मोहाच्या फुलाचा कायदा मुंबई सरकारनें प्रचंड लोकमतास झुगारून देऊन अखेर पसार केला. हिंदुस्थानांत राज्यकर्ते व प्रजा यांच्या मध्यें विरोधी विचार असतात आणि प्रजेला राजा वाटेल त्या कायद्यानें चिरडून टाकतो याचा हा एक मासला होय. लोक मोहाच्या फुलाची दारू राजरोस व चोरून पुष्कळ तयार करितात आणि ती सर्व पिऊन फडशा करितात त्याअर्थी लोकांचें व्यसन कमी व्हावें ह्मणून मोहाच्या फुला संबंधानेंच कायद्यानें कडक अटी ठेविल्या आहेत. पिनल कोडचे अपराध व विशेष अपकारी सारख्या कायद्याचे अपराध इतके व्यापक आहे कीं, त्यांनीं लोकांस स्वैर व स्वैच्छ फार करून सोडलें नाहीं. इतकें असून त्या अपराधांच्या माळेला लोकांच्या निरुपद्रवी कृति अपराधस्वरूपानें जोडल्या आहेत ही मोठी चूक झाली असून प्रजेची फार हानि आहे. शिवाय सरकारी अंमलदारांनीं दाखविलेल्या गोष्टी खऱ्या व निर्णयात्मक ठरल्या नसून कायदा करण्यांत आला. सर्वांत विलक्षण प्रकार असा कीं सर्व वर्तमानपत्रें इंग्रजी व मराठी सरकारी कायद्यास प्रतिकूल आहेत असें पाहून गव्हरनर लार्ड हॅरि स यांनीं त्यावर टीका केली आणि सरकारी बाजू दाखविणारें कोणतें ही वर्तमान पत्र नाहीं ह्मणून इंडियांत कायदे कौंसिलाचे कामास फार अडथळे येतात अशी ओरड केली. खरोखर वर्तपत्रकर्त्यांची तशी जूट असणें इंडियांतील नानाविध मताच्या नेटीव व युरोपियन लोकांत दुरापस्त आहे.

---

The Berar Samachar

MONDAY, JULY 11 1892

Our cordial thanks are due to Col. C. T. Lane for his able, exhaustive, and learned report on the Police administration in Berar for the year 1891. The first part of it deals with the effects of police action in regard to the suppression of crime while the second part is devoted to discuss the internal economy of the police force. The crime-registers grow in volume every year and the number of grave offences affecting the safety of purse and person is on a rising scale; while the police department is sinking gradually in its numerical strength and losing also in its efficiency to cope with the increasing duties as sentinels of life and property. It is disappointing to notice these two patent facts in the annual document. We are pained to see that an officer of Col. Lane's administrative capacities and persevering energies should record a confession of his inability to make his department a thoroughly satisfactory and efficient one. His is not a sweeping condemnation of his own department. But he is not pleased with the conduct and discipline of some of the District Superintendents. He reveals in the midst of his remarks the better side of his nature when he condemns the increase in departmental punishments. 'The truth is that an officer makes his men what they are as a body, and when a District Superintendent professes

himself unable to "curb growing insubordination" or to make his men look up to him "as District Superintendents were looked up to in days gone by," he merely proclaims his inefficiency for the charge he holds.' His criticism on the unfair and inelegant behaviour of some of the officers is rather disagreeable though not vindictive. He seems to be vexed with his own department when he is not free in his action & has to travel long through the official formula of sanctions and approvals before he introduces his own reforms. The internal economy is brief ly summarized in the Resident's review in the now stating para:—

"The total sanctioned strength of the force is shown at 2,876 of all ranks. This is not a large number to meet the growing requirements of the province, and the Judicial Commissioner has pointed out that the proportion of men withdrawn from civil duties for employment as guards and on reserve duties is excessive. The large number of vacancies in the ranks and the difficulty of getting recruits to fill them has compelled the Inspector General to relax the existing rules about the proportion of Mahomedans and the enlistment of up-countrymen. The Resident does not regard a larger admixture of foreigners as altogether to be regretted. For one cause and another police service does not attract many of the right class of men in Berar, and an increase of the foreign element will help to stiffen local material. The report of the working of the small detective force recently entertained is not very satisfactory, but there are special difficulties to be overcome, and it may be hoped that later on the Inspector General will be able to show a better state of things. The Resident shares the Inspector General's regret at the increase in the number of departmental punishments, but he observes that there has been nearly as large an increase in the number of judicial punishments, and under both heads the greatest increase occurs in the districts of Amraoti and Bassim. This seems to indicate that the discipline of the force in general is not what it ought to be, and undoubtedly the District Superintendent is the officer upon whom the chief responsibility must rest for such a state of things. The Inspector General's remark that taking the men as a whole they are what their superior officers make them is quite sound; and if it is a fact that the rank and file of the Amraoti district are insubordinate and disrespectful in any marked degree, the fault probably lies in defective local supervision. The Resident does not perceive any ground for supposing that the Inspector General's action in dealing with appeals has had anything to do with the matter."

We hope that the Local Govt. would soon place the Inspector-General in a position to organize anew his police force in such an efficient manner as to effect a salutary check upon the increase of crime. With the increase in population there must be a corresponding increase in crime. Perhaps offences may be growing but the population may be increasing still faster. The fluctuations in social conditions also affect the volume of crime. The rise and decay of political and industrial life as well as the ebb and flow in the concentration of commercial towns effect a great change into the statistics of crimes. It is an open truth that great cities of today like Bombay are the nurseries of modern crime. As civilization advances men look upon their dear possessions with strict and severe watchfulness and cultivate tendencies of conflicting and selfish motives. This change of circumstances gives rise to a new series of crimes against life and property. So there are many causes at work which create offences of different varieties and to check this silent work of imperceptible but highly effective agencies we must adopt measures that will amplify suitably our means and appliances. The Judicial Commissioner has reviewed the police report on the strength of his experiences in the N. W. provinces and has attempted to suggest a number of ways which, we hope, have not been lost sight of by the Inspector General if they at all strike him with their novelty and admirable usefulness.

---

Those of the English ladies who have left off the trammels of cooking department and of dancing attendance from the blue to the brown upon their husbands have come forward as women of sound education and vast experience to claim their share of politics from the men and have set in motion a new ideal of life and profession for the coming generations of the womankind. Some of these ladies have noticed a marked drawback in the education of Indian females and have advised the Congress-leaders to take up a lead in the matter. Males or females who are not trodden under the thousand and one cares of a family life and who live a life of general usefulness after they retire from life or lose their life-long mates have done the eminent works of religious and moral reformation. But retirements from the bustle of life as well known in old times are unknown to the present generations. It is only in the class of widows that an asceticism of a stricter code and morality and chastity of a higher order are noticeable in modern times as well as ancient. And the 'Hindu' of Madras has advocated a reform from within and that too from the ladies who have the misfortunes to lose their lords: The Editor of that paper proceeds to observe that:—

"As it strikes so many Englishmen, it strikes these benevolent ladies that the large number of young widows among Hindus should be an inexhaustible source from which the requisite staff of lady teachers can be obtained. But nothing is more difficult than to get Hindu widows of higher castes take up an independent profession. If Hindu widows can be got to serve as schoolmistresses, it will effect a revolution in the Hindu notions of women and their social status. According to orthodox notions, a woman is destined to dependence all her life; in her childhood she is dependent on her parents; in her womanhood on her husband; and in her old age on her sons. If she is a widow and has neither father nor a son to depend upon, that is deemed the reason for her being subjected to greater restraints and closer scrutiny. Public opinion will never tolerate a young widow pursuing a profession of which the duties cannot be discharged strictly within doors. Still, the change is not more radical than other changes that are surely taking place in Hindu customs and notions. Poverty has been a great inducement to education in this country, and it is just possible that widows of respectable character might be induced by prizes and scholarships to train themselves for the profession of teaching. We believe something is already done by Government, but more might be done, and it is the duty of those that press for political concessions to ensure their success by elevating the character of the nation which is impossible without the cooperation of educated mothers."

---

## वऱ्हाड

हवामान—शुक्रवार पासून पावसानें अगदीं बहार करून दिली. मध्यंतरीं मनस्वी उकडत असे आणि पाऊस बिलकूल नव्हता म्हणून काळजी पडली होती परंतु ती ईश्वरकृपेनें दूर होऊन पाऊस चांगला झाला आणि हवेंत गारवा हीं आला आहे. रोगराई म्हणण्या सारखी विशेष नाहीं.

गेल्या शनिवारीं अकोल्यास शर्यतीचे कांहीं खेळ झाले त्यांत घोडदवड, बैलाच्या बुजवणुकी, आंधळी कोशींबीर खेळतांना शेळीचा पाठलाग वगैरे गम्मती पुष्कळ झाल्या. बक्षीसें किरकोळ असल्यामुळें सामान्य लोक या शर्यतींत खेळत असून प्रेक्षक समूह चांगला जमला होता. मि. सुवेल आसि. पोलिस सुपरिनटेंडंट वगैरे लोकांनीं वर्गणी जमवून हे खेळ केले याबद्दल लोकांनीं त्यांचे आभार मानले पाहिजेत.

आजपासून उमरावतीस वऱ्हाड—मुलकी कायद्याचे मसुद्याचा विचार करण्यासाठीं मे० कमिशनर साहेबांच्या अध्यक्षते खालीं सभा भरणार आहे. राजश्री जोशी, मुधोळकर, व देशव विनायक यांस त्या सभेनिमित्त मुद्दाम पाचारण केलें आहे.

बाळापूरचे शेट पोपटलाल यांजवर पिनल कोड ४०६।४०९ प्रमाणें आरोप ठेवल्या नंतर गेल्या बुधवार पासून तीन दिवस पावेतों आरोपीचे व सरकारतर्फे साक्षीदारांच्या साक्षी होऊन फिर्यादी व आरोपी यांच्या वतीनें अनुक्रमें राजश्री गणेश श्रीकृष्ण खापरडे व महादेव चिमणाजी आपटे यांची पुराव्याची व बचावाचीं संभाषणें होऊन त्या खटल्याची पूर्णता वकीली संबधानें शुक्रवारीं झाली. न्यायाधीश मि. अजिजुद्दीन यांनीं या महत्वाच्या प्रकरणाचा निकाल सविस्तर देण्या साठीं दोन दिवसांचा अवधि घेतला आहे तेव्हां त्यांच्या निर्णयाकडे लोकांची दृष्टी विशेष लागली आहे.

अकोलें जिल्ह्यांतील दोन तहसिलदारीच्या जागा मृत्यूनें खालीं केल्या आहेत त्यावर कोण गृहस्थ नेमले जाणार याविषयीं दरबारीं गप्पाष्टकांत खल चालला असतां. रा. रा. बळवंतराव कावळे जुडिशिअल कमिशनरचे क्लार्क आफ कोर्ट हे या आठवड्यांत रजेवरून परत आल्या नंतर रा. रा. त्रिम्बक गणेश परांजपे हे बाळापूर तहशिलीवर येतील असें कळतें. वगैरे दोन्ही जागांस जे हक्कदार उमेदवार आहेत त्यामध्यें बाळापूरचे नायब तहशिलदार मि. अबदुल कदूस हे एक आहेत. यांच्या हक्काचा योग्य विचार केला जाईल असें आम्ही इच्छितों. यांची लोअर स्टांडरची परीक्षा उतरली असून यांनीं सुमारें वर्षभर अकोल्यास तहशिलदाराचें आक्टींग काम केलें आहे.

पोंच (आभारपूर्वक)—'नीरजोल्लास'-नागपूर. 'भारत भाग्योदय'- मुंबई, 'सद्धर्मदीप' अलीबाग, शेतकरी-- उमरावती; सानिटरी, पोलीस आणि देवीखातें— यांचे १८९१ चे वार्षिक रिपोर्ट. अकोटकर मित्र- 'राजश्री कृष्णाजी महादेव यांच्या मृत्यू बद्दल दुःखप्रदर्शत' पत्र उशीरा आलें. व पुढील अंकीं छापूं.

रा. रा. यशवंत महादेव तहशीलदार चिखली हे रजेवरून परत येऊन गेल्याच्या मागील आठवड्यांत आपल्या कामावर दाखल झाले.

डेपुटी कमिशनर कचेरींतील एका कारकुनानें एक लेखणी व दोन रुपये आफिसांतून चोरीस गेल्याची कैफियत दिल्या वरून रा. रा. नरसिंह गोविंद उर्फ बाळाभाऊ या कारकुनाला पोलिसनें अपूर्ण वहिमावर हातकड्या घालून कैद केलें व दुसरें दिवशीं जातमुचलका घेऊन सोडून दिलें. पोलीसच्या कोत्या विचाराचा व कायदेशीर जुलमाचा कळस झाला! या प्रकरणांत कोणी अधिकारी लक्ष्य पुरवितील काय? मनुष्याची अब्रू, नोकरी, व संभावितपणा हीं लक्ष्यांत न घेतां क्षुद्र चोरीच्या फिर्यादीवरून त्याची बेअब्रु करणें म्हणजे कायदेकानूच्या तत्वांनां अंजली देण्या सारखें नव्हे काय!

---

नोटीस.

रा. रा. कनयीराम किसनीराम राहणार देवरी तालुका अकोट यांस.

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं पंधरा सोळा वर्षे तुम्ही व आम्हीं एकत्रपणें दुकानदारी केली परंतु आपणा उभयतां मध्यें ठरलें कीं दुकानदारीचा सर्व हिशोब तुम्ही समजून द्यावा व फायदा तोटा आपसांत वाटून घ्यावा, परंतु आमचा वाटा देण्यास तुमच्या जवळ पैसा नसल्या कारणानें सर्व दुकानदारी आमच्या कडे आम्हीं घेण्याचें कबूल केलें. या ठरावा प्रमाणें तुमच्या खात्यावर तुम्हांकडे कांहीं रुपये येणें निघालें त्याचा तुम्ही उलगडा केला नाहीं. दुकानाच्या वह्या तुम्ही स्वाधीन केल्या व जमाखर्च करून दुकानही स्वाधीन केलें परंतु तुम्ही मागील जमाखर्चाची झडती अद्याप दिली नाहीं व केव्हां देणार आहां हें हीं कांहीं कळत नाहीं तर तुम्हास या लेखाअन्वयें निक्षून कळवितों कीं तुम्ही ही नोटीस पावल्या दिवसा पासून आठ दिवसांचें आंत दुकानदारीचा सर्व हिशोब आज तागाईत चुकता करून द्यावा, आपल्या खात्या वरील रकम दुकानावर पोंचती करावी आणि तुमचा आमचा जुना व्यवहार सर्व संपून तुमचा दुकानदारींत कांहीं संबंध किंवा हक्क उरला नाहीं म्हणून सर्व बाबदींत फारकत पावती लिहून द्यावी. येणें प्रमाणें तजवीज न केल्यास कोर्ट मार्फत फिर्याद करून दुकानदारीचा सर्व निकाल केला जाईल आणि तो निकाल होईपर्यंत ही नोटीस, कोर्टफी वगैरे साठीं जो खर्च कायदेशीर होईल तो भरून देण्याची जबाबदारी तुमच्या शिरावर राहील आणि त्याच प्रमाणें दुकानदारीच्या हिशोबाची झडती न दिल्यानें जें कांहीं आमचें नुकसान होईल तें तुमच्या दिरंगाई मुळें होणार असल्या मुळें तुम्हास भरून द्यावें लागेल हें मुद्दाम कळविलें आहे. तारीख ९ माहे जुलै सन १८९२ इसवी.

(सही मारवाडींत)

फत्तेचंद हेमराज मारवाडी दस्तुर
खुद्द दुकान देवरी
तालुके अकोट.

---

नोटीस

ती. रा. रा. नथु भवानी व चि. रा. रामचंद्र भवानी सोनार राहणार दुकान अकोलें यांसः—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं, तुम्ही उभयतांनीं ता० ४-७-९२ ची नोटीस दिली त्यांतील मजकूर खरा नाहीं. प्रथम आपण त्रिवर्ग विभक्त राहिलो परंतु वाटण्या झाल्या नाहींत. पंचामार्फत वाटण्या कागदोपत्रीं होतील तेव्हां फारकती देण्यांत येतील. कळावें तारीख ७ जुलई १८९२ इ०

(सही.)

माधव भवानी सोनार
दस्तुर खुद्द.

---

## वर्तमानसार

टोळांचा व्यापार— हिंदुस्थानांतील एका नव्या मालास विलायतेहून मागणी आली आहे! हा माल ह्मणजे सुकवलेले टोळ ! ! विलायतेंत पिंजऱ्यांत बाळगलेली पांखरें लक्षावधि आहेत. त्या पांखरांस टोळाचा रतीब लावणें हितावह आहे असा अनुभव सायप्रस बेटांतून गेलेले टोळ त्यांला खाऊ घातल्यावरून आल्यामुळेंच ही टोळांची मागणी आली आहे असें समजतें. आतां टोळ आल्यास त्यांचे संहाराकडे लक्ष माण्यास ही मागणी बरीच कारणी भूत होईल.

गेल्या मेलनें आलेल्या इंडिया नामक इंग्रजी पत्रांत मद्रास इलाख्यांतील दोघां तालुकदारांनीं स्थापन केलेल्या एक शेतकऱ्यांच्या पेढीची संक्षिप्त हकिकत आली आहे. शेट जयदयाळ व शेट रघुबर दयाल यांनीं शेतकऱ्यांना सावकारांचे भयंकर जाचांतून कांहीं अंशानें तरी सोडवावें असें त्यांच्या डोक्यांत शिरल्यामुळें पंचवीस हजार रुपये घालून १८९१ च्या जानेवारी महिन्याच्या २६ व्या तारखेस एक शेतकऱ्याची पेढी उभारिली १८९१ च्या डिसेंबर महिन्याचे अखेरीस एकंदर आढावा काढल्यावरून असें दिसून आलें कीं, पेढींत पैसा घालणारांना दरमहा दरशेंकडा सहा आणि सात पै प्रमाणें नफ्याचा दर पडला. व ह्या पेढींतून पैसा घेणाऱ्या कुळांचे दर रुपयास चार आणे तीन पै अथवा शेंकडा २६ रुपये ९ आणे वांचले.

शेट जयदयाळ व शेट रघुबर दयाळ यांचें उदाहरण पुढें ठेवून तोच कित्ता सर्वांनीं गिरविला तर गरीब बिचाऱ्या शेतकऱ्यांची एक प्रकारें सुटका होऊन देशोन्नत्यर्थ झटल्याचें श्रेय आपणाकडे येणार आहे. अशा पेढ्या या मुंबई इलाख्यांतही स्थापन व्हाव्या अशी आमची मनापासून इच्छा आहे.

न्या० सिं०

आफगाणिस्थानांत ठिकठिकाणीं धामधूम सुरू असून बंडाळ्याचे देखावे दृष्टी पडत आहेत. हजारा मुलखांत तर शिकस्त झाली आहे. कंदाहार आणि काबूल यांच्या दरम्यान रहदारी रस्त्यावर बदफैली लोकांचे मेळे आश्रा धरून राहिले आहेत, हा काबूल अमिराच्या इतराजीचा परिणाम असल्या विषयी लोकांची ओरड ऐकुं येते. या बंडखोर लोकांचा नाश करण्यासाठीं १०,००० फौज त्यांचा सत्यानाश करण्यासाठीं पाठविण्यांत आली परंतु अमिरास यश न येतां उलट त्याच्या विशेष तपासांव असें कळून आलें कीं उद्भवलेल्या दंग्यास कारण हजारीलोक नसून ही सर्व उठाव अफगाण सेनापतीच्या अव्यवस्थितपणामुळें उद्भवली; या कारणामुळें अमिरानें डांगोरा पिटविला कीं, सेनापतीच्या अज्ञानामुळें उद्भवलेल्या दंग्यांतील पुढाऱ्यास मला माफी करणें रास्त आहे. मात्र दिल्या मुदतींत तक्तानवळ बिनदिक्कत हजर व्हावें?

हिरातच्या किल्या जवळ अमिरानें १००० लढाऊ शिपाई सज्ज करून ठेविले आहेत.

इराणच्या सरहद्दीवर सब्जावार आणि फराहना जिल्ह्यांतील फौज एकत्र करण्याची तजवीज सुरू आहे, त्याच प्रमाणें हिरात व मरूचक या रस्त्याचा बंदोबस्त डोळ्यांत तेल घालून राखला आहे दुसऱ्या सर्वांच्या बाजूस रशियानें मोठा जमाव जमविल्याचें ऐकिवांत येतें त्यास तुर्कलोकांचे पुरें साह्य असल्याचें कळतें रशियानें तुर्कोमान लोकांची एक मोठी फौज शत्रूच्या माऱ्यावर उभी केली आहे शेवटची चौकी पेंजदे आणि जियारत हिला शाहात ठेऊन गुजरली नाऱ्यावर मोठाल्या बराका बांधून तेथें रशियन अन्नाची कोठारें साठवीत असल्याचें कळतें.

मा० मि०

पार्शी लोकांचा फार जुना अग्नि बलसाड जवळ उदवाडा ह्मणून एक गांव आहे तेथील होय. हें अग्निहोत्र पार्शी लोक प्रथम गुजराथेंत उतरले, त्यावेळचें ह्मणजे १२०० वर्षां पूर्वीचें आहे.

निरनिराळ्या राष्ट्रांतील मुळाक्षरांची संख्या १२ पासून २०२ पर्यंत आहे. सन्डविच् बेटांतील लोकांचीं मुळाक्षरें १२ आहेत व तार्तार लोकांची २०९ आहेत.

न्यू ओरिएंटल ब्यांक् रुपयाला १२ आणे देणार असें ह्मणतात. असो जळत्या घराचा वासाच!

चंदनीतेल खोकल्यावर उत्तम औषध आहे असें कित्येक अनुभवशीर डाक्टरांचें मत आहे.

पारिस शहराला पाणी पुरवायाचें आहे तें ११२ मैलां वरून आणणार आहेत. त्याच्याकरितां जुरा पर्वताखालीं एक २२मैल लांबीचा बोगदा खणला आहे.

करमणूक.

एका कंपनीनें घोड्या साठीं खोटे दांत करण्याचें काम चालू केलें आहे.

व्हेनिस शहर बेटांवर बांधलेलें आहे व तीं बेटें एकमेकांस चारशें पुलांनीं जोडिलेलीं आहेत!

आस्ट्रेलियांत एक ८५ मुलांचा बाप आहे. ह्याला संतती दोन बायकां पासून झाली आहे. पहिली दर खेपेस ४ प्रमाणें चारदा व्याली व सात वेळांत तीन तीन मुलें झालीं. मुलें तर १६ झाली. दुसरीला जुळीं अठ ८ झालीं व तीन तीन दोन वेळां झालीं.

सर्पदंशमुक्त— मेक्सिको देशांतले लोकांस सर्पदंशाची मुळीच भीती नाहीं ते लोक सर्प विषानें देवी काढण्या सारखा एक प्रयोग करून घेतात व तेणें करून त्यांना पुढें कधींही सर्प विषाची बाधा मुळींच होत नाहीं.

धा. वृ.

गायनलुब्ध खेंचरः— आफ्रीकेमध्यें एक खेंचर अत्यंत गायनलुब्ध झालें आहे. कोठें गाणें झालें कीं, तेथें हें उभें असावयाचेंच!

स्तनरोगावर उपायः— मुलें पाजणाऱ्या स्त्रियांच्या स्तनांत केव्हां केव्हां भेगा पडून त्यांस फार त्रास होतो; दूध आंत सांचतें, गाठी होतात, पुढें पू होतो व फार त्रास भोगावा लागतो. या साठीं भेगी पडलेल्या भागावर कोंबडीचे अंड्यांतील बलक लावावा. गुण येतो ह्मणतात.

दीनबंधू०

इंडियन मिरर नांवाच्या एका पत्रकारानें वेदाच्या महत्वा बदल नुकतांच एक लेख प्रसिद्ध केला आहे तो आमच्या सुधारकांना वाचण्या सारखा आहे. त्याचा थोडक्यांत गोषवारा आह्मी या खालीं देतों. आज हिंदुस्थानास जी स्थिति प्राप्त झाली आहे ती केवळ वेदाध्ययनाच्या अज्ञानामुळें झाली आहे. वेदांत ज्ञान आणि शहाणपण ओतप्रोत भरलेले आहे, पण पाश्चिमात्य ज्ञानाच्या अर्धर्पा हळकुंडामुळें कित्येक हिंदू इतके चढून गेले आहेत कीं, त्यांस वेद्यांला शिव्या देण्यांतच मोठा आनंद वाटतो. मात्र गंमत एवढीच कीं, वेदाचें ज्ञान करून घेण्यापूर्वीच ते शिव्या देतात. यज्ञ आणि होम यांत मूळ तत्व काय आहे याचें ज्ञान करून न घेतां किंवा त्या बदल विचारपूस न करितां त्यांत कांहीं अर्थ नाहीं असें ह्मणूं लागतात. पण स्वच्छतेचें त्यांत मूळतत्व आहे व हें तत्व पाश्चिमात्यासही अजून जितकें समजलें नाहीं तितकें वेदांत सांगितलें आहे. पूर्वीं हरिद्वारासारख्या ठिकाणीं हल्लींच्या पेक्षां जास्त जपत असत पण त्या वेळीं पटकी सारखे रोग होत नसत याचें मूळ कारण त्यावेळीं यज्ञयागादि कृत्यें होत असत व आतां होत नाहींत. आमच्या विद्वानांनीं प्रथम वेदाचा चांगला अभ्यास करावा, त्यांत सांगितलेल्या गोष्टी संबंधानें चांगली विचारपूस करवी आणि मग पाहिजे तर वेदाचा नांवें ठेवावीं. अगोदर नांव ठेवणें मूर्खपणाचें आहे. बंगाल्यांत याअध्ययनाची फारच हेळसांड होत आहे. वऱ्हाडांत मंथन नांवाचें एक ठिकाण आहे, या ठिकाणीं तेथील ब्राह्मण वेदाध्ययन मोठ्या जारीनें करीत असून ते फारच सुखी आहेत. त्यांच्या बायका अंगावर दागिने घालणें वेडेपणाचें आहे असें सांगतात. ते ब्राह्मण आपला सर्वकाळ वेदाध्ययनांत घालवितात.

लुमन येथें दुष्काळ पडल्यामुळें धान्य महाग होण्याचा संभव आहे म्हणून तेथील लष्करी लोकांस सरकारानें आगाऊ धान्याची साठवण करण्यासाठीं १५०० रुपये दिले आहेत असें ह्मणतात. तेथील रयतेचो वाट काय?

पावसाळ्यांत मेणकापडी पोषाख घेण्यासाठीं वायव्य रेल्वेनें सर्व स्टेशन मास्तरांस सात रुपये निराळा भत्ता ह्मणून दिला आहे. खालच्या पोर्टरास कोण विचारतो?

मद्रासइलाख्यांतून १८९१ सालांत १४६५५४ मनुष्यें बाह्यप्रदेशीं राहाण्यास गेलीं. त्या पैकी बरीच ब्रम्हदेशाकडे गेली आहेत असें ह्मणतात.

सिंगापूरच्या सरकारानें न्यू ओरिएंटल ब्यांकेचे सर्व पैसे जप्त केले आहेत.

शान संस्थानांत ३०० लोकांनी नुकतांच एक मोठा दरवडा घातला.

उत्तर सरहद्दीच्या संबंधानें काबूलच्या अमिराशीं कोणत्या प्रकारचें वर्तन ठेवावें याबद्दल हिंदुस्थानसरकारचा विचार चालू आहे

राष्ट्रीय सभेचे माजी अध्यक्ष व हल्लीं मयत मि. युल यांची विलायतेस ७१ लाखाची जिनगी असून ती त्यांनीं आपल्या भावास दिली आहे.

ठा० अ०

शहाबाद येथील एक सोनार प्रयागराम यानें एक उत्कृष्ट नकशीचें घर तयार करून त्यांत माजघर वगैरे देखावा दाखवून दोन दोन इंच उंचीच्या स्त्रिया निरनिराळीं कामें करित आहेत असें दाखविलें आहे व एका वड्याळाचे योगानें त्या घरांतील पात्रांस गती दिली आहे. सदर नकशीचें काम राणी सरकारांस नजर करण्याची सोनारानें इच्छा दाखविल्यावरून शहाबादच्या माजिस्त्रेटांनीं तें पाठविण्याची तजवीज केली राणीसरकारांनीं या नजरेचा मोठ्या संतोषानें स्वीकार केला आहे.

सु० प०

अमेरिकेंत वड्याळांचे जे कारखाने आहेत त्यांत दर आठवड्यास ३५००० वड्याळें तयार होतात! अबब ! ! आमचे कारखानदार रोज एक चाकू केला म्हणजे दमतात!

सुधारकांचे पुढारी व मुंबई हाय कोर्टाचे हुषार जज्ज ना. ज. तेलंग यांच्या वकिलास मुंबईच्या भामट्यांनीं मोठ्या वस्तादगिरीनें बऱ्याच हजारांच्या गंड्यांत आणिलें असें समजतें! मुंबइच्या भामटगिरीची कमालच म्हटली पाहिजे.

जायनन ऑस नांवाच्या ८० वर्षांच्या तरुणानें किंवो मार्कोबर नांवाच्या ७९ वर्षांच्या तरुणीशीं नुकताच विवाह लाविला! ह्या वधुवरांचा विवाह त्यांच्या बारा सोळा वर्षांतच ठरलेला होता, पण आईबापाच्या हरकती मुळें तो घडून आला नाहीं मध्यंतरी नवऱ्या मुलाच्या पाच बायका व नवऱ्या मुलीचे पांच नवरे होऊन त्यांचे एकमेकांशीं घटस्फोट झाले तेव्हां अखेरीस दोघेही पूर्व पदावर येऊन बसलीं. असली सुधारणा आमच्या दैवभोळ्या देशांत होईल तो सुदीन!

छत्र्यांचा अतिशयखप—गतवर्षीं एकट्या कलकत्ता शहरांत २१॥ लक्ष रुपये किंमतीच्या २५ लक्ष छत्र्या खपल्या असें सरकारी हिशेबा वरून समजतें.

एकट्या क्यूबा बेटांत हिंदुस्थानांतून दरसाल ७०००००० रुपये किंमतीचे तांदूळ जातात

सूर्यकांताचीं फुलें—सूर्यकांताच्या फुलांस जे बीं येतें त्याचें तेल निघतें. सूर्य कांतांच्या झाडांची पुष्कळ लागवण केली असतां त्याचें तेलही पुष्कळ निघतें असें पुढील हकीकती वरून दिसेल. सुमारें चाळीस वर्षां पूर्वी ह्या फुलांतील बियांचें तेल काढण्यासाठीं रशियांतील एका शेतकऱ्यानें सूर्य कांतांची झाडें लावण्याची प्रथम सुरुवात केली. तिकडील हार्टिकलचरल टाईम्स (शेतकीमित्र) वरून समजतें कीं, हल्लीं ७००००० एकर जमिनींत सूर्य कांताच्या झाडांची लागवण होत असते. ह्या वरून हरएक तऱ्हेचा व्यापार करून कमाई करण्याकडे युरोपियन लोकांची कावळ्या सारखी नजर असते असें उघड होतें. असें ते करितात म्हणून सोन्याचा घांस खातात, आणि आम्ही उपास काढतों.

खुनशी कावळा—वार्ताहर पत्राचे आफीस मुंबईत ज्या जागेंत आहे, त्या जागेंत असलेल्या फुलझाडांच्या कुंड्यां पैकीं एका कुंडींत एका कावळ्यानें दोन आंडीं घातलीं होती. तीं कोणी पोरानें तेथून काढून नेलीं. त्यामुळें तो कावळा इतका बेफाम झाला आहे कीं त्या आफिसांतील चाकर नोकर यांच्यावर, व आफिसांत बसलेल्या पत्रकर्त्यांवर निर्भयपणें चालून जाऊन झडप घालतो. तो कशासही भीत नाहीं, इतका अनिवार झाला आहे. असें वार्ताहर पत्रांत लिहिलें आहे. यावरून अपत्य नाशानें पक्षीही जिवाची आशा सोडण्या इतके अनावर होतात, मग जीं माणसें द्रव्य प्राप्ती साठीं आपल्या पोटच्या गोळ्यांचाही घात करितात त्यांची गणना कशांत करावी!

शृ० सू०

---

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वऱ्हाड समाचाराची किंमत
वर्षाचें आगाऊ रु० ५ डांक हाशील ०।१३
सहामाही ,, ३ ,, ०८
सालअखेर ,, ७ ,, १०८
किरकोळ अंकास ..........................०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ........०१

SUBSCRIPTION
Rs.
Annum in advance 5 Postage 13 as
Annum in arrears 7 ,, 1Rs 8 as
Six monthly............3 ,, 8 as
Single copy.......................................4as

Advertisements
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition per line3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXVI AKOLA MONDAY 18 JULY 1892 NO28
वर्ष २६ अकोला सोमवार तारीख १८ माहे जुलै सन १८९२ इ० अंक २८

## जाहिरात

मौजे अंजनी बुजरुख तालुके मेहेकर जिल्हे बुलढाणें येथील शेट साहुकार, मारवाडी, तेली, वाणी व इतर सर्वत्र लोक व वऱ्हाडांतील रहाणारे सर्वत्र लोक यांसः—

त्र्यंबकराव पंढरीदास देशमुख पाटील रहाणार मौजे अंजनी बुजरुख ता० मेहेकर जिल्हा बुलढाणें याजकडूनः—

कळवितों कीं, माझा चिरंजीव रा. गोविंदराव उमर वर्षे १४ चा असून सदर्हू मुलांस आंजनी बुजरुख येथील कांहीं वाईट बदचालीचे लोकांच्या योगानें बदचालीचे कर्म ( रंडीबाजी व गांजा ओढणें व दारु पिणें याचे संबंधानें ) करण्यास प्रवृत्त झाला आहे. व त्यां संबंधानें मौजे मजकूर येथील सावकार व इतर वगैरे लोकांकडून कर्ज काढून भलतेसे दस्तऐवज करून देत आहे असें ऐकतों. करितां सर्वत्र लोकांस जाहीर करितों कीं, सदरहु मुलांस माझें विचारल्या खेरीज कोणीच पैसा देऊ नये जर करितां माझे विचारा खेरीज त्याला कोणी कर्जाऊ पैसा देऊन दस्तऐवज करून घेईल तर तो मजला कबूल नाहीं. व त्या पैशाचा देवाळ मी नाहीं.

मुलगा अज्ञान असल्यामुळें त्याजला आपलें हित अगर अनहीत हीं बिलकूल कांहींच समजते नाहीं. व तो वर दर्शविलेलें बदचालीचे कर्माचे योगानें अक्षयीं आपले धुंदींतच असतो सबब माझा स्थावर अथवा जंगम माल, डागडागीनें व हरएक वस्तु वगैरे त्याज पासून गहाण अगर खरेदी वगैरे कोणत्याच प्रकारें घेऊन त्याजला कोणी कर्जाऊ पैसा देऊं नये व माझे विचारल्या खेरीज त्याजला कोणी कर्जाऊ पैसा दिला असेल अगर या पुढें देईल तर त्याबद्दल मी अगर माझे वारसा पैकीं कोणीच देवाळ होणार नाहीं.

या जाहिरातीचे विरुद्ध जो कोणी वर्तन करील त्याजवर ठकबाजीचा धंदा केल्या बद्दल कायदेशीर तजवीज केली जाईल. आमचे येथून कांहीं चिजा व रोकड पैसा सदर्हू मुलांस कांहीं लोकांनीं फुसलावून नेला आहे त्याचा तपास लागल्यावर त्याजबद्दल तजवीज केली जाईल. सदर्हु मुलांस कोणी सरकत करून अखेर त्यांजवर तोटा काढिल्यास तो मी देवाळ नाहीं. माझें वारस अगर जिनगी सदर्हू बद्दल देवाळ नाहीं. कळावें. ता० ७ माहे जुलाई सन १८९२ इसवी.

( सही. )
त्र्यंबकराव पंढरीदास देशमुख पाटील द. खु.

## नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें. ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्याविषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट ७ कलम ६ प्रमाणें.

दि. कि. क्लास १९ मि. नंबर १० १८९२

स्पेशल अ० कमिशनर साहेब जिल्हे अकोला यांचे कोर्टांत

नांव शिपराई मर्द जानजी गांवंडे राहणार पळवण तालुके अकोला जिल्हा अकोला यांस मयत.

जानजी बापाचें नांव राहणार पळवण तालुके अकोला जिल्हा अकोला याचे कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटिफिकिट मिळावें ह्मणून सदर्हू अर्जदार याणे अर्ज केला आहे त्याजकरितां सदर्हु मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यांस जाहीरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्याणी ता. २३ माहे जुलई सन १८९२ इ. रोजीं सदर्हु अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आप आपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख ७ माहे जुलाई सन १८९२ इ०

V. N. Dandekar.

शिक्का. सिव्हील ज्यज.

## जाहिरात

—— 0 ——

अहो स्वदेश बांधवहो, परदेशी औषधी नुसत्या रंगबाज व कमिशन जास्त पाडून कां फसतां? इकडे थोडे लक्ष द्या.

आमचे दवाखान्यांत सर्व रोगांवर औषधी विक्रीस व दरिद्री लोकांस फुकट तयार आहेत; परंतु त्यांत ज्या हटकून गुण खात्रीनें देतात त्यां पैकीं थोड्या प्रसिद्धीस देतों. त्यांतून जो दवा कोणास लागेल त्यांनीं खालीं लिहिलेले सहीचे पत्यावर पत्र पाठवावें. ह्मणजे आम्ही व्ह्याल्युपेबलनीं पोस्टमार्गें लवकर पाटवूं. व कोणी आजारी आमचे येथें येऊन औषध घेतील त्यांस प्रथम दुरुस्त करून ठरलेली किंमत मागाहून घेऊं.

हमेशा घेणारे ग्राहकांस कमिशन देऊं. व त्यांनीं विक्री करून दाम पाठवावें.

१ गजकर्णावर रामबाण, ६ दिवसांत गुण किंमत दर बाटलीस ०८ आणे.

२ मूळव्याध कितीही दिवसांची दुर्धर असेल त्यावर मोडावर लावण्याचें व पोटांत घेण्याचें दोन औषधी मिळून किं. १॥ रु.

३ चातुर्थिक ज्वर ह्मणजे चवथारें हिंव ताप त्याच प्रमाणें तिजारे, व दररोज येणारे कितीही दिवसांचे असो, त्याजवर मिश्रित औषध एकच बाटली पुरे. किं. १॥ रु. दुसरें औषध गोळ्या खात्रीच्या २१ गोळ्याच्या डबीस १०९ या औषधानें कडक तापही जातो.

४ परमा तिडिक व स्वप्नावस्था, व कोठ्यांतील उष्णता व क्षिणता या सर्वांवर मेहूणपुडा किं. १ पुड्यास ०१४ आणे.

५ बाळंत रोग बाळाचे डबे व सटवी बाधा व प्रदर सर्व तऱ्हेचा किं. १ डबीस १॥ रु.

६ वीस प्रकारचे मेहापैकीं १६ मेहावर १४ गोळ्यास किं. २॥=

७ नारुवर २ दिवसांत गुण. लावणें व खाणे याच्या डबीस किं. ।

८ गुल्म पांच प्रकारचे व सर्व पोट शुळांवर व गोळ्यावर व पानथरीवर १ डबीस किं. ॥।

जुलाब उत्तम राजस तकलीफ अगदीं नसून कोठा साफ १ बाटली १० मनुष्यास पुरेल किं. १। रु.

१० मेदोरोग व घुरें व उन्माद यावर अगदीं जल्द गुण १ बाटलीस किं. २ रु.

११ स्त्रियांचे रक्तस्राव व ऋतुस्नात होण्यास व गर्भधारणास बंदेज ह्यांवर हें एकच औषध फार चांगलें आहे. १ डबीस किं. १॥

१२ पित्त व मस्तकशूळ व अर्धशिशी याजवर दर डबीस किं. १०=

१३ हागवण व अतिसार १ डबीस किं. १।=

१४ वृषण एकारल्यास व वृद्धीस १ डबीस किं. १ रु.

१५ कावरले कुत्रें व कोल्हे व तेल्या उंदीर डसल्यास १ डबीस किं. १। रु.

१६ मेहानें अगर उष्णतेनें पाय उलून रक्त जाणें व संधि दुखणें ह्यावर १ डबीस किं. १॥ रु.

१७ महामारीवर अगदी जलद गुण एक मनुष्यास १२ गोळ्या ५० गोळ्याच्या डबीस किं. १०—

१८ गर्मी उर्फ उपदंश संबंधी विकार क्षतें यांजवर १ डबीस किं. १॥ रु.

१९ फसली उर्फ मज्जागतवात व शूळ याजवर लवकर १५ मिनिटांत गुण १ डबीस किं. ॥। हें १५ मनुष्यांस पुरेल.

२० कऊळ, नळगुद, पंडु, सूज व मुखरोग ६५ व सन्निपात १३ यांवर १ डबीस किं. १॥ रु. ही ३ मुलें व २ पुरुषांस पुरेल.

२१ सुवर्णमालिनीवसंत खात्रीचा १ तोळ्यास किं. ७ रु.

२२ योगराज गुग्गुळ १ तोळ्यास ४॥ रुपये.

२३ नामर्द ह्मणजे नपुंसक कितीही दिवसांचा असो तरी तो तीन दिवसांत दुरुस्त खात्रीनें होईल. १ बाटलीस किं. ३ रु. गुण न आल्यास पैसे परत मिळतील.

२४ डोळ्यांतील फूल वडस रातांधळे लाली खुपरी चुळ चीपडे गळती याजवर १ डबीस किं. १०६

या शिवाय जास्त माहिती मागविल्यास देऊं. व कोणी योग्य औषधें हमेशा मागवून विक्री करील त्यांनीं विक्री करून पैसे मागाहून पाठवावें.

(पत्ता व सही) शिवचरनगीर रामगीर वैकुरणखडकर अकोला गंगाधरचे माडीवर चौकांत दवाखाना. वऱ्हाड.

---

अकोट १०।७९२

(. लिहून आलेला मजकूर )

ह्या भूतलावर सत्पुरुष कोणत्या रुपानें व कोणत्या स्थितींत कसे राहतात हें प्रापंचिक जनांस सहसा कळत नाहीं. कारण ते साधारण पुरुषा प्रमाणेंच लोकांत वागत असर ल्या मुळें एकाएकीं उघडकीस येत नाहींत तत्रापि. "गुणाः कुर्वंति दूतत्व दूरे वसतां संता॥ न हि कस्तुरिका मोदः शपथेन निवार्यते"॥१॥ या अभिप्राया प्रमाणें त्यांचे ते गुण प्रकट झाल्या वांचून राहात नाहींत, हें निर्विवाद आहे.

तारीख ३० माहे जून सन १८९२ रोजीं रावसाहेब कृष्णाजी महादेव तहसिल्दार तालुके आकोट हे वैकुंठवासी जाहाले. त्यांचे आसन्न कालीं हिंदु, मुसलमान आणि अठराही वर्णांचे लोक अखेरचें दर्शन घेण्याचे हेतूनें एकत्र जमून जसें एखादें आपलें अमोल्य रत्न दुर्दैवानें हरपलें ह्मणजे फारच विव्हलता प्राप्त होते, त्या प्रमाणें त्या सर्वांचें अंतःकरण एक समयावच्छेदें करून हळहळून गेलें होतें. डोळ्यावाटें अश्रूधारा एक सारख्या वाहात होत्या. व चिरकाल पावेतों या उत्तम पुरुषांची आठवण राहील असें त्यांच्या दुस्सह वियोग कालीं ते वारंवार ह्मणत असत. या पुरुषाची प्रत्यक्ष मूर्ति जरा सदैव दिसेनाशी झाली, तत्रापि त्यांची उत्तम कीर्ति पसरून खरोखर अजरामर जाहाली आहे. हें सर्व कशा मुळें? केवळ श्री० रावसा० कृष्णाजी महादेव यांच्या सभ्य व सद् वर्तनांत त्यांच्या आंगीभूत दया, सत्यता, समदृष्टी, शांती आणि क्षांती कार्यदक्षता व निःपक्षता, पुर्णानुभव व सौजन्यता व लोक प्रियता, निरभिमानत्व आणि सुशीलता साधुता आणि उचित् प्रवृत्ती इत्यादि गुण मूर्तिमंत वसत होते असे सर्व जातीचे लोकांनीं वेळीं वेळीं अनुभवलें हीं आहे. राजा आणि रयत यांचे दरम्यान असा कार्य कर्ता फारच दुर्मिळ आहे. असें कोणीही तत्सहवासी शपथेवर कबूल करील.

सत्यत्वाचे संबंधानें जशी एतद्देशीयांची त्यांज विषयीं पुज्य बुद्धि होती तशीच किंबहुना त्याहून ही विशेष परद्वीपस्थांची होती. व ते त्यांचे परोक्ष देखील विरुद्ध वादी त्यांची त्या बद्दल खात्री करून देत असत असें आढळलें आहे. भूतदया व समदृष्टी हे गुण परमावधी होते अशीं उदाहरणें पुष्कळ आहेत त्यां पैकीं एक असेः— एके दिवशीं मिस्तर हरसुबावा वगैरे मंडळी सह ते फिरत असतां एक गरीब माहार मर-

णोःन्मुख झाल्यामुळें त्याच्या कुटुंबांतील माणसें नैराश्यपर्णे फार आक्रोश करीत होतीं. तशा संधींत त्याचे घरीं जाऊन त्याचा समाचार घेतेवेळीं त्याचे अगांस स्पर्श करण्यास सुद्धां मागें पुढें पाहिलें नाहीं व होईल तितकी खटपट त्याचे संबंधानें करून तो जगेल अशा बद्दल त्याचे कुटुंबांचें समाधान केलें व स्पष्टास्पष्ट दोषा बद्दल सचैल स्नानानें मुक्त होईन असें धर्माभिमानी जनांचे समाधान केलें. सारांश दीन जनांचें दुःख परीहारार्चा धटका हातांतून कधीं ही दवडलीं नसत असें अनेक वेळा पाहण्यांत आलें.

अकोट येथें हिंदु ( रजपुत ) आणि मुसलमान यांची फार दिवसां पासून दुफळी असून ती लोकप्रसिद्ध ही आहे असा प्रकार असून रावसाहेब दोन्ही पक्षांकडे सारखें वागत असत. व कोणाचा ही पक्षपात ह्मणून कसा तो त्यांस माहीत नव्हता, येवढेंच नाहीं तर प्रत्येक पक्षाचे लोकांस असें वाटे कीं आमचा विशेष अभिमान रावसाहेब यांस असोन आमच्यावर जितकें प्रेम ते ठेवितात तितकें अन्यपक्षांवर नसावें असें दोन्ही ही पक्षांचे लोकांस वाटत असे. हाही एक अपूर्व गुण त्यांचे आंगीं वास करीत असे. दोन्हीं पक्षांचा सांभाळ व उत्तम रितीनें त्यानीं केला. व अविचारानें कोणीं त्यांस वाईट ह्मटलें तरी ते न जुमानतां दोन्ही पक्षास अशा रितीनें वागविणारा तहशिलदार इतःपर स्वप्नीं ही मिळणार नाहीं असें ही उभय पक्ष ह्मणतात.

रावसाहेबांची स्वभाविक वागणूक फार लीनतेची असें लीनतेनें तहसीलदारी सारखीं मोठी जबाबदारीची कामें बरोबर चालत नाहींत अशीं जी सर्वसाधारण समज ती या पुरुषानें अगदीं व्यर्थ करून सोडली. अशी लीनतेची वागणूक होती तत्रापि ज्या ठिकाणीं निर्भिडता पाहिजे त्यास्थळीं ते तिचा अप्रातिम उपयोग करीत असत. असें जनात्र कमिशनर साहेब बहादूर यांची स्वारी आकोट्यास आली होती त्यावेळीं पुष्कळ लोकांनीं पाहिलें. त्याबद्दल वैद्र्भ कारानें लिहिलें असून, आपलें उद्योग बळानें २० रुपयाचे नोकरी पासून तहशिलदारी पर्यंत ते कसे चढत गेले, इत्यादि गोष्टींचा उलेख त्यांत जाहाला आहेच सबब येथें आतां त्या गोष्टीची पुनरुक्ती नको.

मुकद्दम्यातील लोकांस दंड खंड करण्याचा तो त्याचे शक्ती पलीकडे न जावा या विषयीं ते फार बारीक पाहात असत. व त्यांचे जवळ अशी युक्ती होती कीं, आरोपीच्या तोंडातून आपण कितपत दंड देऊं शकूं हें आपोआप बाहेर निघत असे. ह्यांचे कामाची रैली व यांचे परिश्रम अन्यस्थळीं विरळा पाहण्यांत येतील. व ह्यांचे जितके गुण वर्णन करावे तितके थोडेच आहेत. यांचे निर्दोष वागणुकीमुळें या तालुक्यांत हे दुसरे यशवंत माहादेव ( देव मामलेदार ) आहेत, असें सर्व लोक ह्मणत व मानीत ही असत. या तालुक्यांत ह्यांचें स्मारक कांहीं तरी करावें, अशा बद्दल सर्व लोकांचे उद्गार वारंवार बाहिर पडत आहेत. आकोटास आज तारखे पावेतों असा तहशिलदार आला नसून पुढें ही असा येण्यास आकोटचें मोठें भाग्यच पाहिजे, असें सर्वतो मुखीं शब्द बाहिर पडतात; यांचें अकालीं मरणानें प्रजाजनांस इतकें जर असह्य दुःख प्राप्त झालें आहे, तर ज्यांचा जन्म संबध व चें सर्व पारिअवलंबन रावसाहेबावर होतें, अशा त्यांच्या प्रियपत्नीस व बंधु वर्गास केवढ्या दुस्तर दुःखसमुद्रांत ढकलून दिलें असेल, व केवढा तरी दुःसह कुठाराघात त्यांजवर झाला, या बद्दल वाचक ही अनुमान करितील.

रावसाहेबांचे मरण कालीं जे दोन अद्भुत चमत्कार झाले, त्या वरून हा कोणी तरी अवतारी पुरुष असावा, असें अनुमान करण्यास भाविकजनास तर तिळमात्र कांहीं शंका करणें नको. ते हे कीं, खजिन्यातील सर्व दिवे वारा वगैरे नसतां आपोआप विझून गेले. हा मध्यम लोकांत घडलेला प्रकार! व दुसरा आकाशांत, भूपालाचे मरणकाळीं जसे मोठमोठे तारे तुटतात, त्याच प्रमाणें दोन मोठाले तारे तुटले, असें बरेच लोकांनीं पहिलें आहे.

---

# वऱ्हाडसमाचार

मित्ती आषाढ वद्य ९ शके १८१४

सन १८९१ सालच्या तुरुंगखात्याचा वार्षिक रिपोर्ट मामूल वहिवाटी प्रमाणें आमच्या कडे आल्या विषयीं आम्ही मागें कळविलें आहेच. प्रस्तुत अंकीं त्या रिपोर्टांतील ठोकळ ठोकळ माहिती गोळा करेजेनें मराठींत देण्याचा आमचा विचार आहे. सन १८९० अखेर वऱ्हाडांतील सर्व कैद्यांची एकुणात संख्या ८६४ हून ती मागील सर्व वर्षा पेक्षा कमी आहे. तुरुंगखातें स्थापित झालें त्या अव्वल तारखे पासून आज तागाईत कैद्यांची संख्या दरवर्षी ८६४ हून अधीक असे. तुरुंग खात्याची लोकसंख्या कमी झाला हें एक सुचिन्ह होय. परंतु हा प्रकार सर्व वर्षभर टिकला नाहीं. १८९० त २०३४ कैदी नवे पटावर दाखल झाले होते परंतु १८९१ सालीं २८०५ नवे कैदी कारागृहांत घालण्यांत आले त्या पैकीं साल भरांत शिक्षा भोगून मुक्त झालेले कैदी २५६५ वजा जातां रिपोर्टीच्या साल अखेरच्या ताळेबंदीत ११०४ कैदी शिलकींत राहिले. १८९१ त नवे कैदी तुरुंगांत आले त्या पैकीं बहुतेक भरणा शेवटच्या सहा महिन्यांत झाला अकोल्यां जिल्ह्यांत पुष्कळजणांस कैदेची शिक्षा देण्यांत आली याचें कारण असें दर्शविण्यांत आलें आहे कीं धान्याचे भाव फार जबर झाले त्या मुळें अपराध्यांची संख्या दुणावली. धान्याच्या महगर्तचे कारण बरोबर असतें तर कैद्याची वाढ सर्व साही जिल्ह्यांत निदान जवळ जवळ सारखीच झाली असती परंतु खरी स्थिती तशी नाहीं म्हणून तें कारण लागूं पडत नाहीं असें दिसतें.

वऱ्हाडांतील तुरुंगखात्याचा एकूण वर्षाचा खर्च रुपये ६१०८६ असून त्यांत तुरुगांतील निरानराळ्या कारखान्या पासून उत्पन्न झालेली रक्कम वजा करितां सरकारच्या अंगावर रुपये ४९२८९–९ आ० एवढा बोजा बसला. प्रत्येक कैद्याच्या खाण्याचा खर्च सर्व वर्षांत रु० २४–८– आ. ४ पै. लागला. कैद्यासाठीं धान्याचा पुरवठा कंत्राटदारा कडून घेतात ही चाल किफायतीची नाहीं असें वाटल्या वरून कर्नल लेन यांनीं अकोल्याच्या जेल सुपरिनटेंडंटास स्वतां धान्याची खरेदी करण्यास सांगितलें आणि तसें करण्या पासून शेवटीं चांगला फायदा दिसून आला. कंत्राटदार माल बरावाईट देतात इतकेंच नव्हे तर धारणीच्या बाजूनें ही त्यांच्या कडून माल घेण्यांत घेणाऱ्यांचें नुकसान असतें. इनस्पेक्टर जनरल व कमिशनर साहेब यांचा एक अभिप्राय जुळतो कीं हंगामाच्या वेळीं धान्य स्वस्त पडतें तेव्हां वर्षास लागणारा धान्याचा सांठा करून टाकावा आणि हीं धान्यें सांठविण्या साठीं आरंभी कांहीं व्यवस्था कराव्या लागतील व त्या बद्दल खर्च थोडा ज्यास्ती लागला तरी ती मागाहून सर्व भरून येणारा आहे.

---

विलायतच्या पार्लमेंटाची निवडानिवड संपत आली आहे. कान्सरव्हेटीव पक्षाचा पाडाव होऊन लिबरल पक्ष विजयी होण्याचीं चिन्हें दिसत आहेत. ६७० सभासद सर्व निवडले जाणार आहेत त्यांत लिबरल पक्षाची सरशी पांच पंचवीस सभासदांनीं झाली तर सालिबरींचे प्रधान मंडळ पार्लमेंटांत पुन्हां बसणार आणि उलट पक्षाच्या मताधिक्यानें त्यांचा एखाद्या प्रकरणांत पराजय होईं पावेतों मि० ग्लाडस्टन प्रभृति लोकांच्या हातीं राज्यसूत्रें न देण्याचा त्यांचा विचार आहे.

---

शेट दादाभाई नवरोजी सभासद झाले ह्मणून सर्व देशभर जयजयकार चालला आहे. या आनंदाच्या भरांत केन प्रभृति हिंदुस्थानचे खरे हितचिंतक निवडले गेले हें ऐकून विशेषच आल्हाद वाटतो. ' अमृतबझार पत्रिका ' कर्त्यांनीं या प्रसंगीं दुःख दर्शविलें आहे कीं मि० ब्राडलॉ साहेब हे पार्लमेंटाचे सभासद या नात्यानें या पुढें मरण पावले. अलिकडे या साहेबांनीं निराशेनें हातपाय गाळले होते, आणि शेवटीं तर ज्ञानभ्रंश होऊन ते बरळण्यास लागले होते. अखेरिस निवडणूकीच्या वेळीं त्रिदोष होऊन ते परलोकवासी झाले. हिंदुस्थानचे हे खरे शत्रु ह्मणून हिंदुस्थानास हात दाखविण्यास कधींही ते विसरले नाहींत. परंतु या पुढें काय? ' महीमेसे आया महीमे गया '

---

रा. रा. केशव जयकृष्ण कारकून बाळापूर तहशिली यानें तहशिलदारांच्या तोंडी सांगण्या वरून अंदुऱ्याच्या पाटीलकीवर 'हिंम्मतरावा' च्या नांवानें हुकूम लिहावयाचा तेथें चुकीनें 'हणुमंतरावा' च्या नांवानें लिहिला तहशीलदारांची सही होऊन चुकीची अंमलबारी झाल्या नंतर ती उघगली. दोन्ही नांवाचा जवळ जवळ सारखेपणा व दुसऱ्या नांवाचा विशेष रुढी या मुळें हा घोटाळा झाला वाईट हेतु बिलकुल नव्हता. या चुकी बद्दल डेपुटी कमिशनर गाडवीन आस्टीन यांनीं एकदम बडतर्फी फर्मावली. सोळा सतरा वर्षांचा जुना, नेकीच्या कसास लागलेला, दंडाची ही शिक्षा न पावलेला कारकून क्षुल्लक, अहेतुक, ध्वनिभ्रमाच्या चुकी बद्दल बडतर्फीला योग्य ठरला तर त्याच धारवाडी काट्यानें शिपाया पासून रेसिडेंटा पर्यंत किती सरकारी नोकर चाकरीवर बहाल राहतील न कळे! मनुष्य प्राण्याची व्याख्या अशी देतात कीं मनुष्य हा चुकीला पात्र आहे पण हें तत्वज्ञान वरिष्ठांस ठाऊक नसेल काय! या न्यायस्वरूपी अन्यायाची कोणी दाद घेईल तर बरें.

---

# The Berar Samachar

MONDAY, JULY 18 1892

From the latest returns of elections the tide seems to flow decidedly in favour of the Gladstonian party. The elections are approaching to an end & out of the whole number of 670 members 567 have been elected by Thursday last. The small gain of seats on the Conservative side will soon dwindle away in the face of the large nett gains that stand to the balance of the Liberals. But it is probable that the Ministerials will be defeated not by a workable majority of their opponents, but by a some few units. The probabilities in such calculations are of course uncertain, shifting and momentary. The chances being the same as at the elections of 1886 for the rest of the seats to be filled up within a few days the Liberal party is sanguine & hopeful of securing a higher number of seats than those that have been and will be secured by the opposite party.

No doubt when we briefly enumerate the principles of the two great interests of the nation we give to our readers a trite account such as is known to every schoolboy. Yet often in the heat of party questions even our best educated men misunderstand the Tory and Whig creeds. So we propose separating what our people understand in a mixed and confused jargon of unmeaning literature.

Looking to the essential characteristics of the two mighty interests in English politics each is specially conducive to welfare of the commonwealth. The Conservative is a friend to order and tranquility. The Liberal is a friend to liberty and progress. A state without the means of preservation is a state of the butterflies of summer or of bees in hives ever ready to change their abodes. In the same way a state without the means to progress and advance can never keep pace with the growing civilization and improvement consequent on the increase of man's comfort and knowledge. Thus the Conservative is a friend to preservation and the Liberal a friend to progression. The existence of one only will be like the statue of polyphemus with his single eye out; that part being taken out which throws light on the whole. The existence of the Conservative party may be compared to a ballast in a ship able to check the vessel in a storm of innovations. Both the parties therefore may essentially differ but both are essential to the wellbeing of a nation.

At present the two great English parties have been branched into different subdivisions differing little in their main principles. The Irish question is the sole cause why we see this comparatively large number of subdivisions. To it owes the schismatic section of the Unionist Liberals. Those who go with the opinions of Gladstone on the great Irish problem are called Gladstonian Liberals. The Unionist no doubt is a Liberal but on the present and long discussed Irish problem he will form a heartfelt and earnest conjunction with

the Conservatives from whom he differs in all his other political measures. The Gladstonian Liberal is an ultra democrat with all the moral earnestness of his most illustrious leader. The Unionist is the old whig. The Conservative is the friend to preservation and order. All Irish members are Home-rulers desirous of having a distinct Parliament for Ireland. The party advocating the views of the late Parnell are Parnelites & those who deserted him after the sad but memorable Oshea case are called anti-Parnelites. Such is the description of each of the parties. The Gladstonians and the Home-rulers are necessarily one party and the other is that composed of the Unionists and the Conservatives, so far as the Irish question is concerned.

We have already given the chances as they stand with each of these two great and mighty political parties.

The Irish question was the burning interest of the Gladstonian Ministry of 1880. It was still more violently discussed in 1885 and it at length overthrew that Ministry. At the commencement of the late Parliament the coercive measures of Salisbury threatened the existence of his Ministry, But the storm was temporarily subsided. The people are now annoyed with this unsatisfactory state of things. The Irish nation has during the past twelve years shown manifest discontent. The whole nation is anxious to put a check to this confusion. The Parliament has not been able systematically to proceed with other business during the past twelve years. The records have grown causelessly voluminous. The major part of time is spent in fertile and unsettled discussions. The whole nation therefore must naturally be sick of the problem; and the sooner it is settled the better for the vigour and ardour of the Parliament as well as the nation as a whole. Both parties admit that Ireland stands deplorably in need of more privileges. But the difference lies in laying the limits. This done for some years at least there will be calm and repose of the days of Walpole & Chatham. Every one knows how discontented and miserable Ireland has been ever since her Union with Great Britain in 1700. The Conservatives probably justly regard Ireland a nation of Twists and fear their increasing their demands. Gladstonians are the first to admit the principles of political morality in the annals of a nation's history and have their reliance upon the nation's gratitude.

This being the attitude of the whole nation and the parties towards Ireland even if the Conservative majorities were returned there are chances that the Conservative ministers will not be re-elected by the elective constituencies and thus when an appeal is made to the nation for confirmation of the ministerial seats the Parliament may be dissolved. This might be naturally expected from the account and registers of the past twelve years and from the desire of the people in general to settle the Problem of Ireland.

---

Though rather late but not the least in the sincerity of our wishes has at length come off the election of our Esteemed countryman Dada Bhoy Naoroji, to the Parliamentary seat from Central Finsbury. Looking to the principle the Grand old "Black Man" laid his country under a spell that the Englishmen are capable of rewarding and appreciating merit. His election has unveiled a number of vague misgivings and will be a stepping stone to other Hindus of equal pluck and public spirit. The universal rejoicing of the whole country justly proves that though a considerable but narrow-minded section of the Parsi Committee regards itself different from the Hindus, the Hindus are yet eager to admit the Parsis to the pale of their nationality. We have several reflections to make but what they say that excessive joy smothers all reflection holds pre-eminently in our case.

---

## वऱ्हाड

हवामान—पाऊस मुबलक पडून पाऊणे सोळा इंचावर एकंदर झाला आहे. झिमझिम पाऊस, ओलसर जागा आणि रोगकारक सर्द हवा यांनीं ताप, खोकला, पडसें वगैरे दुखण्याना जोर आला. परंतु दोनतीन दिवसा पासून उघडीक असल्या मुळें हवा स्वच्छ आहे.

बाळापूरचे शेट पोपटलाल यांजवरील खटल्याचा निकाल आज तारखेवर पुन्हा लांबविण्यांत आला आहे.

गेल्या सोमवारीं अकोल्याच्या तुरुंगांतील जन्मठेपीचे व काळपाण्या वरील शिक्षेचे कैदी सायंकाळच्या सुमारास जेलर व दरोगा यांजवर बिथरले व त्या लटापटींत जेलरला ओझरता दगड लागून साधारण पण बरीच दुखापत झाली. तुरुंगाच्या भिंतीला भोंक पाडून पलायन करण्याच्या उद्योगांत कैदी असून त्यांनीं दगडांचा वर्षाव बाहेरील लोकांवर चालविला होता भयसूचक बिगूल होतांच पलटणीचे व पोलीसचे शिपायांनीं तलवार बंदुका घेऊन तुरुंगाला गराडा दिला. मि. गाडविन आस्टीन, कर्नल लेन, कम्बरलीज वगैरे अधिकारी दंग्याच्या जागीं दाखल झाले. बायगार काढले व कांहीं गोळीबार काढले. नव्या पाडलेल्या भोंकाच्या तोंडाशीं एक कैदी गोळीनें ठार केला आणखी दोघेजण बळी पडले व दोघे मरणप्राय जायबंद झाले तेव्हां पुढें कर्नल लेन साहेबांच्या चातुर्यानें अधीक प्राणहानि न होतां सर्व शांतता झाली. जेलर खेरीज कारकून वगैरे कोणास ही इजा व उपद्रव झाला नाहीं. खावयला नीट मिळत नाहीं व फार छळ होतो म्हणून हे लोक बिथरले व त्यांचा एक बेत होऊन दंगा उसळला असें म्हणतात. खरें काय असेल कोण जाणे!

परंतु मनुष्यानें माणुसकी मनुष्यास तरी दाखविली पाहिजे. बिथरलेल्या लोकांस कांजीघर, फटके, अंधार कोठडी इत्यादि भयंकर शिक्षा न देतां त्यांजवर दयाळु होऊन व त्यांचा खरा अर्ज ऐकून वरिष्ठ अधिकारी त्यांची दुसऱ्या एखाद्या तुरुगांत बदली करितील तर बरें! मरणाला आड करून कैद्यांनीं राजद्रोह न करितां बंडावा केला पण त्यांस योग्य प्रकारें ताब्यावर आणण्या विषयीं कर्नल लेन विशेष तजवीज करितील असें आम्हीं इच्छितों.

कर्नल लेन इनस्पेक्टर जनरल आफ जेल, रजिस्ट्रेशन, पोलीस इ० यांची स्वारी वरील दंग्याचे आदले दिवशीं आफिस तपासणी साठीं अकोल्यास आली होती ते बुधवारीं हैदराबादेस रवाना झाले.

कर्नल मेकंझी कमिशनर हे मुलकी कायद्याचें कानफरन्स तहकूब ठेऊन जेलच्या दंग्या निमित्त उभाउभी येऊन परत उमरावतीस गेले.

रा. रा. विठ्ठल सदाशिव करकरे, दर्यापूर यांस खामगांवच्या नायब तहशिलदारीवर बदललें असें समजतें.

डाक्टर लिटल सानिटरी कमिशनर हे येत्या आगष्ट महिन्यापासून पंधरा महिन्यांच्या रजेवर विलायतेस जाणार आहेत. 'वैदर्भिकोरा'स समजतें कीं त्यांच्या रजेंत बंगालचा कोणी साहेब येणार आहे.

रा० रा० बळवंतराव वैद्य हे आपल्या ट्रेनिंग कालेजांतील व्हाइस–प्रिन्सिपालच्या जागेवर परत रुजूं होऊन रा० रा० दामोदर कृष्ण टिळक हे पूर्ववत सब–डेपुटी इनस्पेक्टर झाले.

रा० रा० त्रिम्बक गणेश परांजपे यांस जुडिशिअल कमिशनरचे क्लार्क आफ कोर्टचे जागींच कायम ठेवून रा० रा० बळवंतराव कावळे यांस रजेवरून परत आल्यानंतर सेशन कोडताचे क्लार्क आफ कोर्टचे जाग्यावर नेमलें.

वऱ्हाड मुलकी कायद्याच्या मसुद्याचा कामवारीनें विचार करण्यासाठीं उमरावतीस कानफरन्स भरलें आहे त्यांचें काम अभिनंदनीय प्रकारें चाललें आहे.

रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. यांनीं वर्षोत्सव व्याख्यान मालेस आरंभ केल्या नंतर रा. रा. गोविंद नारायण काणे वकील उमरावती यांनीं मुद्दाम अकोल्यास येऊन त्या मालेंत दुसरें पुष्प गुंफिलें 'महादजी शिंदे' या विषयावर काल सायंकाळीं भाषण झालें.

---

### नोटीस

गिरधारी लाल वल्लद चंदुलाल रहाणार अकोट बुधवार वेस यांस— खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तुह्मी आह्मी सख्खे भाऊ असून, आज अजमासें १३ महिनें होत आले तुमचे आमचे जमत नाहीं ह्मणून मी निराळा राहिलों. तुमचेपाशीं मी असतांना बहुत कमाई केली. व त्या कमाई पासून तुह्मी घर बांधलें. सोन्या चांदीचे जिन्नस वगैरे उभयतांनीं वापकावर केले. रुपये ४०० शे उत्पन्नाची शेती पत्यानें घेतली. बैलगाडी ह्मैस वगैरे घेतली. आणखी ही बरीच इस्टेट उभयतांच्या कमाईनें झाली आहे ती सर्व मिळून इस्टेट अदमासें रु० ७७२ ची आहे. तर या इस्टेटी मध्यें माझी निमे इस्टेट आहे ती मागत असतां तुह्मी देत नाहीं. ह्मणून तुह्मांस नोटीशीनें कळवितें कीं, नोटीस पावल्या पासून आठ दिवसांत निमी इस्टेट माझी मजला द्यावी. न दिल्यास रीती प्रमाणें काम चालवून अखेर निकाल होईपर्यंत जें नुकसान होईल तें व ह्या नोटीशीचा खर्च तुह्मा पासून सर्व भरून घेतला जाईल. ह्मणून दिली नोटीस कळावें ता० १६ माहे जुलई सन १८९२ इ.

( सही. )

निशाणी बनसीलाल वल्लद चंदुलाल

राहणार आकोट याची असे.

---

### नोटीशीचें उत्तर

रा रा. माधव भवानी सोनार राहणार अकोलें यांस—खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं, तुह्मी नोटीस दिली ती खरी नाहीं. तुमचा जो कांहीं हक्क असेल तो पंच मार्फत ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत दाखवावा. असें झालें नाहीं तर पुढें कोणचे ही ह्मणणें तुमचें आह्मास मान्य नाहीं. ह्मणून दिलें नोटीशीचें उत्तर. ता० १७ माहे जुलाई सन १८९२

सही

रामचंद्र भवनी सोनार राह. अकोलें.

नथु भवानी सोनार राहणार. अकोलें.

---

पंजाब नादारी मोकद्दमा नंबर २६

सन १८९२.

नमुना ( जां )

विद्यमान नादारी कोर्टाचे जइज्य जिल्हे अकोलें.

सर्वत्र लोकांस नोटीस देण्यांत येतें कीं, वासुदेव नारायण कुळकर्णी राहणार बटवाडी बुजरुख तालुके बाळापूर हा नादारी आहे असा आज तारीख ९ माहे जुलई सन १८९२ इ० रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख ३० माहे जुलई सन १८९२ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपल्या तर्फेचा असाईनी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटकें विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटकेसंबंधीं ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्याबद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटीशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल तें. आणि त्याबद्दल साक्षीस समन्सें करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमूद करावी. ही नोटीस न जाण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरीं पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पाहण्या करितां नादारानें दाखल कलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत.

ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असल्या बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे रहाणारे असतील त्यांनीं आठ आण्याच्या स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशिअल आफिसरा पुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी. आणि ती यादी टपाला कडून कोर्टास पाठवावी. ह्मणजे ते दावे रजिष्टरीं दाखल होतील. कळावें. ता० १५—७—९२ इ.

Saifuddin khan.

नादारी कोर्टाचे क्लार्क

जिल्हे अकोलें

---

## जाहिरात

म्युनिसिपालिटीच्या हद्दींत निघालेली बाभळीचीं वगैरे कांकडें टाऊनहालच्या कांपोडांत जमा करून ठेवलीं आहेत. व त्यांचा हरास तारीख २१ आहे जुलै सन १८९२ रोजीं ( गुरुवारीं ) सकाळीं ७॥ वाजतां होणार आहे तरी ज्यांस घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदहू वेळीं टौनहालांत हजर रहावें कळावें तारीख १६ जुलै सन १८९२ इ.

Vyankatesh R. Mudholkar

सेक्रेटरी म्युनिसिपाल कमिटी अकोलें.

---

## वर्तमानसार

कांचेचा महाल—सयाम येथें राजानें आपल्या करतां एक सुंदर कांचेचा महाल बनविला आहे. या महालाच्या भिंती जमिनी वैगेरे सर्व तऱ्हेतऱ्हेच्या नाड कांचेच्या बसविल्या आहेत. महालांत जाण्यास एक दरवाजा ठेविला असून या दरवाजानें राजा आंत शिरला म्हणजे सुंदर गाणें सुरूं होतें. व जसजसा तो पुढें जाऊंलागतो, तसतसा बंगला ही सरकत जाऊन जमिनी मध्यें एक मोठा हौद आहे त्यांत एकदम बंगल्यासह शिरतो. येथें राजे साहेब आपला सर्व वेळ खाण्यापिण्यांत व मौज मारण्यांत मोठ्या आनंदानें घालवितात, पांडवांचे राजसूयज्ञाचे वेळीं मयासुरानें जी मयसभा करून त्या कालीं कौशल्याची अगदीं पराकाष्टा केली होती, त्याप्रमाणें हा वरील महाल या युगांतील मयसभाच समजली पाहिजे.

आमचे सरकार शेतकऱ्यांच्या हितासाठीं म्हणून शेतकी कायद्याचें कमिशन बसवीत आहे. पण शेतसाऱ्यांत तूट पडतां कामानये असें दुसरी कडून ठरविण्यांत येत आहे. अशा वेळीं रशिन सरकार आपल्या शेतकरी रयतेसाठीं काय सोई करीत आहे हें पाहणें फार महत्वाचें आहे. रशियन सरकारानें नुकताच एक असा हुकूम सोडला आहे कीं प्रत्येक ३०० शेतकऱ्यांच्या झोपडीला सरकारी धान्याचीं एक किंवा दोन कोठारें असावींत, व शेतकऱ्यांस धान्य लागल्यास त्यांनीं तें तेथून न्यावें व शेतांतलें उगविलें म्हणजे परत आणून द्यावें. या शिवाय दुष्काळ पडूं नये म्हणून काय काय तजविनी केल्या पाहिजेत, हें समजण्यासाठीं एक स्पेशल खातें स्थापन करण्यांत येणार आहे ज्या मद्रास इलाख्यांत दुष्काळानें आपलें पूर्ण स्वरूप दाखविलें, तेथील जमीन वारा २७ रुपयेच वसूल व्हावयाचा रहावा हें चांगल्या राज्यपद्धतीचें द्योतकच आहे नव्हे काय?

सरकार, अदुबलहक व निजाम—यांचा देक्कन माइनींग कंपनी संबंधानें जो जंगी खटला चालला होता व ज्याची मजल पार्लमेंट पर्यंत गेली होती, त्याचा एकदांचा आपसांत निकाल झाला. सरदारानें चार्टर्ड ब्यांकेमध्यें जे १,२५० शेर ठेविले होते त्यां पैकीं, ७,५०० शेर त्यानें निजाम सरकारास द्यावे. तसेंच निजामानें या कोणत्याही रकमेबद्दल सरदारांकडून व्याज घेऊं नये. तसेंच सरकारानें ही या सरदारावर कांहीं नुकसानीची वैगेरे फिर्याद करूं नये ज्या दिवसापासून सरदारास सस्पेंड करण्यांत आलें आहे, त्या दिवसापासून त्यांनीं आपल्या कामाचा राजीनामाच दिला आहे, असें समजावें. रेलवे अगरखाना वैगेरे बद्दल सरकारानें कांहीं दावा सांगूं नये सरदारास जों जीं कुळाग्रांट बिल्डिंग्ज ४ लाख रुपयांस दिली आहेत त्यां बद्दलची खतें सरकारानें निजामसरकारचे नांवें करावी. तसेंच सरदारानें जे सरकारी लोनाचे कागद चार्टर्ड ब्यांकेमध्यें डिपाझिट ठेविले आहेत ते सर्व त्यानें सरकारास द्यावें १९ लाख रुपयांचे रकमे करितां सरदारानें आपल्या तीन इमारती तीन वर्षांपर्यंत निजाम सरकाराकडे ठेवाव्या व फिर्यादीचा खर्च ज्यांनीं त्यांनीं आपला सोसावा.

सरहद्दीवर गडबड—सरहद्दीवर कुकी खेल लोकांनीं गडबड चालविली आहे. हजारा प्रांतांत अमिराविरुद्ध दोन जातींचे लोक उठले आहेत. या गडबडी मुळें जमरूड येथील किल्याच्या रक्षणार्थ इंग्रज सरकारानें २ तोफा, रायल स्काटस पैकीं १०० आणि शीक पलटणी पैकीं २०० लोक जमरूड किल्यावर पाठविले आहेत असें कालच्या टा० इ० वरून कळतें शु० सू०

आफ्रिका देशांत मुंग्यांचें कालवण करून खातात व त्याच्या संगती जर केळीं असली तर फार रुचिकर लागतें असें ह्मणतात.

एका घड्याळांत १५६ निरनिराळे मोठे बारीक तुकडे असतात. जेव्हां घड्याळें पहिल्यानें केली, तेव्हां एकांत ८०० तुकडे असत.

युनायटेड स्टेटस्मध्यें १७,००० वर्तमान पत्रें आहेत व ही छापण्यास २,००,००,००० डालर लागतात.

जगांतील लोक संख्ये पैकीं ५० कोटि लोक सामान सुमारानें भरलेल्या घरांत राहतात; सत्तर कोटि लोक झोपड्यांत कोठड्यांत राहतात; व २५ कोटि लोकांना घर कसें तें मुळींच माहीत नाहीं. न्यायसिंधू.

सोलापूर परवांच्या मुद्दाम भरविलेल्या जाहीर सभेंत ठरल्या प्रमाणें आनरेबल दादाभाई नौरोजी यांच्या निवडणुकीबद्दल आभार व आनंद प्रदर्शक तारा पीपलस असोसिएशन कडून प्रसिडेंट श्री. मल्लापा अण्णा वारद यांच्या सहीनें गेल्या. याशिवाय हायस्कूलच्या विद्यार्थ्यांकडून एक व मि. बापूजी परशुराम फडके वकील यांणीं स्वतः आपल्या खर्चानें केलेली एक अशा आणखीही तारा गेल्या. याचप्रमाणें प्रसिद्ध मद्यपान निषेधक ना. केन साहेब हे पार्लमेंटचे मेंबर निवडले गेल्याबद्दल त्यांचेंही येथील टेंपरन्स असोसिएशनकडून अभिनंदन होईलच.

सोलापूर थोडे दिवसांपूर्वी करोडगिरीकडील ज्या एका पार्शी दरोगे साहेबांनीं एका साहेबांनीं एका वाटसरू तरुण औरतेविषयीं पापवासना धरून कित्येक लोकांस मोठमोठ्या दुखापती केल्याबद्दल त्यांजवर खटला झाल्याचे आह्मी कळविलें होते, त्याची चौकशी बार्शीचे मामलेदार रा. सा. जोगळेकर यांजपुढें इतके दिवस होऊन. अखेर सदर दरोगे साहेबांस १८ महिनें सक्तमजुरी कैद व ११०० रुपये दंड याप्रमाणें शिक्षा झाली. दंडाच्या रकमेपैकीं १०० रुपये केशव नांवाच्या इसमास झालेल्या मोठ्या जखमेबद्दल द्यावे असा ठराव झाला दरोगे साहेब हे मोंगलाईंतील एक मोठे हुद्देदार असून या कामांत त्यांनीं पैसेही अतिशय खर्चून पुराव्यास बराच कमीपणा आणल्याचा पुकारा होता, पण माजिस्त्रेट रा. सा. जोगळेकर यांणीं योग्य न्याय केला हें ऐकून पुष्कळांस समाधान वाटत आहे.

कोल्हापूरचें कपिल तीर्थ अजी बुजवून टाकण्याकरितां तेथील म्यु. नें १६००० रुपये मंजूर केले आहे.

या देशांत सनदी वकील ६०,००० झाले आहेत, करितां आतां वकीलीची परीक्षा दरसाल न घेतां दोन तीन वर्षांनीं एकदां घेत जावी, अशी एका पत्रकर्त्यानें सूचना केली आहे. विलायतेस एकट्या लंडन शहरांत ५००० हजार वकील आहेत! क. त.

कांपेन्सेशनः— ओखाराजवळ दोन मेल गाड्यांची टक्कर झाली त्यांत मरण पावलेल्या एका उतारूच्या बापानें आणि बायकोनें रेलवे कंपनीवर अनुक्रमें १,००,००० आणि ६०,००० रुपयांची नुकसानी देण्याचा दावा केला आहे. रेलवे कंपनीनें या दोघांत कायदेशीर वारस कोण समजावा या बद्दलच्या अभिप्रायासाठीं हें खटलें मांटगोमरीच्या डिस्ट्रिक्ट जज्जाकडे पाठविलें आहे. बापाचें ह्मणणें आहे कीं, माझें जीवित केवळ माझ्या मुलावर अवलंबून होतें. बायकोचें ह्मणणें आहे कीं, माझें घराण्यांत पुनर्विवाहाची चाल नाहीं; यासाठीं माझ्या नवऱ्याची मीच वारस आहे. खटल्याचा निकाल व्हावयाचा आहे. दी० बं०

आमचे पाहण्यांत एका स्त्रीचे स्तनांतून सदां दूध येत आहे. ह्या गोष्टीस बरेच दिवस झाले. अंगावर लेकरूं पीत असतांना देखील सारखा दुग्धस्त्राव होत असतो. लेकरूं पोरटें झाल्यावरही त्याच प्रमाणें दूध वाहतें. ह्या हकीकतीवरून पाहतां ती स्त्री जशी अशक्त असावी तशी नाहीं, तथापि अशक्तच आहे. तिचीं लेकरें साधारण अशक्त असून पोटांतील व बाहेरचे पुष्कळ इंग्रजी वैगेरे उपचार केले तथापि तिचा व्याधी जात नाहीं. देशी अनुभविक औषध कोणास ठाऊक असल्यास त्यानें तें लिहून आमच्याकडे पाठविल्यास आह्मी त्याचा योग्य अनुभव कळवूं. भिषग्विलास.

मेसर्स ऍक्क् कुक आणि सन्स् लिव्हरपूल येथील कापसाचे दलाल, या कंपनीचे दिवाळें निघालें; या कंपनीला कर्ज एकंदर २५००० पौंड आहे.

या वरील कंपनी जवळ ११००० कापसाचे गठ्ठे शिल्लक आहेत. व ते दररोज २५०० गठ्ठे प्रमाणें विकले जातील.

मि० दादाभाई नौरोजी यांची फिन्सबरि तर्फेनें पार्लमेंटचे सभासद ह्मणून निवडणूक झाल्याबद्दल लोकांचा आनंद व आभार प्रदर्शित करण्याकरितां, राजा सर रामस्वामी मुदलियार हे मद्रासेस एक सार्वजनिक सभा भरविणार आहेत. सु० प०

पेनवेलीस होणाऱ्या पाण्याचे पुरवठ्याचे मदतीकरितां सर दिनशा माणिकजी पेटिट यांनीं १५,००० रुपये दिले.

एक आण्याची अफू घेऊन त्यांतील अर्धी दुसऱ्या एकास विकल्यावरून परवान्याशिवाय अफू विकल्याचा आरोप शाबीत धरून मुंबई येथें देणारास ६ व घेणारास १० रुपये दंड झाला. क

## नोटीस

झीमा मर्द मोहन बक्स जात मुसलमानीन राहणार शहर इलिचपुर—कासदपुरा यांसः—

या नोटीशीचें द्वारें खालीं सही करणार यानकडून कळविण्यांत येतें कीं, कजबे उपात खेडा प्रगणें जामगड ता० मेलघाट येथील शेतें दोन तुमचे नांवचे खातें असून सदर्हू दोन्ही शेतें कुंदाकाडी साफ करून देण्याचे करारानें आम्हास सात वर्षांचा कौल ता० १६ माहे मार्च सन १८९१ इ० इलिचपूर येथें करून दिला. शेतें खालीं येणें प्रमाणें:—

१ निशानी चारवाला. ठिकाणा नं० ९१ आ० रु० १६ ८

२ निशानी बाभळीवाले ठिकाणा नं० १४ आ० रु० ४

सदर्हू दोन्ही शेतेचा रजिष्टर आपण करून देण्याविषयीं चिकलदरा तालुके कचेरींत (कौल दिला त्या वेळेस) सांगितलें होतें. व त्या मागून ही मी आपणास दोनचार वेळां रजिष्टर करण्या विषयीं सांगितलें परंतु तूं खोटे असून तुला याजविषयीं कांहीं समज असून हयगय करितेस तर आतां ही नोटीस पोहोंचल्या नंतर पांच दिवसांनीं रजिष्टर करून द्यावें. जर न केल्यास तुला दिलेले इ० सन १८९१ सालांत रु० २७. व हल्लीं इ० सन १८९२ सालांत रु० ४. व जवारी कुळे दहा व कुंदा खोळ वगैरे साफ करण्यास खर्च लागलेला भरून घेऊन हाच रजिष्टर पक्का समजावें. कळावें तारीख २०-६-९२ इ.

(सही.)

दुर्गा प्रसाद गुरदीन लाल
उपात खेडा.

## नोटीस

माधो वलद कर्णाजी भगत जात कुणबी रहाणार कुऱ्हा बोठ (मलकापूर नवळील) ता० भुसावळ जिल्हा खानदेश यासः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तुझें माझें लग्न होऊन आज १६ वर्षें झालीं त्यांत मी अज्ञान दशेंत असतां तूं आपलें घरीं फक्त एक वेळ घेऊन गेलास त्यावर पुन्हा ११ वर्षांनी मी सज्ञान दशेंत असतां पुष्कळ लोकांना तुजला फजीत केल्या वरून तूं मांडे खातर मजला नेण्या करितां तेव्हां येथें आलास. मी येण्यास एक पायावर तयार असतांही मजला न नेतां रात्रीसच गुप्तपणें पळून गेलास त्यावर पुन्हा मजला नेण्याचें नांव ही नाहीं. यावरून मजला वागविणें नाहीं असें स्पष्ट दिसतें. मजला वयांत येऊन आज ८।९ वर्षें झालीं माझें तारुण्य व्यर्थ जात आहे करितां या नोटीशीनें तुजला लिहून कळवितें कीं आज पासून १५ दिवसांचे आंत मी वयांत आल्या पासून दरसाल मजला रुपये ५० प्रमाणें उदर-निर्वाहा करितां सावकाराकडून रुपये ४०० आज पर्यंत खर्च झाले आहेत ते देऊन टाकून मजला आपले घरीं घेऊन जावें. मी नांदण्यास अगदीं तयार आहे तसें करणें नसल्यास रीती प्रमाणें मजला वर लिहिल्या मुदतींत सोडचिठ्ठी लिहून दे ह्मणजे दुसरा मार्ग मजला खुला होईल या प्रमाणें कोणत्याही गोष्टीची अंमलबारी न झाल्यास तुज विरुद्ध मजला कायद्याचें कोर्टांत योग्य तजवीज करणें भाग पडेल व त्याज मुळें तुझें फार नुकसान होईल. करितां मुद्दाम या लेखी नोटीशीनें कळविलें आहे. कळावें. ता० १२ माहे जुलैसन १८९२ इ०

(सही.)

तानी मर्द माधो भगत कुणबी
हल्लीं वस्ती खामगांव निशाणी हातची बांगडी

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाचें आगाऊ रु० ९ डांक हाशील ०।१३
सहामाही " ३ " ०।८
सालअखेर " ७ " १।०८
किरकोळ अंकास ................०।०८

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ..........०।०१

SUBSCRIPTION
Rs.
Annum in advance 5 Postage 13 as
Annum in arrears 7 ,, 1Rs 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy..................................1as

Advertisements
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition per line3as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXVI — AKOLA MONDAY 25 JULY 1892 — NO 29

वर्ष २६ — अकोला सोमवार तारीख २५ माहे जुलै सन १८९२ इ० — अंक २९



## जाहिरात

—— 0 ——

अहो स्वदेश बांधवहो, परदेशी औषधी नुस्त्या रंगबाज व कमिशन जास्त पाहून कां फसतां? इकडे थोडें लक्ष द्या.

आमचे दवाखान्यांत सर्व रोगांवर औषधी विक्रीस व दरिद्री लोकांस फुकट तयार आहेत; परंतु त्यांत ज्या हटकून गुण खात्रीनें देतात त्यां पैकीं थोड्या प्रसिद्धीस देतों. त्यांतून जो दवा कोणास लागेल त्यांनीं खालीं लिहिलेले सहीचे पत्यावर पत्र पाठवावें. ह्मणजे आम्ही व्ह्याल्युपेबलनीं पोस्टमार्गें लवकर पाठवूं. व कोणी आजारी आमचे येथें येऊन औषध घेतील त्यांस प्रथम दुरुस्त करून ठरलेली किंमत मागाहून घेऊं.

हमेशा घेणारे ग्राहकांस कमिशन देऊं. व त्यांनीं विक्री करून दाम पाठवावें.

१ गजकर्णावर रामबाण, ६ दिवसांत गुण किंमत दर बाटलीस ०८ आणे.

२ मूळव्याध कितीही दिवसांची दुर्धर असेल त्यावर मोंडावर लावण्याचे व पोटांत घेण्याचें दोन औषधी मिळून किं. १॥ रु.

३ चातुर्थिक ज्वर ह्मणजे चवथारें हिंव ताप त्याच [illegible] रे कितीही दिवसांचे असो, त्याजवर मिश्रित औषध एकच बाटली पुरे. किं. १॥ रु. दुसरें औषध गोळ्या खात्रीच्या २१ गोळ्याच्या डबीस १०१ या औषधानें कडक तापही जातो.

४ परमा तिडिक व स्वप्नावस्था, व कोठ्यांतील उष्णता व क्षिणता या सर्वांवर मेहूणपुडा किं. १ पुड्यास ०।४ आणे.

५ बाळंत रोग बाळाचे हवे व सटवो बाधा व प्रदर सर्व तऱ्हेचा किं. १ डबीस १॥ रु.

६ वीस प्रकारचे मेहापैकीं १६ मेहावर १४ गोळ्यास किं. २॥=

७ नारुवर ९ दिवसांत गुण. लावणें व खाणे याच्या डबीस किं. ।

८ गुल्म पांच प्रकारचे व सर्व पोट गुळांवर व गोळ्यावर व पानथरीवर १ डबीस किं. ।।।

जुलाब उत्तम राजस तकलीफ अगदीं नसून कोठा साफ १ बाटली १० मनुष्यास पुरेल किं. १। रु.

१० मेदोरोग व घुरें व उन्माद यावर अगदीं जल्द गुण १ बाटलीस किं. २ रु.

११ स्त्रियांचे रक्तस्त्राव व ऋतुस्नात होण्यास व गर्भधारणास बंदेज ह्यांवर हें एकच औषध फार चांगलें आहे. १ डबीस किं. १॥

१२ पित्तस व मस्तकशूळ व अर्धशिशी यानवर दर डबीस किं. १०=

१३ हागवण व अतिसार १ डबीस किं. १।=

१४ वृषण एकारल्यास व वृद्धीस १ डबीस किं. १ रु.

१५ कावरले कुत्रें व कोल्हे व तेल्या उंदीर डसल्यास १ डबीस किं. १। रु.

१६ मेहानें अगर उष्णतेनें पाय उलून रक्त जाणें व संधि दुखणें ह्यावर १ डबीस किं. १॥ रु.

१७ महामारीवर अगदीं जलद गुण एक मनुष्यास १२ गोळ्या ५० गोळ्याच्या डबीस किं. १०–

१८ गर्मी उर्फ उपदंश संबंधी विकार क्षतें यांजवर १ डबीस किं. १॥ रु.

१९ फसकी उर्फ मज्जागतवात व शूळ याजवर लवकर १५ मिनिटांत गुण १ डबीस किं. ।॥ हें १५ मनुष्यांस पुरेल.

२० कऊळ, नळगुद, पंडु, सूज व मुत्ररोग ६५ व सन्निपात १३ यांवर १ डबीस किं. १॥ रु. ही ३ मुलें व २ पुरुषांस पुरेल.

२१ सुवर्णमालिनीवसंत खात्रीचा १ तोळ्यास किं. ७ रु.

२२ योगराज गुगुळ १ तोळ्यास ४॥ रुपये.

२३ नामर्द ह्मणजे नपुंसक कितीही दिवसांचा असो तरी तो तीन दिवसांत दुरुस्त [illegible] गुण न आल्यास पैसे परत मिळतील.

२४ डोळ्यांतील फूल वडस रातांधळे लाली खुपरी चुळ चीपडे गळती याजवर १ डबीस किं. १०६

या शिवाय जास्त माहिती मागविल्यास देऊं. व कोणी योग्य औषधें हमेशा मागवून विक्री करील त्यांनीं विक्री करून पैसे मागाहून पाठवावे.

(पत्ता व सही) शिवचरनगीर रामगीर
वैकुरणखेडकर अकोला गंगाधरचे
माडीवर चौकांत दवाखाना.
वऱ्हाड.


वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण शुद्ध २ शके १८१४

अल्पवयी मुलें शिक्षा पावलीं असतां त्यांची काय व्यवस्था करावी या संबंधानें कर्नल लेन यांस मोठा प्रश्न पडला आहे. मुलाला एक वर्षाची साधी कैद देण्यांत आली होती त्यामुळें त्याला काम करण्याचें कायद्या प्रमाणें जेलरास सांगतां येईना. त्याच्या इच्छेस आलें तर तो काम करणार आणि नाहीं तर तो स्वस्थपणें काल घालविणार असा प्रकार असल्यामुळें त्याला शिक्षण देतां येईना व त्याला चांगल्या धंद्याला ही लावतां येईना. तुरुंगांतील अन्य कैद्यांशीं मुलांचा सहवास घडला तर त्या मुलांच्या दीर्घ आयुष्याचा नाश होऊन तीं दुर्वर्तनाचा कित्ता उचलतील. तरा तरी वर्षांच्या मुलीस दोन पुरुषांशीं विवाह केल्या बद्दल शिक्षा झाली होती तिचो तुरुंगांतील दुष्कर्मपटु स्त्रियांशीं गांठ पडल्यानें तिच्या सर्व जन्माचें मातेरें होण्याचा संभव आहे ह्मणून कर्नल लेन साहेबांनीं दुःख प्रदर्शित केलें आहे. लहान लहान मुलांस थोड्यांत मुदतीच्या शिक्षा देऊं नयेत आणि ह्या अल्प शिक्षाच्या ऐवजीं फटक्यांची शिक्षा देण्याचा परिपाठ घालावा; मोठ्या मुदतीच्या शिक्षा शिवाय साध्या कैदेच्या नसाव्यात आणि या शिक्षा भोगणाऱ्या मुलांस शिक्षण देऊन त्यांना रोजगार धंद्यांची ओळख करून देण्याची व्यवस्था केली पाहिजे. वऱ्हाडांतुन पुण्याच्या अल्पवयी कैद्यांच्या शाळेंत पांच सहा मुलें पाठविण्यांत आलीं परंतु बाकीच्या संबंधानें नीट तरतूद राहिली नाहीं वऱ्हाडांतील कैदी मुला साठीं निराळी शाळा पुण्या मुंबई कडील रिफार्मेटरी प्रमाणें घालण्याविषयीं आग्रहपूर्वक सूचविण्यांत आलें आहे. रिफार्मेटरी असली ह्मणजे मोठ्या कैद्यांशी मुलांचा कधीं सहवास घडण्याचा संभव नसतो ह्मणन अकोला व उमरावती येथ मुलासाठी तुरुंगात शाळा आहे तरी देखील स्वतंत्र रिफार्मेटरी स्थापण्याची फार आवश्यकताआहे आणि रेसिडेंट साहेबांनीं ही सूचना अंमलांत आणण्या विषयीं अभिवचन दिलें आहे.

कैद्यांची वर्गवारी त्यांच्या धंद्यांच्या तत्वावर केली तर असें आढळून येईल कीं व्यापार धंद्यांतील लोक शिक्षेच्या अपराधांत थोडे सांपडतात आणि नोकरी चाकरी करून प्रपंच करणाऱ्या लोकामध्यें अपराध अधीक घडतात कां कीं अन्नपाण्याचा खर्च वाढण्यानें व पगार लहानसहान असण्यानें अपराध करण्यास चाकरगडी माणसें लवकर प्रवृत्त होतात. शेतकाम करणाऱ्या लोकांचा हा भरणा मोठा दिसतो परंतु शेतकरी म्हणविणाऱ्या लोकांची योग्य शहानिशा केली तर त्यांच्या वर्गांतील कमी कैदी निघावेत असा आमचा तर्क आहे. ज्याला कांहीं उद्योग धंदा नसतो तो म्हणतो की मी शेतकीचा अगर शेतकामांत मोल मजूरीचा धंदा करीत असतो. तुरुंगांतून सुटून पुन्हां अपराधा बद्दल शिक्षा भोगण्यास आलेले कैदी २२८ होते त्यांत २०८ कैदी आरंभींच ओळखण्यांत आले. सोळा कैदी पळून गेले त्यांत चौदांस पुन्हा पकडण्यांत आलें. पळून गेलेल्या कैद्यांत पटाईत रावजी कोळी हा अकोल्यास होता. तो फरारी झाला तेव्हां पासून अद्याप त्याचा पत्ता नाहीं. त्याची सुटका होण्यास तुरुंगांतील इतर संरक्षक लोकांचें त्यास साह्य ०सावें असा वहिम आला आहे. पोलीस शिपई पाहरा करीत असतां कैदी पळून जाऊं लागला तर त्यास गोळीबारानें ठार करण्याची कायद्यानें पहारेकऱ्यास मोकळीक आहे असें तुरुंगखात्याचे अधिकारी कर्नल लेन यांस निर्णयपूर्वक सांगवत नाहीं. त्या वर कमिशनर साहेब म्हणतात कीं कैदी पळून चालला असतां त्यास जमीन दोस्त करण्यास कांहीं हरकत असूं नये आणि ती हरकत असल्यास काढून टाकण्यांत आली पाहिजे. कैद्या मध्यें त्यांच्या पैकींच जे नायक वगैरे नेमले जातात त्यांचें वर्तन भरंवशा लायक नसतें आणि त्यांच्या ढील्या, स्वच्छंदी, व गैरविश्वासाच्या कामगिरीमुळें कैदी पळून जातात व तंबाखु, गांजा, अफू वगैरे निषिद्ध मादक पदार्थ चोरून उपयोगांत आणले जातात. वयांत आलेल्या अपराध्यांस तुरुंगांत शिक्षण देण्याचें प्रयोजन नाहीं असें तरुंगखात्यावर बसलेल्या कमिशनने ठराव केला आहे त्याअन्वयें कैद्यांच्या शाळा मोडण्यांत आल्या.

अकोल्याच्या तुरुंगांत सरकारी नमुने छापण्याचीं कामें चालत असत तीं बंद करून छापण्याचा सर्व कारखाना उमरावतीस एकत्र केला आणि कोष्ट्यांचा कारखाना सर्व अकोल्यास बदलला आहे. या दोन कारखान्या पासून वऱ्हाडांतील पोलिस खात्याला कपडा व सरकारी कचेऱ्यांना नमुने हे [illegible] त्या मानानें निम्म भरणा अकोला व उमरावती येथील तुरुंगांतून होतो. अकोल्याचा बगीचा व यवतमाळाचा विटा पाडण्याचा कारखाना हीं दोन्ही वर्णनीय कामें चालली आहेत.

दक्षिण शिकंदराबाद येथील तुरुंगाची व्यवस्था इनस्पेक्टर जनरल, वऱ्हाड यांजकडे अलिकडे सोंपविण्यांत आल्या कारणानें तिकडील तुरुंगाची हकीकत कळते कीं सन १८९१ त ३२७ कैदी असून प्रत्येक कैद्या मागें खर्च रुपये ११२–८ आ. ८ पै आला.

सन १८९१ सालच्या पोलिस रिपोर्टावर नवे जुडिशिअल कमिशनर मि. एफ. एस. बुलक यांनीं अभिप्राय दिला आहे तो विशेषें करून सर्वांनीं वाचण्या सारखा आहे त्या अभिप्रायांत एकंदर पोलीस खात्याच्या उणिवा कोणकोणत्या आहेत हे साधारणपणें दाखविलें आहे. मि. बुलक हे या प्रांताला अनोळखी अधिकारी आहेत आणि त्यांना इकडील माहिती फारशी नसावी. तरी त्यांचे विचार मोघमांत चांगले आहेत किंबहुना ते इंडियांतील पुष्कळ पोलीस खात्यास लागूं पडतील. त्यांच्या मताला आह्मी अधीक मान देतों. याचें कारण कीं, वायव्य प्रांतांत पोलीस खात्याविषयीं नव्या नव्या सुधारणा वाटत आहेत आणि साहेब बहादूर वऱ्हाडांत येण्या पूर्वीं तिकडे अधिकारी असल्यामुळें त्यांस त्या पक्केपणीं ठाऊक आहेत.

मि. बुलक साहेबांनीं आठ नऊ सूचना केल्या आहेत त्यांत एक प्रत्यक्ष पोलीस खात्याला लागूं नसून तिचा न्याय कोर्टाशीं संबंध आहे. वऱ्हाड प्रांतांत पब्लिक प्रासिक्युटर प्रत्येक जिल्ह्या मागें एकेक

नेमला जावा असा जुडिशिअल कमिशनर साहेबांचा अभिप्राय दिसतो. पोलिसांनीं गुन्हे पत्यांत आणावे आणि पोलिसांनींच त्या गुन्ह्यांच्या पुराव्याची मांडणूक न्यायाधीशा समोर करावी असा सांप्रदाय चालू आहे. आरोपी विरुद्ध पूर्वपक्ष चालविण्याची पाळी पोलिसा शिवाय कधीं कधीं माजिस्ट्रेटावर येते. जिल्ह्याच्या सदर ठिकाणास गुन्ह्याची सुनावणी करण्यास कोर्ट-इन्स्पेक्टर ह्मणून एक पोलीस कडील अंमलदार असतो. विशेष भानगडीचीं प्रकरणें असलीं ह्मणजे पोलीस खात्याचे मुख्य मुख्य अधिकारी सरकार तर्फे वकिली करितात. परंतु कांहीं प्रकरणांत सेशन कोडता समोर जिल्ह्याचे डेपुटी कमिशनर आपल्या हाताखालील माजिस्ट्रेटाकडे आरोपीच्या विरुद्ध पक्षाला सरकार तर्फे वकिली करण्याचें काम सोंपवितात असेंही प्रत्ययास आलें आहे. येणें प्रमाणें पोलीस कडील अंमलदार व माजिस्ट्रेट यांस आपलीं मुख्य कामें बाजूस ठेवून हीं वकिलीचीं कामें करावीं लागतात. न्यायाधीशा समोर खटल्याचा पूर्वपक्ष किंवा उत्तरपक्ष चालविणें फार दुर्घट असतें. त्याला कायद्याचें ज्ञान चांगलें लागतें. इत्थंभूत पुरावा असून हीं पुरें नाहीं. त्या पुराव्याची रचना कायद्याच्या कलमवारीला व तत्वाला धरून असावी लागतें. कायद्याचें ज्ञान, कोटिक्रम करण्याची शक्ति, शोधक व चौकस विचारदृष्टि, अनुभवानें येणारा वाकबगारपणा इत्यादि साधन-सामुग्री आरोपि विरुद्ध खटले चालविण्यास लागते आणि हा पोलीस अमलदार [illegible] माजिस्ट्रेट यांच्या पाशीं असतेच असें खात्रीनें ह्मणवत नाहीं. कित्येक गृहस्था-संबधानें आह्मांस असें ह्मणावें लागेल कीं, सरकार त्यांस 'अव्यापारेषु व्यापारं' करण्यास हुकूम करिते. सरकार तर्फे अवघड व घोटाळ्याचा पुरावा असला ह्मणजे त्या त्या वेळे पुरतां चांगला कायदेपंण्डित वकील ही नेमीत असतात परंतु ही व्यवस्था तेवढ्या पुरती असते. ही वकिली करण्याचें काम ज्या पोलीसा कडील अधिकाऱ्या कडे अगर माजिस्ट्रेटा कडे असतें त्यांचीं वास्तविक कामें बाजूस राहतात आणि त्यांच्यावर हा निराळा बोजा पडल्या मुळें त्यांच्या कडून स्वतांचें मूळचें काम नीट होत नाहीं तसेंच नवीन कामांत प्रवीणता नसल्या मुळें नवें ही काम नीट होत नाहीं. असें दोही बाजूंनीं नुकसान होऊन विनाकारण घोटाळा होतो आणि न्यायाच्या कामाला विघ्न येतात. आरोपीचा बचाव करण्यास चांगले शिकलेले व अनुभवाच्या कसास लागलेले वकील असतात. त्यांच्या समोर या अदर्पीकच्या वकिलीचा टिकाव लागत नाहीं आणि कायद्याच्या योग्य अंमलवारीला भलती अनिष्ट दिशा पूर्वपक्षाच्या कमशहाणपणानें लागते.

उत्तरोत्तर सुधारणा होत आहे तसतसे लोक कायदेबाज अधीक बनत जातात. नीतीच्या तत्वाला धरून कायदा रचला असला तथापि कायद्याची अंमलवारी कडक असल्या मुळें पुष्कळ गोष्टी लोकांच्या नीतिमत्तेवर सोंपवून त्या कायद्याच्या व्याप्ती मधून काढून टाकल्या आहेत. परंतु हल्लीं लोकांची सुधारणा ज्या कलानें होत आहे तो कल म्हणजे कायद्याला पूर्ण सन्मान देऊन नीतिमत्तेला झुगारून देण्या कडे आहे. पूर्वींचा साधेभोळेपणा, सत्यप्रतिज्ञा, ईश्वरभिती, धर्मवासना, न्यायबुद्धि हीं दिवसेंदिवस ऱ्हासास पोंचत आहेत असा आमचा पूर्ण ग्रह होत चालला आहे, खरेखोटे खटले, बनावट साक्षी पुरावे, पोकळ दस्तैवज, कर्जरोखा वेऊन कुळाला पैसा न देण्याची अधमवृत्ति, वहिवाटीच्या व मुदतीच्या कायद्याच्या बळावर नेकी व इनामदारी यांना तिलांजली इत्यादि धाबुडव्याचे प्रकार आम्ही व्यवहारधंद्यांत नित्यशः पाहतों. हे प्रकार वाढल्या मुळें कायद्याची मातबरी शिखरास जाऊन पोंचली आहे आणि या कालांत जो कायद्या विषयीं अजाण असेल त्याच्या सारखी निर्बलता कोणाची ही नसेल.

वरील पंगुपणाची गोष्ट प्रत्येक व्यक्तिमात्रास लागू आहे तर आपच्या न्यायदरबारांतून पूर्वपक्ष चालविण्यास सरकारतर्फे कायमचे मुकर वकील पाहिजेत हें आह्मास अधीक स्पष्ट करून दाखवितां येत नाहीं. आह्मास पूर्ण उमेद आहे कीं जुडिशिअल कमिशनर पब्लिक प्रासिक्युटरचा विषय पुन्हा वरिष्ठ अधिकाऱ्यापुढें आणतील आणि हे सरकारचे वकील नेमले जाई पर्यंत निकरानें भांडण करून आपल्या अधिकाराची योग्य बजावणी करितील. साहेब मजकूर न्यायकोडतां वरील वरिष्ठ सचाधीश आहेत तेव्हां ते न्यायाचा दरवाजा पूर्णपणें खुला करण्यांत तिळप्राय आळस करणार नाहींत हें उघड आहे.

[illegible] कामें व रिपेऱ्या केल्या जातात त्यांच्या बजेटाच्या मंजूराती संबधानें व मुनसिपालिट्यांना जे सामान व जीं गुरें लागतात त्यांच्या खर्चाच्या मंजुराती संबधानें नवीन नियमांचा मसुदा गेल्या रेसिडेंसी आरडरमध्यें छापला आहे आणि त्याचा अखेर विचार पुढील महिन्याचे दुसरे तारखेस होईल. या नियमांचा उद्देश मुनसिपालिट्यांचा अधिकार वरील खर्चाच्या प्रकरणांत संकूचित व मर्यादित करण्याचा आहे. स्थानिक स्वराज्य हें नांव मोठें पण दर्शन खोटें!

पार्लमेंटाची निवडणूक गेल्या बुधवारीं संपली आणि लिबरल पक्षाची सुमारें चाळीस मतांनीं सरशी झाली हें कळविण्यास आनंद वाटतो. बहुमताचें वर्चस्व थोड्या मतांनीं झालें आहे तरी ग्लाडस्टन साहेबांचें प्रधानमंडळ स्थापलें जाईल असा रंग दिसत आहे. लार्ड सालिसबरींच्या पक्षास २६२ कानसरव्हेटिव + ५२ युनियनिस्ट मिळून ३१४ लोक आहेत आणि ग्लाडस्टन साहेबांच्या पक्षास २७४ लिबरल + ९ पार्नेलाईट + ७१ आन्टी पार्नेलाईट मिळून ३५४ लोक आहेत. एकंदर ६६८ जागा या प्रमाणें भरल्या व आणखी दोन सभासदांचा निकाल कळला नाहीं.

हिंदुस्थानच्या लोकांस कोणत्या ही पक्षाचें प्रधान मंडळ झालें तरी त्याचें महत्व नसावें. परंतु या देशाविषयीं कळकळ व आस्था, लोकमताला योग्य मान, आमच्या लोकांचीं गाऱ्हाणीं दूर करण्याविषयीं काळजी, सुधारणेकडे नीतिपथाचा मोर्चा इत्यादि गोष्टी लिबरल पक्षाच्या लोकांत आढळतात. शिवाय दादाभाई नवरोजी यांस आयुष्यमोल पार्लमेंटच्या सभासदाची कितावत लिबरल मंडळीकडून समर्पण करण्यांत आली. या अप्रतिम, उदारशील, व लोकोत्तर वर्तनानें आमच्या लोकांचीं मनें ग्लाडस्टन पक्षाची सरशी होण्याकडे धांवतात आणि ही मनीषा अल्पकाळांत परमेश्वर कृपेनें शेवटास जाईल असें निश्चयपूर्वक कळविण्यास आह्मास अत्यानंद वाटतो.

---

'भारत भाग्योदय' नांवाचें एक लहानसें पुस्तक आह्माकडे आलें आहे त्याचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करितों. या पुस्तकाची संक्षिप्त माहिती दुसरीकडे जाहिरात छापिली आहे तिजवरून कळेल, राष्ट्रीय सभे विषयीं मराठी जाणणाऱ्या लोकांना या पुस्तका पासून सर्व मुख्य मुख्य गोष्टी कळून येतील. प्रत्येक राष्ट्रहितचिंतकानें हें पुस्तक समग्र वाचून पाहावें अशी आह्मी शिफारस करितों. भाषा सरळ, सुबोध, व रसाळ आहे विषय महत्वाचा, कल्याणाचा व आवडता आहे. राष्ट्रीय सभे संबधानें वेळोवेळ वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें इत्यादिकांतून अनेक लेख आले आहेत तरी या पुस्तका सारख्या एखाद्या निबंधाची मोठी उणीव होती ती अशी दूर झाली ही आनंदाची गोष्ट होय. रा. व्ही. रेळे आणि मंडळी याची आह्मी प्रशंसा करितों कीं त्यांनीं 'भारतभाग्योदय' हा निबंध चांगल्या भाषाभिज्ञ लेखनकाराकडून लिहवून सुरेख, ठोकळ व वळणदार टाइपांनीं गुळगुळीत जाड व मोहरेदार कागदावर छापविला [illegible] स्वस्त किंमतीस विक्रीस ठेविला.

---

# The Berar Samachar

MONDAY, JULY 25 1892

The India Councils Act of 1892 should be rightly held as a national measure deep in meaning, succinct in explanation and laconic in style. If it be deprived of he lucid and interesting commentary which the prominent and active members in the Parliament have affixed in he course of the debate the Act does not seem to advance an inch more than he ground which its predecessor occupied. No doubt the new Act has raised he number of the members of Legislative Councils but the principal and elementary point of vital importance is the introduction of the representative principle in the formation of these deliberative councils. The explanations and conditions under which the Act passed both the Houses of the Parliament are embodied in the debate and not in the original frame of it. The British Committee of the Congress has sent round a circular to all Indian Committees to concentrate their efforts in the immediate future to procure the assent of the Government of India to a scheme which will make the representative principle a real and living one. Lord Cross has promised to advise short the Govt. of India on that matter by a special despatch. The whole action is within the discretion of the Viceroy. Lord Northbrook was the first noble who suggesed to introduze a clause in the bill to enable the Viceroy to prepare a scheme of election. Upon his suggestion Mr. Curzon has pointed out that the 'Bill does not exclue some such principle as the method of selection, election, or delegation.' Mr. Gladstone had in view the despatch of Indian matters from party-politics in order to have his way to the electioneering battle and therefore made a politic stand upon what Mr. Curzon has said in his floral eloquotion. He observed:—

"Speaking for the Government, I entirely endorse that part of the right honourable gentleman's speech in which he said it is not for us, not for this House to determine the plan or devise a machinery, but that the means and initiative must be left in the hands of the Govt. of India. I endeavoured to give honourable members to understand that this clause was designed to give perfect latitude to the Viceroy in this matter, and that it would admit of the introduction of the principle of the representation in India whether the system was election, selection or delegation or whatever the precise method might be that recommended itself to the judgment of the Viceroy." We hope that the Indian Committees will take to heart the early and opportune advice of the British Committee and move the Viceroy to adopt measures to give a full force to what the Grand-old-man of England has expressed in so many plain terms.

---

## EXECUTION WORK IN BERAR

At page 173 of the Indian Law Report Calcutta Vol. XIX we find these words. "Whether this decree will be more fruitful in results than former ones have been their Lordships cannot tell, but it is to be hoped that the Oudh Government will see its way to give suitors what the Cours of law award to them." These remarks were used in respect of a case that went on appeal to the Privy Council. In Berar execution work is very slowly done. In the last year's report the Judicial Commissioner made some observations on this subject; but it seems execution work has not made much progress in several of the Civil Courts we are aware of. In the Amraoti District, we regret to say this work is miserably slack. The Courts in Berars seem to forget the maxim "Execution is the end of Law." Heaps of execution cases are pending in the Amraoti District. The work would be much more speedily done than at present if intelligent clerks are attached to each of the principal Courts. Economy in these matters is injurious to the public weal. Simple execution cases in which nothing of a complicated nature has arisen are pending in Courts for more than three years.

It would not be out of place here to record that copying establishments do not receive the attention which they deserve at the hands of the Head of the Courts. Men who do not write a good hand are employed in these establishments. The result often is that copies are not legible. In this establishment you must employ deserving young men from where you could fill up vacancies in the several establishments of the Courts.

The Judicial Commissioner is entirely wrong if he thinks that the Native Magistracy in Berar is weak. The Native Magistrates in this Province know more of law than their European comrades. Justice suffers greatly when raw officers are allowed to sit on the bench and deal out justice to suitors, whether in Civil or Criminal Courts. An officer who has not passed his Lower or Higher Examination should not be allowed to sit on the bench. One or two questions in Hindu Law and a few questions on Mahomedan Law should be set in the Lower and Higher Examinations. European officers excepting of course, officers of long standing are to our mind entirely unfit for judgeships.

The first drawback in them is the ignorance of the language. The same is not the case in respect of native Magistrates. To consider for a moment that Police cases are patterns of what a case ought to be is a mistake; the men of the Police are generally ignorant men. To find fault with the Magistrates and the Pleaders because Police prosecutions don't result in convictions is a logic we are unable to understand. It does not look gracious to pass wholesale condemnations against native officers in the Judicial Commissioner who is himself new to the Province.

## PUBLIC MEETING.

The Akola public are invited to attend a public meeting to be held in the Town Hall at 7½ o'clock in the morning on the 28th of July 1892 (Thursday) to consider the proposal of the Municipal Committee to levy a House Tax at Akola to meet in full the expenses of the Kapshi Water Works.

Municipal Office 22-7-92 } Vyankatesh R. Mudholkar Secretary Municipal Committee Akola.

## वऱ्हाड

हवामान--पाऊस वीस इंचावर झाला. हल्लीं थोडी बहुत उघाडी आहे आणि पाऊस पडला तरी थोडा थोडा पडतो त्यामुळें हवा कमी रोगट असून गार आहे आणि किरकोळ आजार ही मागें हटले आहेत.

मि. अजिजुद्दीन मानिस्ट्रेट वर्ग १ आकोला, यांनीं बाळपूरचे शेट पोपटलाल यांजवरील पिनलकोड ४०६।४०९ प्रमाणें ठेविलेल्या आरोपाचा निकाल आज उद्यां करितां करितां अखेरीस गेल्या शुक्रवारीं सायंकाळीं सांगितला. निकालांत आरोपीवर अपराधाची शाबिती वाटल्या वरून त्यांनीं आपल्या पूर्ण अखत्यारींतली संपूर्ण शिक्षा ह्मणजे दोन वर्षें सक्त मजूरी, त्याच दोन वर्षांत एकंदर तीन महिनें अंधारकोठडी आणि एक हजार रुपये दंड व दंड न दिल्यास सहा महिने जाफा कैद या प्रमाणें शिक्षा फर्माविली. या निर्णयावर अपील होत आहे तेव्हां शेटजींच्या सुटके विषयीं आशा वरिष्ठ कोडताच्या निकालावर अवलंबून आहे.

रा. रा. सिद्धेश्वर भास्कर गोळे बी. ए. एल् एल्. बी हे आठ वर्षांपूर्वीं वऱ्हाडांत वकिली करीत असत व पुढें मुंबई इलाख्यांत मुनसफीच्या कामावर सरकारी नोकर झाले. त्यांच्या मृत्यूची दुःख कारक बातमी आह्मांस या आठवड्यांत समजली. गृहस्थ फार सुशील व थोर मनाचे होते. तेव्हां त्यांच्या अकाली मरणानें त्यांच्या इष्टमित्रास फार दुःख होईल.

अकोटच्या रिकाम्या पडलेल्या तहशीलदारीवर खामगांव रमाल कान कोडताचे क्लार्क आफ कोर्ट रा. रा. दामोदर नानाजी यांस तूर्त नेमलें आहे हें पाहून संतोष वाटतो.

अकोला गोरक्षणी सभेच्या फंडाचा तपशील येणें प्रमाणें:— एकंदर उत्पन्न ७०३-॥=॥।. त्या पैकीं खर्च ४३२॥।=॥ १ बजा जातां शिलक रु० २७०॥। २ आहे. या शिवाय मागील सालची वर्गणी थकली आहे ती २११ रुपये आहे परंतु आम्हांस नवल वाटतें कीं ज्या लोकांकडे वर्गणी थकली आहे ते लोक चांगले श्रीमान असून वर्गणी गोळा होत नाहीं तेव्हां त्यांना ही वर्गणी देणें नाहीं अगर ती वसूल करण्यास कोणी खपत नाहीं?

या आठवड्यांत दोन अंमलदार वऱ्हाडांत असिस्टंट कमिशनर वर्ग ३ होऊन आले आहेत ते येणें प्रमाणें:—

लेफटनन्ट एच. आर. एम. सी. डी. आर माडीट इंडियन स्टाफ कोर, मद्रास हे पहिले गृहस्थ आहेत दुसरे लेफटनन्ट टी. डब्ल्यू हेग इंडियन स्टाफ कोर, बंगाल हे अकोल्यास दाखल झाल्या वरून त्यांच्याकडे मानिस्ट्रेट वर्ग ३ चा अधिकार व शंभर रुपयापर्यंत दिवाणी दावे सोंपविले.

वऱ्हाडच्या वकीलीस यंदा ९९ उमेदवार असून त्यांचीं नांवें तारीख १५ जुलईच्या रेसिडेन्सी आरडरमध्यें छापून आलीं आहेत. परिक्षेस प्रांरभ उमरावतीस तारीख ५ सप्तेम्बर पासून होणार आहे.

अकोला जिल्ह्याच्या मुनसिपालिटींतील सरकारतर्फे कित्येक सभासदांच्या मुदती गेल्या मार्च अखेरीस संपल्या कारणानें खालील गृहस्थ नवीन नेमण्यांत आले आहेत यांचीं नावें मुनिसिपालिटीच्या स्थळवारीनें येणें प्रमाणें:—

आकोला—डेपुटी कमिशनर, महमद हुशेन, मौलवी अबदुल कादर, वि. ना. दांडेकर, सोराबजी मंचरजी, मीर अनवर अली.

खामगांव— मुक्कामास हजर असणारा असिस्टंट अगर एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर, स्टाफर्ड स्मिथ, खान साहेब भोलेखान.

शेगांव—मारुती कडताजी, लढ्ढा खेतसी, व पुनम बोलम डाक्टर.

आकोट — नवूसिंग व कृष्णाजी सदाशिव

जालना, औरंगाबाद, आणि मोमिनाबाद येथील त्रिवर्ग पोलीस सुपरिनटेंडंट हे २ वर्ग मानिस्ट्रेट असल्यामुळें फटके मारण्याची शिक्षा देण्याचा अधिकार रेसिडेंट साहेबांनीं त्यांस दिला आहे.

सय्यद शमसूदीन अलीखान बहादुर असिस्टंट कमिशनर वर्ग १ यांनीं फर्लो रजा १८९० साल अखेरीस घेतली होती ती त्यांनीं आणखी सहा महिन्यांनीं वाढवून घेतली आहे.

मि फिलिप थोरीस आफि० तहशीलदार बाळपूर यांस बाळापूर तालुका बोर्डाचे सभासद नेमण्यांत आलें.

येथील वर्षोत्सव व्याख्यान मालेंत काल सायंकाळीं रा. रा. हरी रामचंद्र रोहिणखेडकर बी. ए. यांनीं 'विवाह संबंध व स्त्रियांची उत्क्रान्ती' या विषयावर संभाषण केलें.

### नोटिस.

रा. रा. बक्षीराम गुरुदत्त मारवाडी राहणार मुंबई यांसी नोटीस देणार खाली सही करणार याज कडून कळविण्यांत येतें कीं. आपले कडे खात्यांत रकम २२१६ ८—॥ व्यापारा संबंधी येत असोन शिवाय या रकमेचे व्याज ही येणें आहे या बद्दल तुम्हास पुष्कळपत्रें पाठविली परंतु आपण रकम पाठविली नाहीं करितां ही नोटीस दिली आहे. तरी आठ दिवसांत आमची रकम पटऊन पावती घ्यावी तसें न केलेस रिती प्रमाणें व्यवस्था करूं व त्या बद्दल सर्व खर्चास जबाबदार तुम्ही व्हाल, कळावें तारीख २४ ७।९२ इ०

(सही)

जगंनाथ जितमल दुकान अकोले दस्तुर रामचंद्र.

## जाहीरसभा

अकोलें म्युसिपालिटीच्या हद्दींत रहाणारे सर्व लोकांस विनंती करण्यांत येते कीं तारीख २८ जुलै सन १८९२ (गुरुवार) रोजीं सकाळीं ७॥ वाजतां टौन हालांत जाहीर सभा भरणार आहे; त्या वेळीं सर्वांनीं येण्याची मेहरबानी करावी.

अकोलें शहरा करितां पाण्याचा तलाव बांधण्याचें काम कापशी गांवा जवळ चालूं आहे व त्या साठीं म्युनिसिपल कमिटीस दोन लक्ष रुपये देणें आहेत. शिवाय तलाव तयार झाल्या नंतर तो दुरस्त स्थितींत ठेवण्या साठीं, व त्यांतून शहरांत पाणी सोडण्या साठीं सालीना कायमचा खर्च ठेवावा लागेल. तो अजमासें पांच हजार रुपये येईल, असा अंदाजा आहे. दोन लक्ष रुपयांची तजवीज़ साधारणपणें कमिटीनें लावली आहे, पण सालीना जो खर्च ठेवावा लागणार आहे त्याची व्यवस्था अद्यापि लावणें आहे: ती रकम उत्पन्न करण्या करितां अकोलें येथें घर पट्टी बसवावी असा कमिटी विचार करीत आहे; व त्या संबंधानें लोकांचे विचार काय आहेत हें सदर्हू जाहिर सभेंत पहाणें आहे.

तलावा साठीं एकंदर खर्च लागणार किती, पैकीं कमिटीस दोन लक्ष रुपये द्यावयाचे ते कमिटी कोणत्या रीतीनें देणार, हें खालील टिपण नंबर १ या वरून कळून येईल. व टिपण नंबर २ या वरून कमिटीचें चालू सालचें अंदाज उत्पन्न व खर्च किती हें तपशिलवार कळून येईल.

शुक्रवार २२।७।९२ } व्यंकटेश रामचंद्र मुधोळकर सेक्रेटरी म्युनिसिपलकमिटी अकोलें.

## टिपण नंबर १.

कापशी तलावाचा खर्च.

एकंदर अंदाज खर्च रु. ५००००० 

पैकीं सरकार देणार २५००००

डिस्ट्रिक्ट बोर्ड देणार ५००००

म्युनिसिपलकमिटी देणार २०००००

५०००००

म्युनिसिपल कमिटी रु. २००००० देणार ते खालील प्रमाणें—

| | |
|---|---|
| कमिटी जवळ असलेल्या शिलकेंतून | २६००० |
| सट्टया वरील कर १२ वर्षे वेण्यांत येणार त्याचें अंदाज उत्पन्न | ८४००० |
| म्युनिसिपालिटीच्या हद्दींत कांहीं सार्वजनिक जागा भाड्यानें दिल्या आहेत त्याचें ३० वर्षांत उत्पन्न (सरकाराजवळून कमिटी रुपये १२६०००कर्ज घेणार तें कर्ज ३० वर्षांत परत द्यावयाचें आहे) | ११२००० |
| | २२२००० |

## टिपण नंबर २

अकोलें म्युनिसिपाल कमिटीचें सन १८९२।९३ सालचें जमाखर्चाचें अंदाज पत्रक.

जमा.

| | |
|---|---|
| ८००० | टौन फंड उत्पन्न |
| ८००० | सट्टा कराचें उत्पन्न |
| ८००० | डिस्ट्रिक्ट पौंड (कोंड डवाडा) फंड उत्पन्न |
| ५०० | कमिटीच्या हद्दींतील कोंडवाड्याचें उत्पन्न |
| ४०० | वनचराई उत्पन्न |
| ९३६५ | आठवडे बाजार, काटन (कपाशी) मार्केट, ग्रेन (धान्य) मार्केट—उत्पन्न |
| ४३०० | भंगी पट्टी उत्पन्न |
| २०० | दंडाचें उत्पन्न |
| ४६०० | सार्वजनिक जमिनीचें भाडें |
| ६९१५ | किरकोळ बाबीचें उत्पन्न |

खर्च

| | |
|---|---|
| कमिटीच्या आफिसांतील नोकरांचा पगार | १६९४ |
| कंदील करितां व इतर अशा प्रकारच्या सार्वजनिक सोयी करितां खर्च. | १४५० |
| नविन इमारतीचीं कामें व कांपेनसेशन | ७०० |
| सार्वजनिक पायखाने, कमले, कचऱ्याच्या पेट्या यांची दुरुस्ती | ३५० |
| धर्मार्थ दवाखान्याचा खर्च. | ८८३ |
| देवी काढण्याचा खर्च | ५० |
| लेडी डफारिन फंड वर्गणी. | १५० |
| नवीन तलावाकरितां देणें रकम | १२००० |
| मोर्णा नदीचे बंधारे, सार्वजनिक विहिरी वगैरे करितां खर्च. | ३६४ |
| रस्त्यावर पाणी टाकणें | १०८० |
| रस्ते सफाई. | १३४४ |
| शहर सफाई (पायखाने सफाई व इतर सफाई) | ७६३४ |
| गटर, मोऱ्या यांची दुरुस्ती | १०० |
| टेंपल बगीचा व टौन हाल बगीचा. | ९२३७ |
| काटन मार्केट, ग्रेन मार्केट, आठवडे बाजार, वगैरे बाजारांचा खर्च | ४७०० |
| शाळांचा खर्च. | २९२० |
| रस्ते दुरुस्ती | ४००० |
| इंजिनियरिंग कामा करितां नोकर | २८४० |
| रस्त्याचे बाजूचें रेलिंग, (कठडे) | १००० |

| | |
|---|---|
| ५०२८० रु. | ४५४९६ रु. |

## वर्तमानसार

लांडग्याचा कहर—मिरत शहरांत लांडग्यांनीं माणसें मारण्याचा मोठाच सपाटा उडविला आहे. लोकांच्या घरांत शिरून माणसे मारण्यास त्यास बिलकुल भय वाटत नाहीं. एका गृहस्थानें ल्हानशा गाढवा एवढा लांडगा मारला होता त्याचें पोट चिरले तेव्हां त्यांत एका मुलाचा एक हात व इतर अवयव निघाले. लांडगा मारील त्यास १० रुपये बक्षिस द्यावे असा ठराव तेथल्या अधिकाऱ्यांनीं केला आहे.

ब्रम्ह देशानें हिंदुस्थानास किती बुडविलें पहा—ब्रम्ह देश खालसा केल्यापासून आजपर्यंत त्याच्या प्रित्यर्थ १७०७९६००० खर्च झाला तितक्या मुदतींत ब्रम्ह देशापासून ५,८०७७००० रुपये उत्पन्न झालें, तेव्हां तो देश खालसा केल्यानें ११२७१९००० रुपये हिंदुस्थानचा निवळ तोटा झाला हें उघड होत नाहीं काय!

सोनारांची संख्या—नुकत्याच झालेल्या खानेसुमारी वरून सगळ्या हिंदुस्थानांत ४,२०००० सोनार आहेत असें समजतें. प्रत्येक सोनाराची दरमहा ६ रुपये मिळकत आहे असें धरले तर सगळ्या सोनारांस दरसाल ३ कोट रुपया पेक्षा जास्त मिळकत होतें असें उघड होते ह्यावरून हिंदुस्थानचे लोक सोन्या रुपयांत भारी भांडवल गुंतवून ठेवितात असें स्पष्ठ ठरतें असें म्हणून मद्रास मेल कर्ता छाती बडवून घेत आहे. आज मित्तीस हिंदुस्थानांत अडीच अब्जापेक्षां जास्त भांडवल दागदागिन्यतां गुंतून राहिलें आहे असें तो म्हणतो. शु० सू०

केंब्रिज युनिव्हर्सिटीच्या परीक्षेंत तीन हिंदु उच्च वर्गांत पसार झाल्याचें समजतें. या पैकीं दोन बंगाली आहेत व कोल्हापूरचे देशपांडे या नांवाचे गृहस्थ आहेत.

गायकवाडसरकारची स्वारी इंग्लंडहून येऊन हल्लीं स्वित्झर्लंड मध्यें आहे.

आगगाडीचे रेल कागदाचे घालण्याविषयीं जर्मनींत अनुभव घेत आहेत.

फ्रान्सचे लोक सरासरी दोन वर्षांतून एकदां स्नान करतात; इंग्लंडचे तीन वर्षांतून एकदां जर्मनीचे पांच वर्षांतून एकदां, रशियाचे सहा वर्षांतून एकदां; आयर्लंडचे सात वर्षांतून एकदां. हे सरासरीचें प्रमाण एका फ्रेंच सामुद्रिकशास्त्रवेत्त्यानें पुरी चौकशी करून काढलें आहे.

रोमन लोकांचे कांहीं नाणीं विटा एवढी असून त्यांवर बैलाचा शिक्का असे.

निरनिराळ्या देशाच्या लोकांनीं सार्वजनिक भजनासाठीं एक दिवस पाळिला आहे. ख्रिस्ती लोक रविवार पाळितात. ग्रीक लोक सोमवार पाळितात. इराणी लोक मंगळवार पाळितात असेरियन लोक बुधवार पाळितात. इजिप्शन लोक गुरुवार पाळितात. तुर्की लोक शुक्रवार पाळितात आणि ज्यूलोक शनिवार पाळितात.

कांहीं वर्षांमागें एक अंडे स्पेनच्या राजाच्या मुलीस दिलें होतें. त्याची किंमत ४,०००० डालर होती. त्याच्या कवचीच्या आंतल्या बाजूस बायबलाचा कांहीं भाग लिहिला होता. व त्याच्या आंत एक लहान सोन्यानें मढविलेलें पाखरूं होतें हें एक दाबखील दाबल्यानें बारा मधुर गाणीं गाई.

कलकत्यास सरकारी नोटी खपत नाहींत कारण अफगणिस्थानांतील गडबडीची बातमी असें म्हणतात.

फिलाडेल्फया येथील सरकारी टांकसाळेंत सोन्याचें नाणें वजन करण्याचा कांटा आहे. त्याच्या दोन पारड्यांत सारख्या वजनाचे कागदाचे तुकडे घातले व त्यां पैकीं एकावर पेनसिलीनें नुसती छोटी सही केली व तो पारड्यांत टाकला तर तें पारडें लगेच त्या सहीच्या अक्षरांच्या वजनानें तळाशीं जाऊन बसत. किती विचत्र सूक्ष्म कांटा हा! क०

श्री० महाराज गाइकवाड हल्लीं विलायतेचा प्रवास करीत फिरत असतां मध्यंतरीं महाराणी विक्टोरिया यांच्या भेटीस गेले. त्यावेळीं महाराणी साहेबांनीं लष्करी दिमाखानें भेट घेतली, भेटींत नजराणा होऊन आगत स्वागत होण्या पूर्वी महाराजांनीं आपल्या दर्ज्या प्रमाणें खालीं लऊन मुईला हात लावून आठ मुजरे करावयाचे असतां सलगीच्या नात्यानें हातास हात लावण्याची सवड साधली ती राजनिपूण पुरुषास आवडली नाहीं ह्मणतात. महाराजांनीं समजून उमजून अपमान केला-नाहीं तथापि जुन्या काळच लोक बरोबर नसल्याचा हा परिणाम आहे. आलीकडे बहूतेक जागीं राजेरजवाडे लोक जुन्या अनुभवी लोकांस बरोबर ठेवीत नसून त्यांत काय? यांत काय? अशी चेष्टा चालवितात परंतु राज नियमांत तशी चेष्टा कामाची नाहीं. जागच्या जागीं जो सन्मान तो मिळालाच पाहिजे. पाटलून बूट प्रसंग विशेषी टोपी घालून राजतक्ताजवळ जाणारा अपमान करील तर त्याचे प्रायश्चित्त कोणत्याही प्रसंगीं घेतल्या शिवाय परिणाम नाहीं. तेथें फरजंदचें नातें कोणी लक्षांत आणणार नाहीं. राणी साहेबांनीं महाराजांस इकडे कां आला ह्मणून विचारले! त्यावर महाराजांनीं उगीच आले; असें उत्तर देतांच सर्व हासले. तेथें एक निंभिड खुषमष्कऱ्या होता तो ह्मणाला, जसें आयते राज्य मिळालें तसा आयता राज्यकारभार चालविणाराही मिळाला आहे, मग आपले मूळचे आयते भडकत फिरणें सहज सांपडतें तर ते कां न प्राप्त करून घ्यावें.

हिंदुस्थान सरकारनें काबूलचे अमिरास सक्तीचें पत्र लिहून कळविलें आहे कीं, रशियन तुमच्या आड लपून हिंदुस्थनांत उतरेल तर तुमच्या आमच्या झालेल्या तहनाम्यांत एक वाक्यता न राहतां तुमची बाजू शत्रूची खाण समजून ती खोदण्या साठीं इकडून तजवीज करणें भाग पडेल. बाजावर लोकांवर आपण धाडलेली फौज दगलबाज समजून आस्मार येथें दिलेल्या तळांतून झटकन माघारा फिरवावा लागेल. हाजार बंडखोरांनीं आपल्या हद्दींत मानविलेला धिंगाणा आपल्या हातून सफा होत नसेल तर सरकारास आपल्या विरुद्ध पाऊल ठेवून ब्रिटिश सत्तेची तोफ डागावी लागेल. या गोष्टीस आपली संमत्ति नसेल तर देखत थैलीपत्र हजारा लोकांच्या बंदोबस्तांत बळी देण्यासाठीं लोक तयार करून एकदम त्यांचा नाश करण्यास पाठवावें, शिनवारी तायका लोकांनीं डोकें उचललें तें मांडीखालीं दाबून टाकण्यासाठीं आपण आपला प्राण खर्ची घालावा जलालाबाद नजीक आपण ठेवलेली छावणी दंगा मिटावणारी नसून बाजावरचे सरदार उमरखान यांस मदतगार होत असेल तर त्यांस एकदम निःशस्त्र करून सोडणें अत्यावश्य असतां अद्याप तिकडे आपलें लक्ष खेंचलें नाहीं यावरून गुलाम हैदर सारखें सरदार आपल्यास अभरवशाच्या तोंडीं देऊन नाश करू पहात आहेत, तसें नसते तर आपला गुलाम हैदर इतक्या विपत्तींत कां पडला? असतां त्यांस महामूद बंडखोरांनीं कां वेरून टाकलें असते? यावरून हजारा जातीचे बंडखोर लोक जोडा चढऊन आपल्या विरुद्ध लढाईस उभे राहिले ते खोटे नाहीं. कदाचित् त्यांत आपला पराभव होऊन रशियनास आपला पाय पुढें सरकावण्यास सवड सांपडण्याचा संभव आहे; या साठीं बंदोबस्त करून उठलेली वादळें नाहींशीं करावी.

पेशावरांतून आलेला समाचार कळवितो कीं, हकी बंडखोरास उधळून टाकण्यासाठीं जमरूद येथून गेलेल्या ब्रिटिश तोफा लष्कर सह परत आल्या. सीक लोकांची टोळी माऱ्याच्या जाग्यावर राखून ठेविली आहे. रशिया पामिर हद्दीवर हालचाल करूं लागला व नजीक चीन मुलखांतील आकताष परगण्यांत शिरला आणि मुरदाब नदीकाठ अफगाण मुलख त्यांनीं धरला ह्मणतात. असें झाल्यास आफगाणिस्थाना बरोबर रशियाची लढाई एकदां होणार असा जो ध्वनी तो खरा होतो कीं काय पहावें. म० भि०

नबाब जवानजंग या बड्या गृहस्थावर कांहीं आरोप असून त्याची चवकशी करून रपोट करण्याकरतां निझामसरकारानें एक स्पेशल कमिशन नेमलें आहे.

हारमसजी अर्देसर नांवाच्या एका मुंबईच्या पार्शीचें दिवाळें निघालें असून आपणास नादार ठरवावें असा कोर्टास त्यानें अर्ज केला. देणे ४८ लाख असून येणे व मिळकत मिळून किंमत ६ लाख आहे. या गृहस्थाचा व्यापार असून आग्रा ब्यांक, चार्टर्ड ब्यांक, हांकांग ब्यांक व नाशनल ब्यांक यांच्याशीं त्याची देवघेव असल्यामुळें त्यास नादार ठरवूं नये, हा हिशेब देण्यांत त्याची लबाडी आहे. असें ह्मणण्याकरतां त्या सर्व ब्यांका हल्लीं कोर्टापुढें आल्या आहेत!

जबलपुरास पावसाने फार झपाटा चालविला असून रस्ते, घर वगैरेंचें नुकसान करीत आहे.

पुण्यास पाऊस इतका झाला कीं, नदी व नाले अगदीं भरून चालले असून नदीच्या काठच्या पुष्कळ घरांसही इजा झाली.

कोल्हापुरच्या बातमीवरून समजतें कीं, तेथील पंचगणेस महापूर आला असून तिच्या काठचीं रुकडी व दुसरीं खेडीं पाण्यानें भरून जाऊन त्या खेड्यांचें दळणवळण बंद झाले आहे. या पुरानें कोल्हापूर रेलवेचा रस्ता वाहून जाण्याचीही भीती वाटत आहे. दक्षण महाराष्ट्र रेलवेवर इकडून तिकडे पर्यंत फार वृष्टी झाली असून त्या सर्वांस नुकसान होण्याची भीती आहे.

हिंदुस्थानसरकाराकरतां विलायतेस कांहीं गलबतें तयार होत असून तीं कशा रीतीनें तयार होत आहेत, त्यांत कांहीं फेरफार करणे जरूर आहे कीं काय, वगैरेंचा तपास करण्यास, हिंदुस्थान सरकारचे नोकर क्यापबेल जे हल्लीं विलायतेस आहेत, त्यांस सांगावें असें हिंदुस्थान सरकाराकडून विलायत सरकारास लिहून गेलें आहे असें सांगतात.

कलकत्ता, वगैरेकडे पाऊस फार पडून आगगाड्यांचे कित्येक रस्ते पाण्यानें भरून जाऊन व वाहून जाऊन आगगाड्या चालण्याची बंदी झाली आहे.

सर कोलवीनच्या मागून सर कासवेट हे नार्थ वेस्ट प्रांताचे ले. गव्हरनर होणार.

मद्रासरेलवेच्या कोलार स्टेशनाजवळ जी सोन्याची खाण लागली आहे त्या खाणीपर्यंत रेलवेचा एक फाटा नेण्याचें ठरलें.

पाऊस चांगला झाल्यामुळें मद्रासइलाख्यांतलें दुष्काळाचें भय नाहींसें झालें.

लाहोराकडेही पावसाने गर्दी करून दिली आहे.

व्यापाऱ्यांचा माल खैबरखिंडींतून सुरक्षितपणे जाऊं येऊं लागला.

पुलाच्या वगैरे कामांत हुशार असे बंगाल फौजेंतील सापर मानर पलटणींतले कांहीं निवडक लोक यांस, कालरा बंद होऊन रस्ता खुला होतांच गिलजित येथें जाऊन हजर व्हावें असा हुकूम झाला आहे असें सांगतात.

लढाई सुरू होणार अशी जी सिमला येथें फार दाट बातमी पसरली आहे त्याचीं कारणे पुढीलप्रमाणे आहेत असें सांगतात (१) गव्हरनर जनरलांच्या कौसलांची स्पेशल माटिंग, (२) रशियनलोक पामीरावर येत आहेत अशाबद्दल पायोनियर वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेला एक लेख (३) सरहद्दीवरच्या रेलवेचें टाईम टेबल कायम करण्याकरतां त्या रेलवेच्या कामदाराचे समक्ष येणें, (४ (त्याच रेलवेच्या दुसऱ्या एका कामदारांचे येणे. या इतक्या गोष्टी जमून आल्यानें ती बातमी पसरली व त्यांतच अमक्या कामदारांस लढाईच्या कामावर नेमलें असेंही बाहेर आलें आणि त्यामुळें लोकांत जास्तज चळवळ सुरू झाली असें ही बाहेर आलें आणि त्यामुळें लोकांत जास्तज चळवळ सुरू झाली असें सांगतात. ठा० अ०

---


मराठी भाषेमध्यें अशा प्रकारचें हें पहिलेंच पुस्तक होय.

## भारत भाग्योदय

५,००० प्रतींपैकीं ३,००० संपल्या.

ह्या पुस्तकांत नागपूर येथील ७ व्या राष्ट्रीयसभेचें साद्यंत वर्णन फार प्रेमळ व चटकदार भाषेंत लिहिलें आहे तें वाचलें असतां सभेचें अपूर्व व मनोहर देखावा मूर्तिमंत दिसूं लागतो. सर्व वक्त्यांचीं भाषणें आणि त्या त्या वेळेचें सभेचें रमणीय स्वरूप ह्या पुस्तकांत फारच कुशलतेनें वर्णिलें आहे. प्रारंभीं, स्वागतमंडळीचे अध्यक्ष मि० नारायणस्वामी नायडू- ह्यांचें सचित्र मनोरम चरित्र दिलें असून शेवटीं मागील ६ राष्ट्रीयसभांचीं संक्षिप्त माहिती व सुंदर कवितां घातल्या आहेत. डेमी अष्टपत्री सांच्याची एकंदर पृष्ठें ७५. टाईप बारीक. छपाई सुंदर अत्यल्प. १ प्रतीस २ आणे व ट. ह. ०॥ आ. जास्त ५ प्रतीस ट. ह. माफ १० प्रतीस ट. ह. माफ व १ प्रत बक्षिस.

पत्ता—व्ही. रेळे आणि मंडळी, गिरगांव पोस्ट- मुंबई.


---

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.